# खानदेशची माती

( स्वभावचित्रें )

म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १०८१

लेखक

के. नारखेडे

श्री लेखन वाचन भांडार

क्ष्मी रस्ता, पुणें २

REFBK-0011595
REFBK-0011595

किंमत साडेतीन रुपये

# खानदेशाची माती

( स्वभावचित्रें )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: चरित्र
क्रमांक 1089 नों: दि: ........

लेखक

के. नारखेडे

ग्रं. क्र. ११५९५

श्री

REFBK-0011595
REFBK-0011595

किंमत साडेतीन रुपये

प्रकाशक
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन,
६२ बुधवार, पुणें २.

पहिली आवृत्ति १९६१

मुद्रक
य. गो. जोशी, बी. ए. ( ऑ. ).
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणें २.

माझे पहिले प्रकाशक

व

प्रेमळ मित्र

**श्री. आबासाहेब ( माधवराव ) नेवे**

यांस सप्रेम

के. नारखेडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ..पारि.......
क्रमांक ...१०८९...... नों: दि: ..............

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | उग्र परशुराम | १ |
| २ | दोन फणस | १६ |
| ३ | कुटुंबनायक | ३० |
| ४ | सजन्या ! | ४० |
| ५ | मोरूभाऊंचें हितवचन | ५३ |
| ६ | कर्जाची फेड | ६३ |
| ७ | तो खेडवळ माणूस | ७६ |
| ८ | उघड्र पाटील | ९२ |
| ९ | बळी | १०० |
| १० | जय विजय | १२० |
| ११ | केवजी भाऊ | १३४ |


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: चरित्र
क्रमांक 1081 नों: दि: ............
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१ ११५९६

# उग्र परशुराम

दुसऱ्या महायुद्धानंतर खेडयापाडयांतूनहि घराची टंचाई तीव्रतेने भासूं लागली आहे. त्यापूर्वीं घरांचा प्रश्न शहरांतूनहि जाणवत नव्हता. वाटेल तेव्हा वाटेल तशा सोईचें घर कोठेहि मिळणें सहज शक्य होतें.

पण अशीं कांही अपवादात्मक गावें पूर्वींहि होतीं की, तेथें तो प्रश्न आजच्याइतकाच तेव्हाहि बिकट होऊन बसला होता. आज घर मिळवणें जितकें कठीण वाटतें तितकेंच तें पंचवीस-तीस वर्षांपूर्वींहि त्या गावांत मिळविणें कठीण वाटत होतें.

अशा गावांत बदली झाली की शिक्षकाच्या पोटांत भीतीचा गोळा उभा राही. लाचारी पत्करून, स्वाभिमान गुंडाळून ठेवून—तो नेहमींच गुंडाळून ठेवावा लागतो म्हणा—त्याला कोणाच्या तरी पडवीचा आश्रय करून दिवस काढावे लागत. कशीतरी सोय करून घ्यावी लागे.

पाडळसें हें अशा गावांपैकीच एक गाव होतें. एका टेकाडावर बसल्यामुळे त्या गावाला वाढायला जागाच नव्हती. गावांतील वाढत्या संख्येलाच घरांची उणीव भासत होती. अशा स्थितींत बाहेरून आलेल्या शिक्षकाची किती कुचंबणा होत असेल, हें सांगायला नकोच !

नांदेडहून मला पाडळशाला यावें लागलें होतें. घर मिळविण्याकरिता मी व माझे सहकारी सारखा प्रयत्न करीत होतों. एकाने सांगितलें, " एक घर फार छान आहे; पण—"

" ' पण ' आपण जिंकूं ! सांगा कोणाचें घर आहे. "

" तितकें चांगलें घर गावांत नाही म्हटलें तरी चालेल. "

" प्रस्ताव पुरे ! घर कोणाचें आहे तेंहि सांगा व 'पण 'हि सांगा. "

" इतकें सोपें व साधें काम नाही तें. "

" पण कळूं तर द्या घर कोणाचें आहे तें ! "

" परसोशेटचा—पुनाशेटचा सारा वाडा मोकळा आहे. एकाच काय, साऱ्यांच शिक्षकांची सोय होईल एवढी तीन मजली हवेली आहे. पण—"

आणि मग कळलें....

तो वाडा बांधल्यापासून मोकळाच आहे. परसोशेटच्या भावाने—पांडूशेटनी—तो वाडा बांधून घेतला; पण घरांत रहायला जाण्यापूर्वींच ते एकाएकी वारले. नाथ लोकांच्या मसणवटीवर त्यांनीं तो वाडा बांधला. पाया खोदतांना अनेक ठिकाणीं हाडें निघालीं. त्यांनी तीं गाडींत भरून नदींत नेऊन टाकलीं. साऱ्या सुखसोयींनी युक्त घर बांधलें. गावांत संडास असलेलें तें एकटेंच घर आहे. पण त्यांत कोणीच रहात नाही. तेथे पुरलेले नाथ कोणालाहि त्या घरांत नांदूं देणार नाहीत असें सारे लोक समजतात. त्या मसणवटीवर घर बांधूं नये म्हणून पांडूशेटना पुष्कळांनी समजावून सांगितलें होतें, पण कोणाचेंहि न ऐकतां त्यांनी आपलाच हट्ट चालविला होता व त्याचें फळहि त्यांना मिळालें होतें. स्वतः परसोशेट शेजारच्या लहानशा घरांत आपल्या मुलां-पुतण्यांसह राहतात. तेथे रहायला कोणी तयार नाही.

घर फारच छान होतें. पांडूशेटसारख्या हुशार, कल्पक व लक्ष्मीची कृपा असलेल्या माणसाने तें स्वतः राहण्याकरितां बांधलें होतें. सढळ हाताने पैसा खर्च केला होता. त्यांतल्या कोपऱ्याच्या दोन खोल्याहि मला पुरेशा होत्या. पण त्यांत कसें रहावयाचें हें ठरविण्यापूर्वीं आणखीहि एक मोठा 'पण' होता.

परसोशेटकडून घर मिळविणें कांही सोपें नव्हतें. पिढीजात श्रीमंत माणूस. पोटाकरतां गावोगाव भटकत फिरणारा शिक्षक त्याच्या लेखीं काय किंमतीचा ? त्याची विनंति तो ऐकून तरी घेईल की नाही, याबद्दल मोठीच शंका होती ! पटकन् म्हणायचा, ' घर तुमच्याकरतांच बांधलंय की नाही ! "

आणि तो ' महादेव ' प्रसन्न होऊन घर मिळालेंच तरी पुढे त्याच्या

शेजारीं, सहवासांत राहणें म्हणजे एक दिव्यच होतें. क्षुल्लक कारणांवरून एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करणाऱ्या परशुरामाप्रमाणेच उग्र व तापट असलेल्या त्या माणसाचें मन सांभाळणें 'महाकर्म कठीण' होतें. श्रीमंतीमुळे लहरीपणाची व दुसऱ्यांना कःपदार्थ मानायची सवय लागलेली. कोणावांचूनच अडत नसल्यामुळे मिळतें घेण्याचें अगर मनाला आवर घालण्याचें परसोशेटला माहीतच नव्हतें. सावकारीच्या धंद्यामुळे मनांतील कोमल भाव पार नाहीसे झाले होते त्यांचे. भागवत धर्माचे ते मोठे अभिमानी. एकनाथी भागवत जिभेवर खेळत होतें त्यांच्या. जरा नवा विचार कोणीं बोलला की त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला जात असे. आजची पिढी पाखंडी, नास्तिक म्हणून येतां जातां तिच्यावर घसरण्याची मोठी हौस होती त्यांना. कशावरून, कोणत्या वेळेस त्यांचें बिनसेल, कोणावर ते घसरतील याचा पत्ता लागणें कठीण होतें. आणि तसें झालें की, दोरीलाच साप समजून बडवीत रहाणाऱ्या माणसाची समजूत घालणें ब्रह्मदेवालाहि अशक्य होतें. त्यांच्या घरांत रहायला मिळालेंच तर रात्रंदिवस डोळ्यांत तेल घालून तारेवर कसरत करावी लागणार होती.

हें दिव्य आपल्याला कितपत साधेल ? मनाला मोठीच शंका होती.

पण घर इतकें चांगलें होतें की, वाटेल त्या प्रसंगाला तोंड द्यावें, कांही असलें तरी तें मिळवावें व त्यांत रहावें असें वाटूं लागलें.

त्या दृष्टीने आम्हीं प्रयत्न केला. परसोशेटचे दोन पुतणे शाळेंत होते. त्यांच्याकडून बुरुजाला सुरुंग लावला व किल्ल्याच्या तटाला खिंडार पाडलें.

परसोशेटनी बोलावणें पाठविलें. जाऊन भेटलों.

"काय मास्तर, तुम्हांला म्हणे घर पाहिजे आमचें ?"

"फार सोय होईल माझी, भाऊ जर..."

"मला सारे शेट म्हणतात." मध्येच मला अडवून परसोशेट म्हणाले. ही पहिली सलामी होती.

"कुठेच घर मिळत नाही म्हणून तुम्हांला हें घर पाहिजे आहे काय ?"

"तसें नाही. घरहि मला पसंत आहे."

"तुम्हांला पसंत नसायला काय झालें ? किती पैसा लागला त्याला. फुकटांत असें चांगलें घर मिळालें तर कोण नको म्हणेल."

" मी कांही फुकट ...

" मग भाडं देणार ? अशीं घरं कोणी भाड्याने देण्याकरतां बांधतात काय ? जा तुम्ही ! घर मिळणार नाही ! "

कांही बोलायची सोयच नव्हती. गप्प बसलों.

" बरं, येतों तर. " जरा वेळाने मी संकोचत म्हणालों.

" निघालांत ? अहो, घर पाहिजे ना तुम्हांला ? "

" हवें आहे, पण..."

" हें पाहा, कोणत्या खोल्या पाहिजेत ? "

" कोणत्याहि दोन खोल्या चालतील. "

" अहो, तुम्हांला ज्या सोयीच्या वाटतील त्या सांगा. "

" तुम्ही द्याल त्या. "

" तुम्हांला ज्या खोल्या सोईच्या वाटतील तें सांगा म्हणतों मी ! एवढी निवड नाही का करतां येत ? "

" आडाजवळच्या दोन खोल्या द्या, " पुन्हा शब्दच्छल नको म्हणून मीं सरळ मागणी केली.

" सूनबाईला विचारलें आहे का ? "

" त्यांत काय विचारायचें ? "

" घराबद्दलच्या अफवा माहीत आहेत ना ? "

" होय, माहीत आहेत. "

" तरीहि रहायची तयारी आहे ? विचार करून ठरवा. आमचीं मुलं-माणसं मुळीच तयार नाहीत. वास्तविक आम्हीं भागवतधर्मी. भुताखेतांना, नाथ-जंगमांना आम्ही काय दाद देणार ? त्यांनाच आमची भीति वाटायला पाहिजे. विठ्ठलाचा नामघोष वाड्यांत नेहमी चालतो. भूत-पिशाच्चांची तेथे काय मात्रा चालणार ? पण बायका-मुलांची सममूत पटत नाही. तुमच्या बायकोची तयारी आहे का ? हो, नाहीतर मग आम्हांला दोष ! "

मनांत आलें, ' हाच का तुमचा भागवतधर्म ? सोईप्रमाणे तो बदलत असतो का ? ' असें म्हणावें; पण मनाला आवर घातला. मी गरजवंत होतों. याचक होतों.

" आमची तयारी आहे. "

" आणखी एक महत्त्वाची गोष्ट. "

आता आणखी काय राहिलें ? मीं थोड्याशा अनुत्साहानें त्यांच्याकडे पाहिलें व दचकत म्हणालों,

" आणखी काय ?

" आम्ही सांगू तेव्हा घर खालीं करायला पाहिजे. कांही सबब न सांगतां. "

" मध्यरात्रीं खाली करून द्यायला सांगितलें तरी तेव्हाच सामान बाहेर काढून घर मोकळें करून देईन. "

" आम्हीं काय अक्कल बाजारांत विकली आहे का मध्यरात्रीं घर खाली करून द्या असं सांगायला ? तुम्हां लोकांना वाटतं आपण फार शहाणे आहोंत. "

" नाही, आपली खात्री व्हावी म्हणून..." अपमान गिळून टाकीत मी बोललों.

" खात्री आहे आमची ! गरज असते तेव्हा सारे असेंच म्हणतात. पैसा हवा असला की प्रत्येकजण हेंच सांगतो. नंतर सारेच चुकवाचुकव करतात. नेहमीचा अनुभव आहे मला. "

यावर काय बोलणार ? न बोलणेंच बरें, असें ठरविलें.

" आणखी एक गोष्ट..."

वाटलें, पूर्वीं ब्रिटिश सत्ताधीश संस्थानिकांनाहि अशा अटी घालीत नसतील ! मारुतीच्या शेपटाप्रमाणे हें आता किती लांबणार, कल्पनाच येईना ! दिल्ली अजून किती दूर होती कोणास ठाऊक !

" आमच्या घरांत रहावयाचें तर आमच्या मुलाप्रमाणेंच रहायला पाहिजे. मी त्यांचा कान धरतों. तुमचा कान धरतां येणार नाही मला; पण त्यांच्यांत व तुमच्यांत कांही फरक राहणार नाही. एखादी गोष्ट मला न पटली तर मी मुलाहिजा ठेवणार नाही. मुकाट्याने मानलें-सोसलें पाहिजे सारें. "

" मुलाप्रमाणेच आहें मी आपल्या. "

" तें तुम्ही सांगू नका. मला कळतं. मीच तें तुम्हांला सांगतों, मुलांसारखेंच वागायचें. चुकायचें नाही. "

" लिहून देऊं का ? " असं म्हणण्याची इच्छा झाली, पण पुन्हा शब्दाला शब्द वाढेल. फाटे फुटतील. टाळलें सारें.

" श्रीधर, ( पांडूशेटचा वडील मुलगा ) धर्माला सांग, ' आडाजवळच्या दोन खोल्या साफ करायला. ' पण त्या खोल्या कशाला घेतां ? त्यांच्या वरच्या खोल्या घ्या. चांगल्या हवेशीर आहेत. "

वरच्या खोल्या खरोखरच चांगल्या होत्या. त्या मिळणार नाहीत असें वाटल्यामुळेच मी बोललों नव्हतों; पण शेटनीच त्यांच्याबद्दल सूचना दिल्यामुळे मला आनंद झाला.

" मी घेतों मुलांकडून साफ करून. धर्मा कशाला ? "

" मग नौकर कशाला असतात ? त्यांची काय पूजा करायची ? "

आवरतें घेतलेलेंच बरें वाटलें !

घर मिळालें. पुष्कळांनी सांगितलें, ' कशाला विषाची परीक्षा पाहतां ? ती जागा कांही सुख देणार नाही. हा परसोशेट स्वतः लहानशा घरांत राहतो, पण तेथे राहात नाही. मसणवटी आणि तीहि नाथ लोकांची ! जारण-मारण विद्येंत निष्णात् असणारांची ! शिवाय त्या जागेची शुद्धीहि झालेली नाही. शेटचा भागवतधर्म फक्त बोलण्यांत. कांही काम नाही म्हणून भागवत वाचीत बसायचं. मोठा चक्रम् माणूस आहे. केव्हा पाण-उतारा करील, कोणाला काय बोलेल, नेमच नाही. मतलब मात्र कधी सोडायचा नाही. भुतंखेतं परवडलीं, पण हें जिवंत भूत नको असं होईल तुम्हांला. पैशामुळे सारे दबून वागतात. त्याला स्वतःशिवाय कोणीच चांगला दिसत नाही. जाऊं नका तेथे . ' वगैरे.

पण मीं विषाची परीक्षा पाहावयाचेंच ठरविलें. नाही जमलें तर सोडून देऊं घर ! आत्तांची अडचण तर भागते आहे. निश्चय केला अन् घरांत सामान नेऊन टाकलें.

घरीं कठोऱ्याला गेलों. पत्नीला सारें समजावून सांगितलें. प्रथम तिला तें फारसें रुचलें नाही; पण शेवटीं तिच्याहि मनाची तयारी झाली. निदान मला तिने तसें दाखविलें. दुसऱ्याच दिवशीं तिला घेऊन आलों. नव्या घरांत आमचा संसार सुरू झाला.

दुसऱ्याच दिवशीं सकाळीं श्रीधर एका लहानशा तांब्यांत दूध घेऊन

आला अन् तिला म्हणाला, “ बहीण, आईने सांगितलें आहे, धुणें मोठ्या दगडीवर राखून ठेव.”

“ कशाला रे ? ”

“ धोबी घेऊन जाईल ना धुवायला ! थोड्या वेळाने येईल तो कपडे नदीवर न्यायला.”

“ मी धुऊन टाकीन. कशाला धोबी पाहिजे ? ”

“ आई म्हणाली.... ” मी ऐकत होतों. चटकन् पुढें झालों व त्याला विचारलें, “ कोण कोण होतें रे तिथे ? ”

“ शेट अन् आई बोलत होते. शेटनीच आईला सांगितलें असें कळवायला. ”

“ पण असें धुणें असणार तरी किती ! अन् त्याला वेळ तरी असा किती लागणार आहे ? ” सौ. म्हणाली.

आली पंचाईत. नाही म्हणणें शक्य नव्हतें अन् हो म्हणून संमति देण्याला मन तयार नव्हतें. मीं मनांत ठरविलें होतें. ‘ शक्य तों शेटशीं बोलायचें नाही ! होतां होईल तों त्यांना टाळून जायचें ! संघर्ष येऊंच द्यायचा नाही ! मग कशाला अप्रिय घटना घडेल ? आपण दूर राहिलों, फारसा संबंध ठेवला नाही की बोलणें-चालणें होणार नाही आणि कडू बोलहि ऐकावे लागणार नाहीत. ’ पण आपण ठरवितों तसें होतेंच कुठे ?

मी श्रीधरच्या बहिणीला–सौभाग्यवतीशीं तें नातें पहिल्याच भेटींत निश्चित झालें होतें–म्हणालों,

“ राहूं दे धुणें. येथे उलट बोलायचें नाही, प्रतिवाद करायचा नाही. तोंड असून बोलायचें नाही, कान असून ऐकायचें नाही अन् डोळे असून पाहायचें नाही. जें जें होईल तें तें मुकाट्याने मान्य करायचें. पहात राहायचें ! ”

“ हा तर जुलूम झाला ! ”

“ सहन करतां येईल तोंपर्यंत सोसायचा. असह्य झाल्यावर शेवटीं बंड उभारून एक घाव दोन तुकडे करायचे. तोंपर्यंत मूग गिळून रहायचं ! ”

“ बरें आहे. तुम्ही सांगाल तसें. ”

अशीच गोष्ट प्रत्येक बाबतींत ! दूध रोजच येऊं लागलें. तें मोजूनहि

आणलें जात नव्हतें. सालदार पाणी भरून जाऊं लागला. माझा जीव गुदमरूं लागला. हें असें किती दिवस चालायचें ? अति गोडीला कडू चव लागते ! तसें तर होणार नाहीं ना ? डोक्यावर तलवार टांगल्याप्रमाणे मनाची स्थिति झाली. अनामिक शंकेने, भीतीने पोटांत गोळा उभा राहिला.

मी एकदां सौभाग्यवतीला म्हणालोंहि,

"आता तूं खरोखरच राजाची राणी झाली आहेस. पाणी ओढायला नको. धुणं धुवायला नको. फक्त चूल तेवढी पाहायची. पण हें औट घटकेचं राज्य आहे हें विसरूं नकोस बरं ! केव्हा राज्य जाईल व वनवास पदरीं येईल याचा नेम नाही !"

"वनांतहि आम्ही आमचें राज्य फुलवूं. राजेसाहेबांच्या व्यवस्थेंत काठहि, कांही म्हणतां कांही कमतरता राहणार नाही, ही सरकारने खात्री बाळगावी." सौ. कांही गप्प बसणारी नव्हती. निदान माझ्यासमोर तरी गप्प बसणारी नव्हती. तसें सारें छान चाललें होतें. फक्त माझें मन तेवढें अस्थिर होतें.

पूर्वी ओसाड वाटणारा तो वाडा आता मुला-फुलांनी बहरून गेला. कांही मुलांना घरीं अभ्यासाला जागाच नव्हती. तीं मुलें रात्रींहि श्रीधर-बरोबर अभ्यास करूं लागलीं, तेथेच झोपूं लागलीं. श्रीधर व त्याचे भाऊ तर केवळ जेवणापुरतेच घरीं जाऊं लागले. शिक्षकांची दुपारची बैठक माझ्याकडेच बसूं लागली.

हीं नवीं भुतें पाहून वाड्यांतील मूळचीं भुतें पार बेपत्ता झालीं. त्यांनी कायमचें काळें केल्याचें दिसून आलें.

माझें मन मात्र नेहमी साशंकच असे. मला सदा टांगल्यासारखें वाटे. मला उगाच वाटावें, 'वरवर शांत दिसणारा सागर केव्हा खवळून गर्जूं लागेल हें काय सांगतां येतें.'

एकदा शेटला टाळणें कांही शक्य झालें नाही. त्यांची पोथी वाचायची वेळ होती. त्यांनी सहज विचारायचें म्हणून विचारलें, "ऐकणार काय भागवत ?"

"हेडमास्तरांनी बोलावलं आहे. त्यांच्याकडे जाऊन येतों."

हेडमास्तरांनी खरोखर बोलावलें होतें, पण त्याच वेळेस नव्हे ! ' केव्हा तरी येऊन जा ' असा निरोप होता. त्याचा मीं उपयोग करून घेतला. पण शेटजींनी अशा रीतीने माझ्याकडे पाहिलें की जणू त्यांना म्हणावयाचें होतें, ' कळलें मला. थाप मारायची कांही जरूर नव्हती. तुम्हां लोकांना भागवत काय आवडणार ? गाढवाला—'

त्या वेळेस घरांतून कोठें जायची इच्छा नसूनहि मी घराबाहेर पडलों. तरीहि त्या दुराराध्य माणसाची खात्री पटणें कठीण होतें ही मला पूर्ण जाणीव होती.

आणि नंतरचा तो प्रसंग !

रविवारची सुटी होती. आम्ही पांच-सहा शिक्षक जमलों होतों. कांही तरी करमणूक हवी म्हणून पत्त्यांचा डाव सुरू केला. खेळ मोठा रंगांत आला होता, तोंच शेट समोर येऊन उभे राहिले.

वास्तविक ते कधीच वर येत नसत. त्यांची एक बसायची खोली होती. तेथून ते क्वचितच बाहेर पडत. पोथी वाचणें वगैरे तेथेच होत असे. कोणाच्या गांठीभेटीहि तेथेच होत. सारा व्यवहार तेथेच चाले. जरुरीच्या कामाशिवाय ते सहसा कोठेहि जात नसत. इतक्या दिवसांत ते माझ्याकडे कधीहि आले नव्हते. त्या दिवशींच ते असे अचानक वर आले.

आम्हांला पत्ते खेळतांना पाहून त्यांच्या जीर्ण चेहऱ्यावर तिरस्काराचें जाळें पसरलें. खूप शिताफीने चोर पकडल्यासारखें त्यांना वाटलें. तीव्र स्वरांत, उपहासाने ते म्हणाले, " काय उद्योग पण ! मास्तर लोकच गंजिफा खेळूं लागल्यावर मुलांना ते काय शिक्षण देणार हें दिसतेंच आहे ! भागवतधर्म कटाक्षाने पाळणाऱ्याचा हा वाडा आहे. येथे गंजिफा खेळता येणार नाहीत तुम्हांला ! फेकून द्या तीं पानं ! "

आम्ही हतबुद्ध झालों. सारी घटना अकस्मात् घडली होती. काय करावें, काय बोलावें कोणालाच कळलें नाही. शरमेने आमचे चेहरे काळवंडले. अपमानाने मन व्याकुळ झालें. संतापाने रक्ताचा कण नि कण तापला.

जरा मन सांवरून वर पाहतों तों शेट तरातरा जातांना दिसले. धूमकेतु तडाखा देऊन लुप्त झाला.

मन तळमळून ओरडलें, ' छे ! नको येथे राहाणें ! असंगाशी संग अन् प्राणाशी गाठ ! घर म्हणून एवढा दिमाख ! साधी माणुसकी कळत नाही अन् म्हणे आम्ही भागवतधर्म कटाक्षानें पाळणारे ! ' पैसा बोलतो आहे ' अन् दुसरें काय ? पैसा नसेल तर कुत्रें विचारणार नाही यांना ! '

बराच वेळ आम्ही सारेच सुन्न होऊन बसलों. आमचीं मनें सांवरायला आम्हांला किती तरी वेळ लागला.

" चला, दुसरें घर पाहूं ! कोठे एक खणाची पडवी मिळाली तरी चालेल ! जेथे माणुसकीची ओळख नाही तेथे राहायचें कशाला ? " शेवटीं मी म्हणालों.

साऱ्यांनीं दुजोरा दिला माझ्या म्हणण्याला ! आम्ही त्या हेतूने बाहेर पडलों. खूप भटकलों, तपास केला, जागा पाहिल्या अन् निराश झालों. बोलणें जितकें सोपें होतें तितकेंच घर मिळविणें कठीण होतें. शेवटीं तेथेच राहणें भाग पडलें. मनाला मात्र वाटूं लागलें की या गावांतून बदलीच करून घ्यावी, धडपड लटपट करून. पण बदली ताबडतोब होणेंहि कसें शक्य होतें ?

तेव्हापासून मात्र मी अतिशय जपून राहूं लागलों. शेटशी मीं बोलणेंच सोडून दिलें. अन् त्यांच्याहि तें लक्षांत आलें असावें असें दिसलें.

थोड्याच दिवसांत मला सौ.ला कठोऱ्याला पाठवावें लागलें. ती दोन-तीन महिने तेथेच राहणार होती. जाण्यापूर्वी तिचा सारा दिवस मला निरनिराळ्या सूचना देण्यांत गेला. मींहि त्या ऐकत असल्याचें दाखविलें, त्याप्रमाणे वागायचें कबूल केलें; पण तिला माहीत होतें की हें ऐकणें वरवरचें आहे. केवळ आपल्या समजुतीकरतां आहे. तरी तिचें सारखें चालूं होतें–त्याशिवाय तिचें समाधान होणें शक्य नव्हतें–शेवटीं वेळ झाल्यामुळे तिच्या सूचना थांबल्या.

दुसऱ्या दिवशीं शाळा सुटल्यावर मी घरीं आलों. खिचडी शिजवून जेवण केलें. संध्याकाळीं पुन्हा स्वयंपाक करायला नको म्हणून दोन्ही वेळेस पुरेल इतकी खिचडी केली होती. उरलेली खिचडी संध्याकाळकरतां नीट झांकून ठेवून दिली.

जेवण संपल्यावर जरा बसतों न बसतों तोंच शेट वर आले. मी

रहायला आल्यापासून दुसऱ्यांदा ते वर आले होते. मी थोडयाशा बेपर्वाई-नेच त्यांच्याकडे पाहिलें. मीं ठरविलें होतें त्यांना पटवून द्यावें की मेलेलें कोंबडें आगीला भीत नाहीं.

येतांबरोबर त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे त्यांनी कपाळाला आठ्या चढवीत हांक मारली,

" मास्तर ! "

" काय म्हणणें आहे ? "

" आमचें घर सोडा. "

" ठीक आहे. "

" आतांच्या आतां सामान बाहेर काढा सर्व ! "

" बरें आहे. "

" काय बरें आहे ? हें का बरें आहे ? "

" मग काय म्हणायचें ? "

" कांही कारण विचारायला नको ? मी असें कां म्हणतों तें समजून घ्यायला नको ? "

" काय करायचें समजून घेऊन ? मीं तुम्हांला कबूल केलें होतें तुम्ही सांगाल तेव्हा घर खाली करीन म्हणून ! विचारून मग तें खालीं करीन असें थोडेंच सांगितलें होतें ? "

" बृहस्पति आहांत ! अरे, पण मी असें कां म्हणतों ? "

" तें मला कसें सांगतां येणार ? तुमच्या मनांत काय आहे तें कळायला मी मनकवडा थोडाच आहें ! "

" त्याहून जास्त आहे. म्हणे मीं असें थोडेंच म्हटलें होतें ! अन् त्या वेळेस कबूल केलेलें आठवतें का सारें ? "

" काय कबूल केलें तें आठवत नाही मला ? "

" मी अगदी मुलाप्रमाणे वागेन म्हणून कबूल कल होतें ना ? "

" मग काय चुकलें माझें ? पत्ते खेळलों हेंच का ? " मीं एक फटका मारावा म्हणून म्हटलें.

" पत्ते गेले चुलींत. वेडेंवांकडें बोलून चुकवाचुकव करूं नका ! "

" मी चुकवाचुकव करतों ? काय केलं मीं ? "

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थल
वि: चारि
अनुक्रम
९०६२ नों: दि:

' तूं मुलासारखं वागतोस का ? ' शेट एकदम एकवचनावर आले होते. पण तें मला बोचलें नाहीं तेव्हा.

" नाहीं वागत ? "

" सूनबाई कठोऱ्याला गेली आहे ना ? "

" होय ! कालच गेली. "

" अन् तूं येथें स्वयंपाक करून जेवलास ! माझा मुलगा असा स्वयंपाक करून जेवला असता का ? घरांत रहायचें तर मुलासारखें रहायचें हें पहिल्यानेंच सांगितलें होतें ना मीं ? कबूल केलें होतें ना तें सांगणें ? अगदी स्पष्टपणे कबूल केलें होतें ना ? "

" हो ! " नाकबूल करणें कसें शक्य होतें ?

" हो ! म्हणे हो ! मग त्याप्रमाणे वागायला नको ? स्वतः स्वयंपाक करून जेवायचें असेल तर आमच्या घरांत रहायचें नाही. घर सोडून दुसरी-कडे जा, मग कांहीहि करा. "

" अहो, सगळे शब्द का असे खरे मानायचे असतात ? अशाने तर सगळा गोंधळ होईल "

" मग शब्द कशाकरतां वापरायचे असतात ? फसवण्याकरतां ? बन-विण्याकरतां ? चकवाचकवी करण्याकरतां ? अन् तसें म्हटलें की पुन्हा म्हणायचें, मीं काय चकवलें ? "

" पण हा का एक दोन दिवसांचा प्रश्न आहे ? मला पुष्कळ दिवस एकट्यानेंच राहायचें आहे ! "

" एक दिवस असो की एक वर्ष असो ! काय फरक पडतो ? एक दिवस बापाला बाप म्हणायचें, वर्षभर नाही असं तुमच्या नव्या शिक्षणांत सांगितलें आहे वाटतें ? "

" नव्या शिक्षणांत सांगितलें आहे—आपल्याकरतां परक्याला त्रास देऊं नये. "

" मुलगा बापाला परका मानतो का त्यांत ? घरच्यासारखें म्हणायचें अन् दुसरा, परका असें करायचें ? हातचे काढून ठेवायचे ? आम्हांला जमत नाही हें ! "

" बरें, चुकलें माझें ! " उगीच शब्द वाढायला नकोत म्हणून मीं एकदम म्हटलें.

" आता शहाणपण सुचलें ! हेंच पहिल्याने सुचलें असतें तर...आता संध्याकाळपासून तिकडे जेवायला जायचें ! श्रीधर, यांच्याशिवाय जेवायला एकट्याने कधीं बसायचें नाहीस तूं ! लक्षांत राहील ना ? नाहीतर म्हणशील, विसरलों. "

" संध्याकाळचें करून ठेवलें आहे मीं. "

" अरे, कुत्र्याचें शेपूट वांकडेंच का ? काय केलें होतें ? खिचडी ? श्रीधर, तो भिकारी ओरडतो आहे. नेऊन घाल त्याला सारी खिचडी ! पोट भरूं दे त्याचें तरी बिचाऱ्याचें ! "

श्रीधरने भिकाऱ्याला खिचडी देऊन टाकली. मी नुसता टकमक पाहात राहिलों. खिचडी भिकाऱ्याला देऊन टाकल्याचें पाहिल्यावर जसे शेट आले होते तसेच तरातरा निघून गेले.

आणि माझ्या मनांत असा विचार-विकारांचा गोंधळ माजला—आपल्या विचारसरणींत चूक तर नव्हती ना ! डोळ्यांवर झांपड लावलेल्या घाण्याच्या बैलाप्रमाणे तर आपण पाहात नव्हतों ना ? जें बोलायचें, सांगायचें तें स्पष्ट, हातचे राखून ठेवायचे नाहींत या वृत्तीमुळेच यांच्याविषयीं विपरीत समज झाले नसतील ना ? आंत एक बाहेर दुसरें असें मुळींच नाही ! कोणाला रुचेल की नाही हें पाहायचें नाही, जें वाटेल तें बोलून मोकळें व्हायचें ! त्यामुळेच पुष्कळ लोक नाराज झालेले ! पण त्याची पर्वा नाही, असा स्वभाव ! नारळाच्या कठीण कवचीचा छेद केल्याशिवाय आंतील गोड खोबऱ्याचा लाभ होणें कठीण ! या फटकळ, तुसड्या, तापट माणसाच्या हृदयांत खरोखरच इतक्या कोमल मधुर भावना असतील का ?

असाव्या असें वाटतें.

आणि चार-आठ दिवसांतच मला त्या भावनांचें नकळत ओझरतें दर्शन झालें.

मी नदीवरून जरा उशीराच फिरून आलों होतों. येतांना शेटच्या खोलीजवळून येत असतां आंतील भाषण सहज कानांवर आलें. सहज आंत

डोकावून पाहिलें. त्यांचा पूर्वीचा सालदार व त्याची बायको शेटजीपुढे जरा अंतरावर बसलीं होतीं. बाई रडत होती. मी कान देऊन ऐकूं लागलों.

" जा, आता कांही करतां येणार नाही. जप्ती आल्याशिवाय राहणार नाही. पैसे न्यायला पाहिजेत, पण देतांना चुकवाचुकव करायची? उद्या भांडींकुंडीं बाहेर निघाल्याशिवाय राहणार नाहीत. माझ्या हातांत कांही नाही ! "

" मग मी मुलाबाळांच्या तोंडांत कसा घास घालूं? काय देऊं त्याच्या भुकेल्या तोंडीं ? "

" माझीं हाडं ! "

" बाप्पा, मी तुमच्या मुलीसारखी. गरीबांना अन्नावरून उठवूं नका."

शेटनी क्षणभर विचार केला, अन् सांगितलें, " जा, उद्या जप्ती येणार नाही. पुढेहि केव्हाच नाही. तुम्हांला देतां येतील तेव्हा पैसे द्या. तुमच्यावर सोपवितों मी सारें. वाटलें तर द्या, नाही तर देऊं नका ! "

" मायबाप ! " बाई पुढे होऊन त्यांचे पाय धरूं लागली.

" नाटक पुरे कर आता ! तुझें काम झालें ना? चालती हो ! मुलगी कधी बापाचे असे पाय धरते का ? "

मी हळूच निघून आलों.

पण मला नवी दृष्टि लाभली होती. जगाकडे केवळ वरवर पाहून दिशाभूल होते, खरें कळत नाही. पुष्कळदा जें जसें दिसतें तसें तें नसतें, हें मला अनुभवाने समजून आलें.

दुसऱ्या दिवशीं मी मुद्दाम शेटच्या खोलींत गेलों. त्यांना नवल वाटलें. मी त्यांना टाळतों हें त्यांच्या लक्षांत आलें होतें. त्यांच्या खोलींत तर मीं कधींच पाय ठेवला नव्हता.

मीं एकदम म्हटलें, धाडसानें म्हटलें,

" आम्हांला काल संध्याकाळची हकीकत कळली बरं का ! "

" कोणती ? काय झालं संध्याकाळीं ? "

" त्या सालदाराची आणि त्याच्या बायकोची हकीकत. "

त्यांनी चमकून माझ्याकडे पाहिलें. त्यांना कल्पना आली. मला सगळें कळलें असल्याची.

" चूप, अगदी चूप ! त्याबद्दल कांही बोलायचें नाहीं बरें ! तोंडाला कुलूप ! " माझ्या तोंडावर हात ठेवीत ते उद्गारले.

तोंडाचें कुलूप आतां तीस वर्षांनी मी उघडीत आहें.

★

२

# दोन फणस

मी वर्गात कांहीतरी शिकवीत होतों, तोंच हेडमास्तरांचें बोलावणें आलें. मी गेलों तेव्हा त्यांच्याजवळ माझे तीन-चार सहकारी उभे होते. नेहमी माझ्याशी हंसत बोलणारे ते शिक्षक गंभीर चेहरा करून विचारमग्न झालेले दिसले. मला नवल वाटलें. थोडीशी भीतिहि वाटली.

हेडमास्तरांनी न बोलतां एक कागद माझ्या हातांत ठेवला. त्यावरून डोळे फिरवितांच मी एकदम गोंधळलों. माझें हृदय व शरीर थरारलें. साऱ्या गंभीर वातावरणाचा अर्थ मला कळला.

माझ्या बदलीचा हुकूम होता तो. नांदेड येथे—माझ्या कल्पनेप्रमाणे दूर एकीकडे असलेल्या गावीं-माझी बदली झाली होती. स्टेशनापासून तें गाव बरेंच दूर होतें. गावांतील लोकांशिवाय इतरांच्या दृष्टीने तें एक शिक्षेचें गाव समजलें जाई.

" गाव चांगलें संपन्न आहे. " एक सहकारी म्हणाले.

" संपन्न असलें तरी शिक्षकाला काय उपयोग? सारे बेपर्वा लोक आहेत. " तिकडच्या बाजूला पूर्वी असलेले एक शिक्षक म्हणाले.

" पाण्याचा फार त्रास आहे तेथे! एकतर नदीचें पाणी आणायचें; नाहीतर ८०-९० फूट खोल असलेल्या विहिरीचें पाणी काढायचें! "

" गावांत विहिरीहि एकदोनच आहेत. "

" अन् तीन माणसांशिवाय पाण्याचा पोहरा ओढणें शक्य नसतें. "

मी शिक्षा झालेल्या माणसाप्रमाणे सुन्न मनाने ऐकत होतों.

किनगावला माझी नेमणूक होऊन फक्त पांच महिने झाले होते. पण त्या पांच महिन्यांतहि मला त्या ठिकाणाविषयी आवड उत्पन्न झाली होती. आमचे हेडमास्तर श्री. नाईक म्हणून एक वयस्क गृहस्थ होते. मुलाप्रमाणे ते माझ्यावर प्रेम करूं लागले होते. शाळेतील इतर शिक्षक व गावांतील कांही माणसेंहि अत्यंत आपलेपणाने माझ्याशीं वागूं लागलीं होतीं. घर चांगलें मिळालें होतें. वर्गहि हवा तोच हेडमास्तरांनी दिला होता. त्यामुळे अगदी थोड्याच दिवसांत मी तेथे रमलों होतों.

आणि ध्यानीं-मनीं नसतां तो हुकूम आला होता. इतक्या लवकर बदली होईल ही स्वप्नांतहि कल्पना नव्हती. शिवाय नांदेडसारख्या गावीं आपल्याला जावें लागेल असें तर कधीच वाटलें नव्हतें. छायेमध्ये वाढलेल्या रोपाप्रमाणे दिवस गेले होते.

नुकताच मीं जीवनाला आरंभ केला होता. भावी आशा-आकांक्षांचे कल्पवृक्ष माझ्या मनांत नुकतेच कोठे मूळ धरूं लागले होते तोंच ते खुडून टाकले गेले. मनाचें पांखरूं आताच कोठे घरट्यांतून बाहेर पडून जवळपासच्या फांद्यांवर गाऊं लागलें होतें. आकाशांत भरारी मारण्याची त्याची उमेद होती. अचानक त्याचे पंख निष्ठुरपणे कापून टाकले गेले. त्याचा गळा आवळण्यांत आला. जीवन म्हणजे एक मधुर स्वप्न ही माझी कल्पना ! अचानक तें स्वप्न भंग पावलें. माझे डोळे पाण्याने भरून आले.

श्री. नाइकांनी पाठीवरून हात फिरवून धीर दिला. सर्वांनी सहानुभूति दाखविली. हिंमत दिली.

" तेथे भाऊराव इंगळे हेडमास्तर आहेत. फार चांगले गृहस्थ आहेत."

" हं ! "

" तेथे रमलांत की आमची आठवणहि येणार नाही तुम्हांला. "

" कसें शक्य आहे ? तुम्हांला मी कधीतरी विसरूं शकेन का ? "

" शिक्षकाचें जीवनच असें असतें ! असेंच फिरावें लागतें त्याला ! जरा कोठे जम बसतो न बसतो तोंच सारें सोडून नव्या गावीं नव्या वातावरणांत खेळ मांडावा लागतो. "

" आल्या प्रसंगाला धैर्याने, हंसतमुखाने तोंड दिलें पाहिजे. मनाचा दुबळेपणा दिसूं देतां कामा नये ! शाळा मोठी आहे. कदाचित् तेथे तुम्हांला

अधिक वाव मिळेल ! ”

ज्या वेळीं मी भाड्यानें गाडी मिळेल का म्हणून तपास करूं लागलों, त्या वेळीं गावच्या पाटलाने माझी चांगलीच हजेरी घेतली.

“ मग आमचा उपयोग काय ? आम्ही असतां तुम्ही भाड्याचें गाडें नेणार ? केव्हा गाडें-बैल पाहिजे तें सांगा ! ” मग त्यांतल्या त्यांत समाधान वाटलें.

सामान तसें फारसें नव्हतेंच ! वळकटी, बाज व एक भांड्यांची पेटी. पेटींत भांडींहि जेमतेम अडचण भागवतील इतकींच होतीं. नोकरीला सुरुवात करतांना शेजाऱ्याकडून तीस रुपये उसनवार घेऊन घेतलेलीं भांडीं अशीं कितीशीं असणार ? पण ह्या सामानाकरताहि गाडें हवेंच होतें.

दोन-तीन दिवसांनी जड अंत:करणाने सर्वांचा निरोप घेतला. गावच्या पाटलांनी दोन बैल वेठीला धरून माझ्या हवालीं केले.

म्हातारे थकलेले बैल पाहून ओढून ताणून आणलेला माझा उत्साह व धीर बराचसा खचला. चवदा-पंधरा कोसांची मजल मारावयाची होती. रस्ता वेडावाकडा होता. तापीच्या घळ्यांतून, दऱ्याखोऱ्यांतून जावयाचें होतें. वाटमारीचा सुळसुळाट होता. पण आता इलाज नव्हता. निघणें भाग होतें.

गाडें हाकायला दामू या नांवाचा एक विद्यार्थी तयार झाला. सातव्या इयत्तेत शिकत होता तो. सोळा-सतरा वर्षांचें वय होतें त्याचें ! माझ्यापेक्षा तीन-चार वर्षांनीच लहान होता, पण बांध्याने थोराड असल्यामुळे माझ्या बरोबरीचाच, किंबहुना मोठाच दिसत होता. सकाळीं पांच वाजतां आम्हीं गाडें जुंपलें. “ वंजीच्या खेपेला ” निघाल्याचें अवसान आणून दोन वीरांनी एकमेकांला धीर देत उत्साहाने वाटचाल सुरू केली.

कांहीं वेळ गाडें हाकतांना दामूला बरें वाटलें, पण नंतर त्याचें अवसान ओसरूं लागलें. बैल आपल्या लहरीने पाय उचलीत होते. त्यांना मारपीट करूनहि उपयोग होत नव्हता. शेवटीं त्यांच्याच कलाने त्यांना चालूं देणें भाग पडलें. कसेंतरी आम्ही मार्गक्रमण करीत रस्ता काटूं लागलों.

“ दामू ! कसे रे पोचणार आपण मुक्कामाला ? ”

“ गुरुजी, बैल पाहिल्यावरच मी म्हणणार होतों. पण... ”

“ मला कल्पना आली नाही रे, बैल इतके थकलेले असतील अशी. ”

" मुक्काम करूं नाहीतर कोठेतरी ! "

" पाहूं. कांहीतरी केलें पाहिजे ! "

उन्हाळ्याचे दिवस होते. सूर्य जसजसा वर येऊं लागला तसतसे त्याचे किरण अंगाला झोंबूं लागले. सूर्य डोक्यावर आल्यावर तर तो चांगलीच आग ओकूं लागला. आम्ही चांगलेच तापून निघालों. पोटांतील आगहि भडकली. बैलांनाहि पाऊल उचलणें जड जाऊं लागलें. त्यांना चारा नसला तरी पाणी पाजणें अवश्य होतें. आम्ही त्या वेळीं मंगळूरजवळ आलों होतों. येथे कोठेतरी थांबावें व बैलांना जमलें तर चारा-पाणी घालावें, आपणहि पोटांतील आग शमवावी, असा आम्हीं विचार केला.

रस्त्याच्या बाजूलाच एक मोठें अंगण व घर दिसलें. अंगणांत आड होता. जवळच पोहरा व दोरहि दिसत होता. घराच्या ओटीवर एक म्हातारे गृहस्थ बसलेले दिसले. खूप वय झालेलें दिसत होतें त्यांचें. चेहरा राकट, गंभीर दिसत होता. त्यांच्या त्या पांढऱ्या मोठ्या मिशा व उग्र चेहरा पाहून आम्ही थोडें चरकलों; बोलावें की न बोलावें असा विचार क्षणभर डोक्यांत येऊन गेला. पण प्रसंगाने आम्हांला धीट बनविलें. मीं पुढें जाऊन त्यांना विचारलें, " आजोबा, आम्ही थोडा वेळ येथे गाडें सोडून न्याहारी करूं का ? "

" या, या. तेथे सोडा गाडें. कोठून आलांत रे ? "

" आम्ही किनगावहून आलों. "

" कुठे जायचें आहे तुम्हांला ? "

" नांदेडला माझी बदली झाली आहे. "

" म्हणजे मास्तर आहेस तूं ! नाही का ? " आपण मोठाच शोध लावला अशा थाटांत आजोबा म्हणाले.

तेवढ्यांत दामूने गाडें आंत घेऊन बैल सोडले. बैलांना पाणी पाजून झाल्यावर चाकांनाच त्यांना तो बांधूं लागला.

" अरे ! तेथे उन्हांत काय बांधतोस त्यांना ! पुष्कळ ऊन खाल्लें त्यांनी. पलीकडच्या सावलींत बांध. अन् हें पाहा, तें कोपऱ्यांतलें गवत घाल त्यांच्यापुढे ! "

" आम्हीं आणला आहे चारा. "

" पुढे उपयोगाला येईल तो. जनावरें उपाशी दिसतात अगदी. ती कडब्याची पेंडीहि तोडून टाक."

बैलांपुढे चारा टाकून व हातपाय धुऊन आम्ही पडवींत आलों. म्हातारे-बुवांनी एक सतरंजी आमच्याकरतां टाकली. मी सतरंजीवर बसलों. दामू फराळाचा डबा घेऊन आला. निघतांनाच आम्हीं डबा करून घेतला होता. लांब जायचें, रस्त्याने खायला मिळणें कठीण, म्हणून अशी तयारी करून आम्ही निघालों होतों.

म्हाताऱ्याने थोड्या चमत्कारिक नजरेने दामूकडे व त्याच्या हातांतील डब्याकडे पाहिलें.

" ठेव रे तो डबा गाड्यावर ! कशाला आणला येथे ? "

" आजोबा, आम्ही जरा फराळ करतों ना येथे. करूं ना फराळ ? खूप भूक लागली आहे ! "

" आधी ठेवून ये तो डबा गाड्यावर ! "

म्हाताऱ्याच्या शब्दांत अशी जरब होती ! काय करावें आम्हांला उमजेना. दामू माझ्याकडे व म्हातारबुवाकडे आळीपाळीने पाहूं लागला. मी गोंधळून गेलों. बैल उपाशी आहेत हें ह्या म्हाताऱ्याला जाणवलें; अन् आमचीं आंतडीं तुटत आहेत याची कदर त्याला नसावी ! खरोखरच उन्हाने व भुकेने आमचे चेहेरे कोमेजून गेले होते. आम्ही व्याकुळ झालों होतों. तेवढ्यांत म्हातारा पुन्हा गरजला,

" ठेवून ये तुझा डबा गाड्यावर ! ऐकूं आलें नाहीं का मी काय सांगतों तें ? "

" आजोबा, आम्हांला खूप भूक लागली आहे ! "

" दिसतें आहे तें मला. माझे केस कांही उन्हाने पांढरे झाले नाहीत."

" मग.... ! तुम्हांला पहिल्यानें विचारलें ना मीं ! "

" होय रे ! सगळें विचारलें. ठेवून ये रे तो डबा. बसा येथें सतरंजीवर. "

म्हाताऱ्याच्या शब्दांत विलक्षण तिखटपणा होता. काय करावें तेंच आम्हांला कळेना. गाडें जुंपावें व बाहेर पडावें असें आम्हांला वाटूं लागलें. दामू वळलाहि. मींहि निघावें असें ठरविलें.

" मग आम्ही जातों तर..."

" कोठें जातां रे? या सतरंजीवर बसायला सांगितलं ना तुम्हांला? ऐकूं आलें नाही काय?"

त्या गोंधळलेल्या मनःस्थितींत मी सतरंजीवर बसलों. दामूहि आला. काय होईल तें पाहावयाचें असें नाइलाजाने मीं ठरविलें. चूक झाली होती या वाड्यांत शिरण्याची. आता उपाय नव्हता. म्हाताऱ्याच्या तोंडाकडेहि पाहण्याचें धैर्य आम्हांला होईना. नव्या सूनबाईप्रमाणे संकोचाने जमिनीकडे पाहात आम्ही बसलों.

अन् खणखणीत आवाजांत म्हातारा मोठ्याने म्हणाला, " सूनबाई, जरा घाई कर. पोरें अगदी उपाशी आहेत!" आमच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. आमची भीति क्षणांत दूर पळाली, पण संकोच मात्र अधिकच वाढला. म्हाताऱ्याविषयीं मनांत एकदम आदर उत्पन्न झाला. असें होतें तर म्हाताऱ्याच्या मनांत!

पण इतका फायदा घेणें बरें नव्हतें.

" आजोबा, कशाला त्रास करून घेतां? आमच्याजवळ सारें आणलेलें आहे!"

" मला माहीत आहे रे!" स्वर असा होता की, जणूं त्यांना म्हणावयाचें होतें, ' गप्प बसा. बोलूं नका.'

" पण, आजोबा—" मीं धीर धरून बोलण्याचा प्रयत्न केला.

" अजून तुझा पण आहेच का?" म्हातारा ताडकन् म्हणाला, " अरे, माझ्या शब्दाला उलटून उत्तर देण्याची माझ्या नातवांनाहि हिंमत नाही! तुम्ही काय निराळे आहांत होय?"

आजोबांच्या बोलण्याने माझा बराच संकोच दूर झाला. तरी त्यांनी इतका त्रास घ्यावा, हें मनाला पटेना. भीडमुर्वत चेपल्यामुळे मी धाडसाने म्हणालों,

" आजोबा, तुम्हांला उगाच त्रास..."

" काय रे! अजून कुरकुर आहेच काय? अरे वेड्या, ही तुमची सोय नाही. हा माझाच मान आहे. तुम्हांला कांहीच कळत नाही. अगदी पोरें आहांत तुम्ही! बिलकुल समजत नाही तुम्हांला."

माझ्या अहंकारावर तो आघात होता. मी थर्ड इयर ट्रेन्ड होतों. मोठ्या सन्मानाने मी परीक्षा पास झालों होतों आपण बुद्धिमान, समंजस आहोंत अशी मला जाणीव—घमेंड—होती; अल्पवयांत बुद्धीच्या जोरावर स्पृहणीय यश मिळविण्याची खात्री मनांत सदैव घर करून होती. आणि म्हातारा म्हणतो, ' मला समजत नाही; मला समज नाही. '

मी जरा आवेशानेच म्हणालों, " आम्हांला समज नाही ? काय समजत नाही आम्हांला आजोबा ? "

" अरे वेड्यांनो, माझ्या ओसरीवर बसून तुम्ही बरोबर आणलेला डबा उघडून त्यांतलें अन्न खाणार काय ? मग माझी माणुसकी काय राहिली रे ? माझ्या दारीं तुम्ही आलांत अन् बरोबर आणलेलें फराळाचें माझ्या दाराशीं बसून खाणार ! काय म्हणतील रे लोक मला ? बाळांनो, मी गृहस्थ आहें. तुम्हांला माझी अब्रू का घालवायची आहे ? तुम्ही येथें आलांच नसतां, तर मी कांही तुम्हांला बोलवायला आलों नसतों; पण येथे आल्यावर तुमच्या डब्यांतलें शिळेंपाकें मीं तुम्हांला खाऊं दिलें तर... ! मला अतिथिधर्म कळतो बरें ! तुम्ही चारचौघांत माझी मान मला खालीं घालायला लावणार का ? "

काय अन् कसें बोलायचें यावर ? म्हाताऱ्याने म्हटलें तें खरेंच होतें. ' आम्हांला अजून समजत नव्हतें ! ' पुस्तकांतलें खूप माहीत होतें ! पण जगांतल्या ज्ञानाचा अजून ओनामाहि नव्हता. पुस्तकी ज्ञान आणि वास्तवता यांचा मेळ कसा घालावा हेंच तर अजूनहि कळायचें होतें. स्वप्नांत दिलेलें दान अतिथीला प्रत्यक्षांत देणारे हरिश्चंद्र पुराणांत आहेत. पण व्यवहारांत न मागतां आतिथ्यधर्म एवढ्या कटाक्षाने पाळला जात असेल अशी आम्हांला कल्पना नव्हती. देणें क्षुल्लक असेल, पण त्यामागचें मन विशाल होतें ! रुक्ष, उग्र, ओबडधोबड चेहऱ्याच्या या माणसाचें हृदय किती गोड आहे, मोठें आहे हें कळून मन आदरभक्तीने भरून आलें. फणस फोडल्याशिवाय त्यांतील गोड गऱ्यांचा आस्वाद घेतां येत नाही. फणस कोकणांतच पिकतात, पण खानदेशांतहि—तापीच्या खोऱ्यांत—फणसांची लागवड होत असते हें मला कळून आलें.

कांहीतरी बोलायचें म्हणून मी म्हणालों, " पण खूप दूर जायचें आहे

आम्हांला ! वेळ झाला तर— ”

“ मग थांबून सकाळीं जा की ! ”

जास्त बोलायची सोय नव्हती. जें बोललों तेंच अधिक झालें होतें. बैल दुसऱ्याचे आणलेले. दिवस मोडणें कसें शक्य होतें ? पण बोलायचें कसें ?

आजोबांच्या सूनबाईने झटपट स्वयंपाक केला. तेवढ्यांत तिने वरण-पोळीचा बेत केला. जें जें होईल तें तें मुकाट्याने पाहावयाचें आम्हीं ठरविलें. परिस्थितीला तोंड देण्यांतच शहाणपण आहे हें कळून आलें. आजोबांशीं वाद घालणें म्हणजे वाऱ्याशीं झगडणें. त्यापेक्षा वारा वाहील तशी पाठ फिरविणेंच योग्य वाटलें.

जेवण झालें. आजोबांनी ‘ उपाशीं रहाल बरं का रे ! ’ म्हणून म्हणत समोर बसून आग्रह केला.

सारें आटोपल्यावर आजोबांचा निरोप घेतला. बैलांनाहि विसावा मिळाला होता. त्यांचें चारापाणीहि झालें होतें. या साऱ्या गोंधळांत तीन वाजले. अजून अर्धा रस्ता पायाखालीं घालावयाचा होता. अधिक थांबणें शक्यच नव्हतें.

आजोबा गाड्याजवळ आले. “ परत जातांना अवेळ झाली तर या बरं रे पोरांनो ! तुम्हांला कळत नाही म्हणून सांगतों ! ”

त्यांच्या ओबडधोबड रूक्ष चेहऱ्यावर समाधानाचा एक गोड भाव तरंगून गेला असें मला वाटलें. दूर दिसेल तोंपर्यंत आजोबा आमच्या गाड्याकडे पाहात होते. माझीहि नजर त्यांच्या चेहऱ्यावर खिळून राहिली होती.

●

बैलांनी आमची कुवत ओळखली होती म्हणून म्हणा किंवा त्यांच्या शक्तीबाहेरचें काम त्यांच्या अंगावर पडलें होतें म्हणून म्हणा, ते कमालीच्या मंद गतीने चालत होते. आम्हांला वाटलें होतें, आता बैल ताजेतवाने झाले आहेत. ते लवकर पाय उचलतील. पण आमचा तो भ्रम दूर झाला. त्यांच्या चालण्यांत कांही फरक पडला नाही.

आम्ही अट्टाहास करीत होतों. आमचीं अंतःकरणें खालीवर होत होतीं. जायचें तर खूप लांब होतें. तापीच्या खोल खाड्यांतून जायचें होतें. त्या कल्पनेनेच अंगावर कांटा उभा राहात होता. दिवसा-उजेडीं त्यांतून एकट्या-दुकट्याला प्रवास करणें धोक्याचें होतें; मग अंधार पडल्यावर आमच्यासारख्या दोन पोरांना त्या खाड्या ओलांडून सुखरूप पलीकडे जाणें कसें शक्य होतें? रस्ता अनोळखी! आजूबाजूला घडलेल्या चोऱ्यांचीं, दरोड्यांचीं खरींखोटीं वर्णनें कानांवरून गेलेलीं! जीव मुठींत धरून आम्ही मार्गक्रमण करीत होतों.

मध्येच एके ठिकाणीं चढावावर एक बैल एकदम बसला. दोन-चार रपाटे पाठीवर ओढूनहि तो उठण्याचें लक्षण दिसेना! सूर्याला घाई झाली होती. आम्ही कासावीस झालों. रडकुंडीला आलों.

शेवटीं मीं मूठभर गवत हातांत घेतलें. बैलाच्या तोंडापुढें तो घांस जरा अंतरावर धरला. बैल धडपडून उठला. घांस घेण्याकरतां त्याने पाऊल पुढे टाकलें. मीं त्याच्या तोंडांत घास दिला. दुसरी मूठ हातांत धरून जरा पुढे उभा राहिलों. बैलाने चालायला सुरुवात केली. आमचा रथ चालू झाला.

कसेंतरी पांच वाजण्याच्या सुमारास आम्ही गोरगावलें येथे पोंचलों. पुढे तापीची खाडी! तिच्यापलीकडे चार मैलांवर नांदेड! कसें जायचें? बैल गोगलगाईंच्या गतीने चालत होते. ते केव्हा अडतील हें सांगतां येत नव्हतें. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळपर्यंत तरी मुक्कामाला पोंचतों की नाही असें वाटूं लागलें!

परिस्थिति माणसाला शहाणपण शिकविते, मार्ग सुचविते. गावाजवळ आपले बैल हाकीत एक गृहस्थ आपल्या खळ्याकडे जातांना दिसला.

"अहो भाऊ! पाटील!" मीं त्यांच्याजवळ जाऊन त्यांना हांक मारली.

"जी! काय म्हणतां?" माझ्याकडे कुतूहलाने पाहात थोड्या तुटकपणे तो गृहस्थ म्हणाला.

"आम्हांला नांदेडला जायचें आहे!"

"मग जा की? हा रस्ता सरळ जातो पुढे!"

"आमचे बैल थकले आहेत! एखादी जोडी मिळेल का भाड्याने

नांदेडपर्यंत ? " मीं एकदम जें विचारायचें तें सरळ विचारलें.

" न मिळायला काय झालें ? भाडें मिळाल्यावर कोणीहि येईल. "

" मग आम्हांला द्या ना कोणी मिळवून ? "

" काय भाडें देणार ? "

" जें योग्य असेल तें भाडं आम्ही देऊं ! "

" काय देणार तें सांगा. मीच येतों तुम्हांला पोंचवायला ! आतां पोंचवून देतों. "

" तुम्हीच सांगा काय घेणार तें ! "

" हें पाहा ! तीन रुपये तुम्हीं भाडं द्यायला पाहिजे ! पण मी पावणेतीन रुपये तुमच्याकडून घेईन. पाहा परवडत असलें तर ! "

" आम्ही अडीच रुपये देऊं. पोंचवून द्या आम्हांला तेथपर्यंत ! "

" हें पाहा, मीं अगोदरच चार आणे कमी सांगितले. पावणेतीन रुपयांच्याखालीं एक पैसा घेणार नाही. द्यायचें तर द्या, नाहीतर दुसरा पाहा अडीच रुपयांत जाणारा ! " तो गृहस्थ चालूं लागला.

" अहो, पण फक्त चारच आणे कमी म्हणतों ना आम्ही ! "

" चार दिडक्या कमी नाही ! तुमच्यावर कांही ओझं टाकलं नाही कुणीं ? घासाघीस कशाला पाहिजे ? "

इलाज नव्हता कांही ! आम्ही अगतिक होतों. तापीच्या दऱ्याखोऱ्यांतून त्या कातर वेळेला जाण्याची आम्हांला हिंमत नव्हती; आणि हिंमत असती तरी बैलांची पाय उचलायची तयारी नव्हती.

पण त्या माणसाच्या चेहऱ्याकडे पाहून धीर वाटला. धिप्पाड, सरळ-सोट, ताठ मानेचा कणखर गडी दिसत होता तो ! रात्र बेरात्र झाली तरी निःशंक मनानें त्याच्याबरोबर कोठेहि जाण्याची हिंमत वाटली त्याच्याकडे पाहून ! त्याच्या आधारावर सुखरूपपणे पोचण्याची मनाला खात्री वाटली.

" चला भाऊ ! पावणेतीन रुपये देऊं आम्हीं ! ताबडतोब निघूं म्हणजे लवकर मुक्कामीं पोंचतां येईल. "

" निघायला काय वेळ ? आता पांच मिनिटांत निघूं. "

त्याने आपल्या सालदाराला—गड्याला बोलावलें. आमच्या गाड्याचे

बैल सोडून ते त्याला खळ्यांत नेण्यास सांगितलें. त्यांना नीट चारापाणी करण्याबद्दल ताकीद दिली. घरीं निरोप देण्याची सूचना केली.

आपली जोडी त्याने आमच्या गाड्याला जोडली. आम्ही गाड्यावर बसलों. त्यानें बैलांना इशारा दिला. झपाट्याने बैल निघाले. आमचें मन फुललें, चेहरे खुलले. सर्व श्रमांचा, संकटांचा परिहार झाल्यासारखें वाटलें. मनावरचा भार दूर होऊन मन निःशंक झालें !

तापीच्या खोऱ्यांतून जाण्याची आम्हांला आतां भीति वाटली नाही. खाड्यांतून जात असतांनाच अंधार पडला; पण आता त्याची आम्हीं पर्वाच केली नाही. त्या भयानक खाड्या पाहून आपण फार शहाणपणा केला असें मनाला पटल्याशिवाय राहिलें नाही.

रात्रीं आठाच्या सुमारास आम्ही नांदेडला पोंचलों. सरळ हेडमास्तरांकडे—भाऊराव इंगळ्यांच्याकडे—गेलों. त्यांनी गाड्यांतून सामान उतरून घेतलें. घराच्या एका कोंपऱ्यांत सारें सामान मावलें.

" जेवण करून घ्या आतां. मग बसूं, बोलूं. " भाऊराव म्हणाले. लवकर निघायला हवं म्हणून घाईघाईने जेवण आटोपलें. जेवण होतांच ' चला परत निघूं या ' म्हणून पाटील म्हणूं लागले. पण भाऊरावांनीं व शेजारच्या म्हाताऱ्या माणसांनी ती कल्पना मोडून काढली.

" आता या भलत्याच वेळेस कोठे जातां ? " भाऊराव म्हणाले.

" आम्हांला जायलाच पाहिजे. पाटीलबुवा तसेच निघाले आम्हीं म्हटल्याबरोबर ! " मी पाटीलबुवांकडे पाहात म्हणालों.

" पण रात्रीचें खाड्यांतून जाणें धोक्याचें आहे. रस्ता सुरक्षित नाही. वेळ सांगून येत नाही. "

" पण खाड्यांतून पार व्हायला असा कितीसा वेळ लागणार आहे ? बैल चांगले आहेत. त्यांना नुसता इशारा पुरतो. " पाटीलबुवा म्हणाले.

" आम्हांला नाही बरं वाटत तुम्हीं या वेळेला निघावं हें. वेळेला सतावूं नये. "

' काळवेळ सांगून येत नसते. विषाची परीक्षा पाहूं नये, ' असें सर्वांचें मत पडलें. तोंपर्यंत तीनचार शिक्षकहि तेथे आले होते. त्यांनीहि दुजोरा दिला. पाटीलबुवांचा नाइलाज झाला. आमच्या मनासारखें होत होतें.

आम्हांला कोठे रात्रीं निघावेंसें वाटत होतें ! पण आम्ही तसें दाखवीत नव्हतों. पाटीलबुवा काय म्हणतील ही धास्ती आम्हांला वाटत होती. आम्ही त्यांच्या चेहऱ्याकडे पाहात होतों. त्यांना सर्वांना आग्रह मोडणें शक्य झालें नाही.

आम्हीं तांबडें फुटण्याआधींच परत निघावयाचें ठरविलें. बैलांच्या चारापाण्याची व्यवस्था केली. परतायची सर्व तयारी करून थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या व लवकर उठावयाचें म्हणून अंथरुणावर अंग टाकलें.

दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटे आम्ही परत निघालों. रस्त्यानेच सूर्योदय झाला. आठ-साडेआठच्या सुमारास तापीच्या खाड्या ओलांडून आम्ही गोरगावलें येथे पाटलांच्या गावीं पोंचलों.

गाडें त्यांच्या खळ्यांतच नेलें. भाऊंनी बैल सोडले. आम्हीं भाडें त्याच्या हातांवर ठेवलें. दामू आमचे बैल आणायला जाऊं लागला, तोंच त्या गृहस्थाने दामूला अडविलें.

आपल्या सालदाराकडे वळून भाऊ म्हणाले,

" काय रे, चाराबिरा नीट घातलास ना बैलांना ? "

" भाऊ, असें कधी होईल का ? पाहा ना बैलांपुढे किती ' गाळण ' पडली आहे. "

" ढेप घातली होतीस ना संध्याकाळीं ? दाणापाणी वेळेवर मिळालें ना त्यांना ? मुकीं जनावरें ! त्यांना कांही मागतां येत नाहीं ! "

" सारें तुम्हीं सांगितल्याप्रमाणे झालें. पाणी पाजून तर आत्ताच आणलें ! "

" थोडें गवत घाल त्यांच्यापुढे. "

" आता कशाला गवत घालतां भाऊ ? परवानगी द्या आम्हांला. दामू, जोड बैल आपले. "

पण तेवढ्या वेळांत त्यांच्या माणसाने बैलांपुढे गवत घातलें होतें. आमच्या बोलण्याकडे लक्ष देण्याची त्याला जरूर वाटली नाही.

" राहूं दे ! त्यांना जरा चारा खाऊं दे ! " दामूला थांबवीत भाऊ म्हणाले.

" पोटभर चारा मिळाला आहे त्यांना ! आम्हांला आतां जाऊं द्या ! उन्हं जाळूं लागण्यापूर्वी बरेंच दूर जातां येईल सकाळच्या प्रहरांत ! "

" जाल हो ! आतां कसली घाई ? "

" पण लवकर घरीं पोंचलेलें बरें ! आमचे बैल किती चांगले आहेत तुम्हांला माहीतच आहे. त्यांच्या लहरीवर आमचा प्रवास ! "

" हें पाहा, जेवल्याशिवाय तुम्हांला जातां येणार नाही."

" फार वेळ होईल भाऊ ! आम्हांला जाऊं द्या आता ! तुमच्या माणसाने बैलांची व्यवस्थाहि छान ठेवली. उपकार झाले तुमचे आमच्यावर !"

" उपकार कसले ! अन् उपकार मानतांच तर आणखी उपकार करतों समजा ! अशा वेळीं जेवल्याशिवाय कोण जाऊं देईल तुम्हांला ? "

भाऊकडे पाहिलें. त्या माणसाची समजूत होणें कठीण आहे, हें चटकन् पटलें. आम्हांला थांबणें भाग पडलें.

दीड दोन तास गेले. जेवायची तयारी व्हायला किती वेळ होता याची कल्पना येईना ! ओसरीवर बाज टाकून आम्हांला तिच्यावर बसवून पाटील-बुवा गेले. तेंहि लवकर येण्याचें लक्षण दिसेना. आमचा जीव खालीवर होऊं लागला. आपण थांबून निष्कारण वेळ घालविल्याबद्दल स्वतःवरच मी चिडलों.

दहा वाजण्याच्या सुमारास पाटील आले. जेवायची तयारी झाली होतीच. हातपाय धुऊन आम्ही तिघेहि जेवायला बसलों.

ताटाकडे पाहतांच मी चकित झालों. जवळच्या प्रेमाच्या नातलगा-प्रमाणे पाटीलबुवांनी सारी व्यवस्था केली होती. पुरणपोळीचा बेत होता. इतके श्रम घेतल्याचें पाहून माझें मन संकोचाने बावरून गेलें.

" किती त्रास घेतला तुम्हीं ! कशाला एवढे श्रम घेतले ? साधी चटणी-भाकरी केली असती... "

" तुम्ही पुन्हा कधी माझ्याकडे जेवायला याल काय ? मग तुमच्यापुढे चटणीभाकरी कशी ठेवूं ?. आम्हांला कसें बरें दिसलें असतें तें ? "

" पटत नाही मनाला हें ! "

" न पटूं दे ! काढून टाका मनांतून सारें, अन् जेवणाकडे नीट लक्ष द्या ! कसूर करूं नका ! संकोच बाळगूं नका ! गोड करून घ्या ! ! "

" गोडच आहे सारें. "

जेवतांना घरच्या म्हशीचें लोणकढें तूप इतकें पडलें पानांवर की...मी पुष्कळ ठिकाणीं जेवायला गेलों होतों त्यापूर्वी ! सासऱ्याकडेहि जेवणाचे प्रसंग आले होते कित्येकदा ! पण इतकें तूप कोठेंहि पानावर पडलें नव्हतें. हात धुतांना कांही केल्या ते स्वच्छ होईनात !

यथेच्छ जेवण झालें. पाटीलबुवांनी दिलेलें सुपारीचें खांड चघळीत चघळीत आम्ही खळ्यांत गेलों. पाटलांनीच आमचें गाडें जुंपून दिलें.

" येतों भाऊ, फार तसदी दिली तुम्हांला ! "

" तसदी कसली ? सांभाळून जा हं ! रामराम ! "

" रामराम. "

आम्हीं त्यांचा निरोप घेतला व गाडें चालूं केलें.

मनांत मात्र विचारांचें वादळ सुरू झालें. भाडयांतील एक पैसाहि कमी न करणारा हा माणूस असा उधळेपणा (हो ! एक प्रकारचा उधळेपणाच होता तो !) करायला कां प्रवृत्त झाला ? अगदीं तोडून बोलणारा–कठोर वाटणारा हा गृहस्थ, इतक्या प्रेमाने कां धडपडला ? त्याच्या मनाचा थांगपत्ता आपल्याला लावणें शक्य आहे काय ? भाडयाच्या रकमेइतका खर्च तर त्याचा खात्रीने झाला असेल. बैलांना चाराच किती लागला असेल ! विचाराने मन शिणलें. सोडून दिले सारे मनांतले तर्ककुतर्क ! फणसामध्ये आंत आंत गोड गरे असतात. वरच्या सालपटाकडे पाहूं नये, लक्ष देऊं नये, असें मनाला पटवून गप्प बसलों.

आज या गोष्टीला सुमारें तीन तपांच्या वर काळ लोटला आहे; पण अजूनहि हे प्रसंग कालच घडल्याप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर उभे आहेत असें वाटतें. मला आजोबांचें अगर भाऊंचें नांवहि माहीत नाही. त्यांचीं नांवें जाणून घेण्याचा मीं कधी प्रयत्नहि केला नाही. ते आज हयात आहेत किंवा हें जग सोडून गेले याबद्दलहि मीं कधी शोध घेतला नाही. त्यांच्या गावावरूनहि मला कधी जाण्याचा प्रसंग आला नाही. तरी त्यांचे रूक्ष, कठोर चेहरे आतांच पाहिलेल्या माणसांप्रमाणे माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात, व त्यांच्या हृदयांतील कोमल भावांनी माझें मन बहरून त्यांच्या स्मृतींत कांही वेळ गुंगून जातें. फणसाचे गोड गरे जिभेवर ठेवल्याचा भास होतो. ★

३

# कुटुंबनायक

भिकू पाटलाच्या वाड्यांत घर मिळालें तेव्हा मला समाधान तर वाटलेंच, पण मनांतल्या मनांत थोडी भीतिहि वाटली. हा एवढा मोठा माणूस आपल्याशी कसा वागेल ? एक सामान्य मास्तर म्हणून तुच्छतेने आपल्याकडे पाहील की आपला योग्य मान ठेवील, अशी थोडीशी धाकधूक सारखी मनांत वाटत होती. पण त्यांचा थोडा परिचय झाल्यावर माझी भीति अनाठायीं ठरली. माझ्याशीं ते अतिशय प्रेमाने वागूं लागले. घरांतलाच–आपल्या कुटुंबांतीलच एक–असेंच मला समजूं लागले.

त्यामुळेच त्यांना मी अगदी जवळून पाहूं शकलों.

भिकू पाटलांना दोन गोष्टींचा विलक्षण अभिमान वाटत असे. एक आपल्या दप्तराचा व दुसरा आपल्या मुलीचा. त्या दोन गोष्टी त्यांचें जीवन-सर्वस्व होत्या. आपल्या मुलीच्या पाठीवरून जितक्या कोमल हळुवारपणे ते हात फिरवीत, तितक्याच कोमल हळुवार वृत्तीने ते आपल्या दप्तरावरून हात फिरवीत. मुलीकडे जितक्या प्रेमानें ते पाहात, तितक्याच, किंबहुना अधिकच प्रेमळपणाने ते आपल्या दप्तरावर नजर टाकीत.

या दोन जीवाभावाच्या गोष्टींमुळेच आपल्या जीवनांत पुढे चमत्कारिक पेंच निर्माण होईल अशी त्यांना कल्पनाहि नव्हती.

भिकू पाटील लेवा पाटीदार जमातीचे कुटुंबनायक होते. जमातीच्या पंचायतींत ठरलेल्या निर्बंधांची वादग्रस्त प्रश्नांवर जमातीने दिलेल्या निर्णयांची, सर्वांना माहिती देऊन त्यांची अमलबजावणी होईल अशी व्यवस्था

करण्याची जबाबदारी त्यांच्याकडे होती. जमातीच्या साऱ्या जुन्या-नव्या कागदपत्रांचें दप्तर त्यांच्या ताब्यांत होतें. जमातीची सारी घटना–इतिहास त्या कागदपत्रांवरून कळून येई. वर्षा दोन वर्षाआड जमातीची पंचायत भरून तिच्यामध्ये बहुमताने निरनिराळ्या वादग्रस्त प्रश्नांचा निकाल दिला जाई. निकाल द्यावयाचें अगर निर्णय घ्यावयाचें काम कुटुंबनायकाचें असलें तरी त्याला मुळीच स्वातंत्र्य नसतें. पंचांचा निकाल फक्त त्याल सांगावा लागतो. ह्या सर्व निर्णयांची नोंद होऊन दप्तरांत सारखी भर पडत असते.

हें दप्तर म्हणजे जमातीची घटना. तें सर्व जमातीचें हृदयसर्वस्व, अशी भिकू पाटलांची समजूत होती. या घटनेंतील सारे निर्णय जमातींतील प्रत्येक व्यक्तीने कटाक्षाने पाळले पाहिजेत, नाही तर सारी घडी विस्कटेल असा त्यांचा प्रामाणिक समज होता. वय झाल्यामुळे पंचायतीच्या जागीं हें अवघड दप्तर स्वतः नेणें त्यांना झेपत नसे; मोठ्या नाखुषीनेच तें ते दुसऱ्या-जवळ देत, पण स्वतःच्या नजरेपलीकडे त्या माणसाला ते कधीहि जाऊं देत नसत.

त्यांनी एक लहानशी खोली तयार केली होती. त्या खोलींत पुष्कळदा ते कागदपत्र पाहात बसलेले आढळत. एकदा ते असेच कागद चिवडीत बसले असतां मी तेथें गेलों.

कां कुणास ठाऊक, पण माझ्या तोंडून सहज बाहेर पडलें,

"जुनें जाउंद्या मरणालागुनि !"

त्यांनीं चमकून माझ्याकडे पाहिलें. कुशींत बाण शिरलेल्या पांखरा-प्रमाणे त्यांचा चेहरा विव्हळ झाला. व्यथित मनाने व्याकुळ स्वरांत ते म्हणाले,

"मरेल तेव्हां मरू द्या तें ! मुद्दाम मारूं नका आम्हांला."

मला फार वाईट वाटलें.

"क्षमा करा मला ! माझा तसा हेतु नव्हता."

"साऱ्यांनाच असें वाटूं लागलें आहेसें वाटतें !"

"यापुढे मला तरी तसें वाटणार नाही !"

निर्जीव कागदांवर एवढें प्रेम करणाऱ्या गृहस्थाचें आपल्या रक्तामांसाच्या एकुलत्या एक मुलीवर किती प्रेम असेल हें सांगावयास नकोच. सवड मिळेल तेव्हा ते आपल्या उतार वयांत लाभलेल्या या एकुलत्या एक मुलीशीं बोलत खेळत असावयाचे. कुटुंबनायकाचा गंभीरपणा ते एका क्षणांत तिच्या सहवासामध्ये विसरून जात. त्यांच्या बायकोचे व त्यांचे मुलीशी वागण्यावरून नेहमी खटके उडावयाचे. आमच्यासारख्या शेजाऱ्यांना ते नेहमीं ऐकायला मिळायचे. वास्तविक बाईंचें आपल्या मुलीवर कांही प्रेम नव्हतें. अनेक नवस-सायास केल्यावर उतारवयांत झालेली मुलगी! त्याहि तिला जीव की प्राण करीत. पण या मुलीऐवजीं मुलगा असता तर ...हा विचार बऱ्याच वेळां त्यांना बेचैन करी. मुलीला दुसऱ्याच्या घरीं नांदायचें असतें, तिचे लाड करावयाचे झाले तरी त्यांना मर्यादा हवी, असें त्यांना प्रामाणिकपणे वाटे. कदाचित् स्त्री असल्यामुळे हा विचार नेहमी त्यांच्या डोळ्यांसमोर उभा राहात असावा. सासर चांगलें असलें तर ठीक, नाहीतर तिला अधिकच दुःख व्हावयाचें, या शंकेने त्यांच्या मनांत नेहमी घर केलें असावें असें दिसे. म्हणून पाटीलबोवा मुलीचे फाजील लाड करूं लागले कीं त्या तणतणून म्हणावयाच्या,

" तुमच्या लाडांनी तीं शेफारून जाईल बरं! सासू मात्र पावलोंपावलीं आईच्या नांवाने खडे फोडील!"

" तूं मुळीच काळजी करूं नकोस! माझी पोर इतकी शहाणी आहे की, तुझा ती मुळीच उद्धार होऊं देणार नाही!"

एखादे वेळेस माझ्यासारखा कोणी जवळ असला की त्याच्याकडे वळून ते म्हणायचे, " कांहो, मी बरोबर सांगतों ना? अशी गुणी मुलगी तुम्हीं पाहिली आहे का?"

जवळच्या माणसाला काय बोलावें हें मोठेंच संकट वाटत असे. पण त्याच वेळेस अचानक त्याची सुटका होई.

" अशानेच ती डोक्यावर बसली आहे! घरांत काडीच्या कामाला हात लावीत नाही ती!"

" पण तूं तिला काडीला तरी हात लावूं देतेस का? ती कांही करायला लागली की तूंच तर मनाई करतेस."

" मला आपलें वाटतें, पुढे करायचेंच आहे तिला सर्व सासरीं ! मग आताच कशाला त्रास पोरीला ! "

" मग फूस कोण देतें तिला ? तूं का मी ? "

आपल्या बोलण्यांतील विसंगति त्यांच्या लक्षांत येई, पण त्या कबूल मात्र करीत नसत. पहिलाच मुद्दा त्या अधिक जोराने घोळवीत पुढे मांडत च म्हणत,

" तुमच्या अशा बोलण्यामुळेच ती माझें कांही ऐकत नाही. आईची किंमत वाटत नाही तिला ! "

" तुझें ऐकत नाही ? सांग न ऐकलें म्हणजे ! अशी शिक्षा करतों ! "

" मी का तसें म्हणतें ? "

" मग कसें म्हणतेस ? "

" लहान तर आहे ती. तिला काय कळतें ! एखादे वेळेस व्हायचीच चूक हातून ! म्हणून का शिक्षा करायची पोरीला ? तुमचें तरी नवलच वाटतें मला ! "

आपण बोलण्याच्या भरांत आपलें म्हणणें—मुद्दा सोडून दुसऱ्याचें उलट बोलणेंच आपलें म्हणून सांगूं लागतो, हें पुष्कळदा त्यांच्या लक्षांतच येत नसे. लक्षांत आलें तरी त्याची ते पर्वा करीत नसत. नवीन मुद्दा आपलाच म्हणून दुसऱ्याशी प्रतिवाद चालू ठेवीत असत. जवळच्या माणसांना मात्र गंमत पाहायला मिळून तीं गालांतल्या गालांत हसूं लागत.

एकदा असेंच मला हसतांना पाहून ते म्हणालेहि,

" पाहा, तुझ्या बोलण्याला हा पोरगाहि हसतो. सारखें उलट-सुलट बोलतेस. "

" अहो, तुम्हीच तर तिला शहाणी म्हणतां अन् शिक्षा करायला उठतां ! "

" बरं बरं, तुझी मुलगी अगदीं मूर्ख आहे. वेडी खुळी आहे. "

" तुमच्या अशा बोलण्यानेच मुलांसमोर हसें होतें ! " मला हसतांना पाहून काकू—पाटलीणबाई—म्हणाल्या.

" अग, हीं पोरें आपल्याला हसणार नाहीत तर कोण हसणार ? "

असेंच कांहीतरी नेहमी चालायचें.



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स
अनुक्रम ............ वि: ...
क्रमांक ..१०८१...... नों: दि:....

योग्य वेळीं पाटीलबुवांनी मोठ्या थाटाने मुलीचें लग्न केलें. बापाने जितकें पाहायला पाहिजे तितकें त्यांनी अगोदरच पाहिलें होतें. भिकू पाटलांची घरची स्थिति साधारण बेताचीच होती. खाऊन पिऊन सुखी होते ते. मुलगा नसल्यामुळे कांही धडपड करावी असें त्यांना कधीं वाटलें नव्हतें. दोन घांस सुखाने तोंडांत पडतात ना? मग कशाला आटापिटा करायचा, ही त्यांची वृत्ति बनली होती. लग्नाकरतां त्यांनी आपल्या शक्तीबाहेरच खर्च केला. स्थळ तोलामोलाचें होतें. पाटीलबुवांची आर्थिक परिस्थिति सामान्य असली तरी त्यांची समाजांतील मानमान्यता फार मोठी होती. ओळखीहि खूप होत्या आणि त्यांच्याकडचें तें पहिलें व शेवटचें एकमेव ' कार्य ' होतें. त्यामुळे त्यांनी हात आवरता घेतला नाही. दोन पैसे कर्ज झालें तरी त्यांना पर्वा वाटली नाही.

लग्नसमारंभांत पाटीलबुवांना अगर त्यांच्या पत्नीला पुढील परिस्थितीची मुळीच कल्पना नव्हती. पण मुलगी ज्या वेळीं सासरीं जायला निघाली तेव्हा मात्र त्यांच्या शिरावर आकाश कोसळल्यासारखें त्यांना वाटलें.

डोळ्यांत आसवें आणून ते व्याह्याला म्हणाले,

" तळहातावरच्या फोडासारखें वागवलें आहे तिला मीं! आतां तुमच्या हवालीं करतों ! "

" तुम्ही निश्चिंत असा ! ती आता तुमची मुलगी नाही. माझी मुलगी आहे."

" जरा लाडांत वाढली आहे. कांही चुकलें-माकलें तर मोठ्या मनाने दुर्लक्ष करा त्याकडे ! "

" तुम्ही अगदी काळजी करूं नका. अन् नेहमी येत जाईल ती तुमच्याकडे."

" जा बाळ, सर्वांशीं प्रेमाने वाग. कोणालाहि दुखवूं नकोस ! "

कष्टाने पण निग्रहाने त्यांनी मुलीला निरोप दिला.

मुलगी सासरीं गेल्यावर पाटीलबुवांना व त्यांच्या बायकोला घरांत फार जड जाऊं लागलें. पण परिस्थितीचा आघात सोसायला हळूहळू त्यांनी आपल्या मनाला शिकवलें, तयार केलें. मुलगीहि अधून-मधून येऊन राहूं लागली, त्यामुळे त्यांना आपल्या करपलेल्या मनाचें समाधान करणें

शक्य झालें.

पण थोड्याच दिवसांनी अशी एक चमत्कारिक घटना घडली की, पाटील-बुवांकडे यायचा मुलीचा पाय अकस्मात् तुटला.

पंचायतीपुढे त्या वर्षी एक प्रश्न आला. कांही लोक चमत्कारिक रीतिरिवाज पाळतात. त्यांचे आचार-विचार हिंदु धर्माला संमत होणारे नाहीत. ते हिंदु धर्माचीं तत्त्वें मानीत नाहीत; तरी त्यांना त्यांचे रीतिरिवाज सोडण्यास जातीने भाग पाडावें. हिंदुधर्मबाह्य चालीरीति आचरण्यास जमातीने त्यांना मनाई करावी. समाजाला घातक असणाऱ्या समजुती सोडण्याबद्दल पंचायतीने त्यांना आज्ञा द्यावी.

पंचायतीपुढे त्यांच्या चालीरीतीची छाननी झाली, चर्चा झाली, वाद-विवाद झाला. त्यांनाहि आपली बाजू मांडण्याची संधि देण्यांत आली. शेवटी निर्णय घेतला गेला की, हा पंथ हिंदुधर्मबाह्य आहे. त्यांनी तो सोडून द्यावा. जे सोडणार नाहीत त्यांना जातिबाह्य करावें. त्यांच्याशी कोणीं कसलाहि संबंध ठेवायचा नाही. त्यांच्याकडे कोणीं जायचें नाही. त्यांना कोणीं आपल्याकडे येऊं द्यायचें नाही. कोठे भागीदारी असल्यास तोडून टाकावी. सोयरसंबंध असले तरी ते तुटले असें समजावें.

पुष्कळांनी पंचायतीचा निकाल मान्य केला, व आपल्या पंथाचा त्याग केला; पण कांहीं बंडखोर निघाले.

‘ आपण निष्ठावंत हिंदु आहोंत. हिंदुधर्माचा अभिमान आमच्या रक्ताच्या कणाकणांत भरला आहे. तुमच्यापेक्षांहि आम्ही अधिक धर्मनिष्ठ आहोंत ’ असा त्यांचा दावा होता. ‘ हा आमच्यावर अन्याय आहे, आम्ही तो सहन करणार नाहीं. ’ म्हणून त्यांनी आव्हान दिलें. पंचायतीचा निर्णय धुडकावून लावला.

त्यांना बहिष्कृत करण्यांत आलें.

या बंडखोरांचा प्रमुख होता भिकू पाटलांचा व्याही. भिकू पाटलांनीं पंचांचा निर्णय जाहीर केला तेव्हा पुढच्या परिस्थितीची त्यांनाहि कल्पना नव्हती. जें घडलें तें सारें अनपेक्षित घडलें आणि खूप चिघळलें. सारेच हट्टाला पेटले.

पंचायतीच्या ह्या निर्णयामुळे जीव की प्राण असणारी मुलगी भिकू

पाटलांच्या दृष्टीने मेली ! तिचा-त्यांचा कांही संबंध राहिला नाही. तिला आपल्याकडे आणणें अगर आपण तिच्याकडे जाणें बंद झालें. तिची भेट घेणें अशक्य झालें. पंचायतीचे निर्णय सर्वांनी कटाक्षाने पाळले पाहिजेत, कोणींहि ते तोडतां नये, यावर सर्वांचीच निष्ठा. ते पाळले जातात की नाही हें पाहण्याची कुटुंबनायकावर जबाबदारी !

जें झालें त्याचा भिकू पाटील विचार करूं लागले तेव्हा ते फार व्याकुळ झाले. त्यांच्या मनांत मोठी खळबळ सुरू झाली. कुटुंबनायकाशीं त्यांच्या हृदयांतील माणूस झगडूं लागला. न्यायप्रमुखाच्या निष्ठुर हृदयाला वात्सल्य-देवता आवाहन करूं लागली. जबाबदारीची जाणीव बेजबाबदार होण्याला उत्तेजन देऊं लागली. झगडा अनावर झाला. आघात असह्य झाला. भिकू पाटील तळमळूं लागले, तिळतिळ तुटूं लागले, झुरूं लागले.

अगोदरच वय झालें होतें त्यांत हा तडाखा ! पण दुःख दाखविणेंहि शक्य नव्हतें. कुटुंबनायकाने निर्णय झुगारून देणें काय सोपी गोष्ट होती ? त्यांच्या मनांत सारखा विचार येई :

‘ आजपर्यंत ज्या कल्पना जिवाभावाच्या वाटत होत्या, ज्यांच्या-वर जीवन जगवीत होतों, त्या कल्पना मुलीच्या प्रेमाकरता काय बाजूला सारावयाच्या ? इतकीं वर्षें मी कुटुंबनायक आहें. माझी जबाबदारी पार पाड-तांना मी केव्हाहि कचरलों नाही. कसलेंहि कटु कर्तव्य मीं हिमतीने पार पाडलें. आणि आता मी त्यापासून दूर जाऊं ? काय वाटेल जमातीला ? पंचांच्या निर्णयाची काय किंमत राहिली ? जातगंगेचा प्रवाह गढूळ नाहा का होणार ? मींच निर्णय झुगारून दिला तर तो कोण पाळणार आहे ? मुलीच्या प्रेमा-करता साऱ्या जातीला दगा द्यायचा ! शक्य नाही तें ! माझ्याप्रमाणे आणखी किती बाप व्याकुळ होऊन तडफडत असतील ! माझ्या घरांतल्याप्रमाणे किती घरांत असंतोष धगधगत असेल ! किती जीव तळमळत असतील ! पण इलाज नाही. कसलाच उपाय नाहीं. मनाला वेसण घातली पाहिजे. मीं हें सारें सहन केलें पाहिजे. बायकोने मुलीचा ध्यास सोडला पाहिजे. मी कुटुंबनायक आहें हें विसरून मला चालणार नाही. मी तें विसरूं शकत नाही, विसरूं शकणार नाही. परिणाम कांहीहि होवो. ”

दिवस भराभर पळत होते. कुटुंबनायक आपल्या मनावर मुलीच्या

विरहाचा कांहीच परिणाम झाला नाही असें दाखवीत होते. रोजचे व्यवहार चालूच होते. पण झाडाच्या खोडाला आंतून कीड पोखरत होती. बाहेर वृक्ष डौलाने डोलतांना दिसत होता, पण त्याचा बुंधाच आंतून सडून निर्जीव झाला होता. किती वेळ त्याचा टिकाव लागणार होता ? चार-चौघांत ते कोणताहि देखावा करीत असले, तरी एकटे असले म्हणजे त्यांच्या जिवाची मोठी तगमग होत असे. ते शून्य दृष्टीने कोठे तरी पाहात बसत. आपली मनःस्थिति कोणाच्याच—बायकोच्याहि—लक्षांत येऊं नये म्हणून त्यांची मोठी धडपड चाललेली असे. त्यामुळे त्यांच्या मनावर अधिकच ताण पडे.

त्यांची तगमग मला दिसत होती. एकदा मी त्यांना मोठी हिंमत करून म्हणालों, " पाटीलबाबा, यावर कांही उपाय नाही काय ? " माझा हेतु त्यांना कळला. एक लांब सुस्कारा सोडून ते म्हणाले,

" कांही इलाज नाही. जातीहून कांही मोठें नाही. जातीने ठरवलें तें ठरवलें ! "

" पण ... . "

" जाऊं दे: जी गोष्ट आपल्या हातांत नाही तिचा विचार कशाला करायचा ? "

असें ते म्हणाले खरे, पण विचाराच्या ओझ्याने त्यांचें मन चिरडून गेलेलें मला दिसत होतें. ते सारखा विचार करीत होते. अहोरात्र विचारच करीत होते.

एके दिवशीं कुटुंबनायकाने अंथरुण धरलें. दुबळें शरीर गलितगात्र बनलें. दिवसेंदिवस प्रकृति घसरूं लागली. उठणें-बसणें अशक्य झालें. यांतून आपण जगत नाही ही त्यांची स्वतःची खात्री झाली. इतरांनाहि तें समजून चुकलें.

सगळीकडे बातमी पसरली. ठिकठिकाणचे लोक समाचाराला येऊं लागले. सगळ्यांची ते प्रेमाने विचारपूस करूं लागले. निरोप येऊं लागले. निरोप देऊं लागले.

मुलीला कळलें. सासऱ्याची परवानगी घेऊन ती धांवत बापाला भेटायला आली. एकदम आंत कसें शिरायचें ? आपल्याला पाहून बापाला काय

वाटेल ? त्याला आनंद होईल का ? निदान समाधान वाटेल का ? मुलीला कांहीच कल्पना येईना. ती आली तशी शेजारी माझ्याकडेच आली. चुलत-भावाला तिने डोळ्यानेच खूण केली.

भाऊ आंत गेला. मीहि त्याच्याबरोबर गेलों. भिकू पाटील तळमळत होते. मोठ्या कष्टानेच त्यांचा श्वासोच्छ्वास चालला होता. ताईला—मुलीला—भेटण्यासाठी त्यांचा जीव घोटाळत आहे असें आम्हांला वाटलें. भाऊने विचारलें,

" ताईला भेटायचें आहे काय ? "

" नाही ! "

" ताई आली आहे ? "

" तिला म्हणावें परत जा ! कशाला आलीस ? "

भाऊ गप्प बसला, पण मला गप्प बसवेना. मी हलकेंच म्हणालों,

" एक नजर ती आपणाला पाहील अन् जाईल. कांही बोलणार नाही. "

" भलतीच गोष्ट सांगूं नको. " मी कांहीतरीच बोललों असें त्यांना वाटलें.

नंतर आपल्या पुतण्याकडे वळून ते म्हणाले,

" तिला सांग, परत जा ! मला समाधानाने मरूं दे ! मरतांनाचें माझें समाधान नष्ट करूं नकोस ! अन् तूं तिच्याशीं बोलूं नकोस. तूं आतां कुटुंब-नायक होशील. तुझ्यावर फार मोठी जबाबदारी पडेल. तें सारें दप्तर म्हणजे आपलें सर्वस्व हें विसरूं नकोस. तें नीट सांभाळ. जातीचा निर्णय कुटुंबनायकानेच मोडला तर दुसरा कसा पाळील ? " त्यांनी डोळे मिटून घेतले. एवढें बोलल्यामुळे त्यांना खूप श्रम झाले होते.

मी परत आलों. ताईकडे भरल्या डोळ्यांनी पाहिलें. काय समजायचें तें ती समज़ली. तिच्या डोळ्यांतून खळखळ आंसवें गळूं लागलीं. तशीच पाटलांच्या दप्तराच्या खोलीसमोर ती गेली. तिने त्या खोलीला वंदन केलें. उंबरठ्याजवळची धूळ कपाळाला लावली, आणि ती वळली आणि चालूं लागली.

मुलगी परत गेली. बापाला न भेटतां परत गेली. एकदा डोळे भरून

बापाला पाहावें, असें तिला फार वाटत होतें, पण तें तिने टाळलें. बापाला पाहण्याचा प्रयत्न केला अन् बापाच्या लक्षांत आलें, तर त्याच्या जीवनांतला सारा आनंद, समाधान मरतांना नाहीसें होईल. नकोच तें. ती पण कुटुंबनायकाचीच मुलगी होती.

एकदा ते जरा सावध दिसले. मला त्यांनी जवळ बोलावलें. हळूच ते मला म्हणाले,

" मास्तर, ताईला म्हणावें या तुझ्या दुर्दैवी बापाला क्षमा कर ! "

तोंच आपण भलतेंच बोललों असें त्यांना वाटलें. पुन्हा असें कांही बोलायचें नाही म्हणून त्यांनी आपले ओठ घट्ट मिटून घेतले. त्यानंतर ते शेवटपर्यंत कुणाशीहि बोलले नाहीत. एक अक्षरहि त्यांनी ओठाबाहेर पडूं दिलें नाही.

तीन-चार दिवसांनी आपलें दप्तर त्यांनी पुतण्याच्या हातांत दिलें व उघड्या डोळ्यांनी पण मिटल्या ओठांनीच सर्वांचा निरोप घेतला.

★

## ४

# सजन्या !

कुणींतरी तें हस्तपत्रक माझ्या हातांत आणून ठेवलें. सानेगुरुजी तुरुंगांतून सुटून आले होते. त्यांच्याबरोबर आणखी कांही राजबंदीहि मुक्त होऊन आले होते. त्यांत भुसावळचेहि एक-दोन साहसी युवक होते. भुसावळच्या नागरिकांतर्फे त्यांचा सत्कार करावयाचें ठरलें होतें. त्यासंबंधी तें हस्तपत्रक होतें. त्यांतील गुरुजींच्या नांवाजवळचेंच नांव पाहून मी एकदम चमकलों.

मी सारें विसरलों. माझ्या डोळ्यांपुढून गतकाळांतील घटनांचा चित्रपट सरकूं लागला.

त्या गावच्या पोलीस पाटलांचा व माझा बराच स्नेहसंबंध जडला होता. पुष्कळदा काम नसलें की मी त्यांच्याकडे जाऊन बसत असें. कांही लागलें सवरलें तर मी त्यांना मोकळ्या मनाने सांगत असें व तेहि जिव्हाळ्याने मला मदत करीत असत. गप्पा मारतांना आमच्या वयांतील अंतर आम्ही विसरत असूं.

असाच एकदा मी शाळेंतून घरीं जात होतों. रस्ता चावडीवरूनच होता. पाटीलबुवा समोरच कुणाशी तरी बोलत होते. मला पाहतांच त्यांनी हांक मारली. मी चावडींत जाऊन त्यांच्याशी बोलत बसलों.

थोड्या वेळाने एक धिप्पाड गडी हातांतील काठी ठोकीत आमच्या समोर येऊन उभा राहिला. त्याने पाटलांना ‘ रामराम ’ केला. आम्ही कांहीशा कुतूहलाने कांहीशा उत्सुकतेने त्याच्याकडे पाहूं लागलों.

"एक निरोप सांगायचा आहे" तो हळूच पाटलांना म्हणाला.

" कोणाकडून आला आहेस तूं ? "

" जरा इकडे बाजूला या, मग सांगतों. "

" येथे कोणीहि परकें नाही. " आमच्याकडे पाहात पाटील म्हणाले, " तसें कांही नसेल तर बेशक सांग. कोणीं पाठवलें आहे तुला निरोप घेऊन ? "

" मी सजन्याकडून आलों आहें. "

पाटीलबुवासह आम्ही सारे गडबडीने उभे राहिलों. भीतीचा कांटा आमच्या अंगांतून थरारून गेला. आमचीं हृदयें कापून उठलीं. पाटलांचा उमदा चेहरा ढगाळला.

आजूबाजूच्या पांचपन्नास मैलांच्या टापूंत सजन्याचा तसाच दरारा होता. सर्वांना त्याची विलक्षण दहशत वाटत होती. भोंवतालच्या प्रदेशाचा तो खरोखर अनभिषिक्त राजा समजला जात होता.

थोड्याच दिवसांपूर्वी आमच्या कानीं आलें होतें. ××× गावच्या पाटलांकडे सजन्याचा माणूस निरोप घेऊन गेला. 'तीन दिवसांत एक हजार रुपये गोळा करून सजन्याला द्यायला पाहिजेत. परवां संध्याकाळीं तो पैसे घ्यायला येईल.' 'ठीक आहे. परवां संध्याकाळीं पाठवून दे सजन्याला' म्हणून पाटलांनी त्याला उलट जाब दिला.

पाटील मोठे हुशार होते. पोलिसांत त्यांची बरीच ऊठबस होती. फौजदारांकडे चहा मिळण्याइतका त्यांचा परिचय होता. पोलीस सजन्याला पकडण्याला टपून बसले आहेत हें त्यांना माहीत होतें. आपण त्यांना सजन्याला पकडायला मदत केली तर आपल्याला भलेपणा मिळेल, सरकारदरबारीं आपलें वजन वाढेल, आपला मानसन्मान होईल असें त्यांना वाटलें. त्यांनी पोलिसांना सूचना दिली.

तिसऱ्या दिवशीं साध्या वेषांत अनेक पोलीस ××× गावीं आले. वेष बदलून स्वतः फौजदारसाहेबहि सजन्याला पकडायच्या तयारीने आले. पाटील जवळ पैसे घेऊन चावडीवर बसले. पण सारी तयारी फुकट गेली. सजन्या आलाच नाही. आले तसे हात चोळीत सारे पोलीस परत गेले.

आणि नंतर तीन-चार दिवसांनीं ××× गावच्या खळवाडीला आग

लागली. सारा गाव खळवाडी विझवायला धांवत गेला, तों इकडे पाटलाचा वाडा आग ओकूं लागला. आणखीहि गावांतील तीन चार घरांनी त्याच वेळीं पेट घेतला. एका रात्रींत हजारों रुपयांचें नुकसान झालें. कितीतरी लोक घरादारांना मुकले, अन्नाला आंचवले.

सजन्याने हा धडा शिकवला होता. सूड घेतला होता. सगळ्यांना हें कळलें होतें; पण तसें बोलायचीहि चोरी होती. आणि बोलून उपयोग तरी काय होता ?

अशा अनेक गोष्टी सजन्याच्या नांवाभोंवतीं गुंफलेल्या होत्या. त्याच्याशीं गांठ पडूं नये, संबंध येऊं नये, अशी सर्वांचीच इच्छा असे. त्याच सजन्याकडून निरोप घेऊन आज माणूस आला होता.

" काय सांगितलें आहे त्याने ? " पाटलांनी विचारलें.

" आज संध्याकाळीं पंधरा-सोळा माणसांना पुरतील इतक्या भाकरी व उडदाचें वरण तयार करायचें ! "

" हं ! "

" आणि तें सोनमळ्यांत पोचतें करायचें ! "

" ठीक आहे. करतों सारी व्यवस्था. "

" दोन-तीन शेर कांदेहि पाठवा. "

" पाठवतों मी सारें. "

" भाकरी माझ्यासारख्या पंधरा जवानांना पुरल्या पाहिजेत. कमी पडतां कामा नये. "

" बिलकुल कमी पडणार नाहीत. वीस माणसांना पुरतील इतक्या पाठवतों. "

" अन् एक गोष्ट नीट लक्षांत ठेवायची. " आमच्या सर्वांवरून नजर फेकीत त्या गड्याने बजावलें, " सारें मुकाट्याने झालें पाहिजे. कोठेंहि बभ्रा होतां कामा नये. या कानाची त्या कानाला गोष्ट कळवायची नाहीं. आमचे कान फार तिखट आहेत. गांठ सजन्याशीं आहे. "

" अगदी निश्चिंत असा. सारें बिनबोभाट करतों. आम्हां तिघांशिवाय कोणालाहि यांतलें अक्षर कळणार नाहीं. "

" कळलें तर तिघांना जबाबदार धरीन मी. "

" कांही हरकत नाहीं. "

" बरें आहे. येतों मी. रामराम. "

" रामराम. "

पाटीलबुवांनी अगदी मुकाट्याने सारी व्यवस्था केली. संध्याकाळीं भाकरींनी भरलेला हारा व उडदाच्या वरणाचा लहानसा हंडा तयार झाला. पांच-सहा शेर कांदे, वाडगाभर ' कैरीचा चिरा ' ( लोणचें ) व वरणाचा हंडा एका मोठ्या डालींत ठेवून हारा व डाल नेण्याकरतां दोन भक्कम गडी केव्हाचे उभे होते. पाटीलबुवांची सारखी धडपड चालली होती. आपल्या गावाला झळ लागूं नये, तोशीस पडूं नये, या आंतरिक इच्छेने ते झटत होते. सारी तयारी झालेली पाहून त्यांना बरें वाटलें.

" मी जाऊं का सोनमळ्यापर्यंत ? " मीं त्यांना विचारलें.

" तुम्ही ? "

" होय ! तुमची तगमग मला समजते. गावचा बचाव व्हावा म्हणून तुम्ही ही धडपड करीत आहांत. मी जाऊन येतों. कांही कमीजास्त असलें तर लागलीच व्यवस्था करणें शक्य होईल. "

क्षणभर ते थांबले. त्यांनी अंमळ विचार केला. नंतर ते म्हणाले,

" बरें जा ! "

योग्य वेळीं आम्ही सोनमळ्यांत पोचलों. तेथे फक्त सकाळचा निरोप आणणारा गडीच दिसला.

" काय, आणलें सारें सामान ? "

" पाहून घे ना ! कांही कमीजास्त असलें तर सांग. "

त्याने हाऱ्यांतील व डालींतील सामान पाहिलें. कैरीच्या चिऱ्याचा वाडगा पाहून गडी भलताच खूष झाला.

" छान छान ! सर्व पुरून उरेल इतकें आहे. जा आतां तुम्ही. "

आम्ही परत निघालों. दहापांच पावलें गेलों न गेलों तोंच त्याने मला हांक मारली.

" अहो, जरा इकडे या बरें ! "

मला वाटलें, काय राहिलें कुणास ठाऊक. कांही बिनसलें तर नाही ? मी परत वळलों व त्याच्याजवळ गेलों.

" तुम्ही मास्तर नाही का ? "

" हो ! "

" हें पाहा मास्तर, पाटीलबुवांना निरोप सांगा, तुमच्या गावाला कसलीच भीति नाही. गांवाला सजन्याचा त्रास नाही होणार कधी. "

" ठीक आहे. सांगतों तसें. "

आणि आमच्या गावाला खरोखर कसलाच त्रास झाला नाही. भोंवतालच्या अनेक बातम्या कानांवर येत. अमक्या गावीं मोठा दरोडा पडला. तमक्या गावांतून सजन्याने खूप पैका उकळला. ×× गावच्या मारवाड्याचें घर लुटलें. ×× गावाला धमकी दिली. ×× गाव सजन्यानें जाळून टाकलें. पण आम्ही निश्चिंत होतों. निर्धास्त होतों.

कांही दिवस असेच गेले अन् एक दिवस गावांत कुजबुज सुरू झाली. ' सजन्याला पकडलें आहे. डी. एस्. पी. साहेबांची छावणी शेजारच्या गावीं पडली आहे. आजपर्यंत जे दरोडे पडले, लूटमार झाली, छळ झाला त्या सर्वांची चौकशी सुरू झाली आहे. कितीतरी पोलीस आले आहेत. धूम चालली आहे. '

सर्वांच्या कुजबुजण्याचा ध्वनि मात्र एकच होता. ' पोलीसच सजन्याला भितात, साहेब त्याच्याशीं फार जपून वागतो. '

पहिल्याच दिवशीं त्याने म्हणे साहेबाला दटावलें अन् सांगितलें, ' सजन्याला रोज सकाळीं चार शेर दूध लागतें, तें मिळालें पाहिजे. ' अन् साहेबाने मुकाट्याने तशी व्यवस्था केली. दरोड्यांतील माल दाखविण्याच्या मिषाने तो खूप फिरवतो सर्वांना. ' सजन्या नाचवतो अन् सारे नाचतात. ' असेंच सारें बोलणें असे.

मला सजन्याला पाहावयाचें होतें, पण तें शक्य दिसेना. त्याच्यासंबंधीं बोलणेंहि कठीण झालें होतें. सरकारी माणसें वेष पालटून सगळीकडे कानोसा घेत हिंडत होतीं म्हणे.

एक दिवस मी व पाटीलबुवा सोनमळ्यांत विहिरीवर बसलों होतों, तोंच पाटीलबुवांचा सालदार धावत आला.

" पोलीस सजन्याला घेऊन इकडेच येत आहेत. साहेबहि बरोबर आहे. " त्याने हळूच बातमी दिली. आमचीं मनें थरारलीं. तरीहि मला बरें वाटलें.

सजन्याला पाहायचा योग आहे तर—

पंधरा-वीस पोलिसांच्या पहाऱ्यांत एक कैदी येत होता. मागे घोड्यावरून साहेब येतांना दिसत होता. आमच्याजवळून ते जाऊं लागले. मी व पाटीलबुवा उत्सुकतेने त्या कैद्याकडे—सजन्याकडे—पाहूं लागलों आणि आम्ही चकित झालों.

चावडीवर निरोप घेऊन येणारा धिप्पाड गडी दुसरा तिसरा कोणी नसून स्वतः सजन्या होता. गावाला त्रास होणार नाहीं हा दिलासा स्वतः त्यानेच दिला होता. सजन्या मला अनोळखी नव्हता. त्याला मीं पूर्वीच पाहिलें होतें. मला जाणीव नव्हती इतकेंच.

शेजारच्या शेतांत ते सर्वहि गेले. आमचें सर्व लक्ष त्यांच्याकडेच होतें, पण आम्ही तसें दाखवीत मात्र नव्हतों.

सजन्याने एक कोपरा दाखविला. पोलिसांपैकी कांहीजणांजवळ कुदळ-फावडीं होतीं. चार-पांच जणांनी खोदायला सुरुवात केली. कांही माती फेकूं लागले. तास दोन तास हें काम चाललें होतें. पण आंत कांहीच नव्हतें. सारे निराश झाले.

" मी चुकलों, हा कोपरा नाही. तो कोपरा खोदायला पाहिजे ! " सजन्याने दुसरा कोपरा हाताने दाखवीत म्हटलें.

सारे तिकडे वळले. पुन्हा खोदायला सुरुवात झाली. तास, दोन तास सारखें काम चाललें होतें. पण तेथे कांही ठेवलेलेंच नव्हतें तर सांपडणार कसें ? सारे दमले, हताश झाले.

तो जरा हसत असावा असें मला वाटलें. तोंच सजन्या म्हणाला,

" मला वाटतें, त्या कोपऱ्यांत आम्हीं दरोड्यांतलें धन पुरलें आहे !"

नव्या उत्साहाने पोलिसांनी पुन्हा त्या ठिकाणीं खोदायला आरंभ केला. साऱ्यांची दमछाट झाली. तसा सजन्या कांही आठवल्याचा आव आणीत म्हणाला,

" या शेतांत नाही, त्या पलीकडच्या शेतांत ठेवलें आहे आम्हीं सारें ! चुकलों मी सांगतांना ! "

रागानें लालीलाल झालेल्या साहेबाने अशी बुटाची ठोकर मारली की बेसावध सजन्या कोलमडूनच पडला. " चलो ! ले चलो सुवरको ! " साहेब

गरजला.

पुढें कळलें, सजन्याचें हाडन् हाड नरम झालें. त्याला उलटा टांगून धुरी दिली. झोंपूं दिलें नाही. शेवटीं छळ असह्य झाला. त्याने सारें कबूल केलें. पुरावा दिला. माल दाखवला.

शेवटीं चौकशी पूर्ण झाल्यावर खटला भरला गेला. सजन्याला शिक्षा झाली.

त्या हस्तपत्रकांतील सज्जन पाटलाचें नांव वाचतांच हा सारा चित्रपट माझ्या डोळ्यांपुढून झरकन् सरकून गेला. गुरुजींच्या नांवाबरोबर तें नांव आलें होतें. पुढचीं एकदोन नांवें भुसावळच्या धाडसी वीरांचीं होतीं. मॅट्रिकच्या वर्गांत असतांना दोन-तीन विद्यार्थी चळवळींत पडून तुरुंगांत गेले होते त्यांचीं नांवेंहि त्यांत होतीं.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या सर्वांची सुटका झाली होती. आणि त्यांचा सत्कार-समारंभ करावयाचें भुसावळच्या सर्व नागरिकांनी ठरविलें होतें.

जैन दवाखान्यासमोर असलेल्या विस्तृत पटांगणावर समारंभ व्हावयाचा होता. मी जरा लवकरच तेथे गेलों.

सत्कार-समारंभाकरतां भव्य व्यासपीठ तयार करण्यांत आलें होतें. केळीच्या खांबांनी, चित्रविचित्र पताकांनी व तोरणांनी तें सुशोभित केलें होतें. भोवतीं थोडी आरासहि होती.

लोक येऊं लागले होते. थोड्याच वेळांत सारें पटांगण माणसांनी फुलून गेलें होतें. भुसावळकरांचा उत्साह शिगेला पोंचलेला दिसला.

योग्य वेळीं भुसावळचे प्रमुख नागरिक व ज्यांचा सत्कार करावयाचा ते 'भारताचे सुपुत्र' व्यासपीठावर येऊन बसले. जनतेने मुक्त कंठाने जयघोष केला. 'भारतमाता की जय!' 'महात्मा गांधी की जय!' 'पंडित जवाहरलाल की जय!!' 'सानेगुरुजी की जय!'

मीं सर्वांना पाहून घेतलें अन् माझी नजर सज्जन पाटलावर—सजन्यावर—खिळून बसली.

वीस-पंचवीस वर्षें तुरुंगांत काढल्यामुळे त्याची पूर्वींची सारी रग, मस्ती, धुंदी पार नाहीशी झाली होती. अंगावरचें वायफळ मांस झडून गेलें होतें. एखाद्या तपस्व्याप्रमाणे त्याच्या हसऱ्या मुखावर गोड सात्त्विक भाव शोभत होता. पूर्वींचा चेहऱ्यावरचा उर्मटपणा, डोळ्यांतील बेगुमान वृत्ति, अंगांतला

उद्धटपणा आज कोठेंच दिसत नव्हता. नेहमी ताठ राहणारी मान आता नम्रपणे झुकलेली दिसत होती.

वाल्याचा वाल्मीकि झाला होता.

एक-दोघांचें औपचारिक भाषण झाल्यावर गुरुजी उभे राहिले. आपल्या अमृततुल्य वाणीने त्यांनी सर्वांची ओळख करून दिली. भारताच्या ह्या सुपुत्रांनीं भारताला उज्ज्वल काल लाभावा म्हणून कसें दिव्य केलें, कसा त्याग केला, कसा छळ सहन केला, जिवावरच्या प्रसंगांतून मरणाला वेडावीत त्यांना कसें जावें लागलें, याचें करुणरम्य चित्र आपल्या प्रभावी शब्दांनी त्यांनी रेखाटलें. सर्वांच्या डोळ्यांत आसवें तरंगू लागलीं. शेवटीं ते म्हणाले,

" हा सज्जन पाटील म्हणजे मार्ग चुकलेला देशभक्त ! आज देशाकरतां, आपल्या प्रिय भारताकरतां सर्वस्वाचा त्याग करायला, प्रसंग पडला तर हसत प्राणांवर पाणी सोडायला सज्ज झाला आहे. सेवाधर्माचें अखंड व्रत त्याने स्वीकारलें आहे. सज्जन पाटलांना शेवटीं आपल्या नांवाची ओळख झाली आहे. आपला भूतकाळ त्यांनी पुसून टाकला आहे. तुरुंगाच्या पुण्यपुरींत चार-पांच वर्षें आम्हीं एकत्र काढलीं. अहोरात्र आम्ही एकमेकांच्या सहवासांत होतों. अगदी जवळून आम्ही एकमेकांला ओळखूं शकलों. तेथे आमच्या मनांतील कुविचार—किल्मिष जळून गेलें. आमचीं शरीरें दुबळीं बनलीं असतील, पण मनें अशीं तेजस्वी, बलवान् बनलीं आहेत की, आम्ही पूर्वींपेक्षां अधिक उत्साहाने, तेजाने भारताची सेवा करूं शकूं ! "

शेवटीं सर्वांनी आग्रह केला—फारच आग्रह केला—तेव्हा सज्जन पाटील बोलायला उभे राहिले. ते हात जोडून नम्रपणे म्हणाले,

" मी अडाणी माणूस. आपल्यासारख्यांपुढे मी काय बोलणार ? खरें सांगायची मला लाज वाटत नाही. मी एक दरोडेखोर, लुटारू, चोर ! अनेक पापें मीं केलीं. तुरुंग हीच माझ्याकरतां खरी जागा होती. माझी करणीच तशी होती. कोणाला त्याबद्दल कसा दोष देतां येईल ? पण तुरुंग हेंच माझें महातीर्थ ठरलें. ती जागाच माझी काशी झाली—पंढरी झाली. पाप फिटावें म्हणून आपण तीर्थाला जातों. तुरुंगांत माझें पाप जळून गेलें असें मला वाटतें ! माझें मन धुऊन निघालें त्या तीर्थक्षेत्रांत ! त्या पंढरींत

मला माझा पांडुरंग भेटला ! माझ्या पांडुरंगाने ( गुरुजींनी ) माझ्या चुकल्या मनाला वाट दाखविली. माझ्या पापी मनाला धीर दिला. पाप्याला पुढचा काळ असतो, भूतकाळाचा विचार करण्याची त्याला जरूर नसते हें मला पटवून दिलें. पश्चात्तापाने जळणार नाही असें पाप नाही हें मला नीट समजावून दिलें.

" मला नवा जन्म मिळाला. मी निरुपयोगी, मला कांहीच येत नाही असें मला वाटलें होतें. पण माझ्या देवाने, माझ्या पांडुरंगाने मला सेवा करायला शिकवलें ! देशाची सेवा करायला शिकविलें ! देशाची सेवा, दीनदुबळ्यांची सेवा, जनतेची सेवा, मुक्या प्राण्यांची सेवा ! सेवेसारखें व्रत नाही हें त्यानेच मला दाखवून दिलें ! कोणालाहि करतां येण्यासारखें व्रत ! सर्व आयुष्य सेवेंत घालवायला मला बळ मिळो, एवढीच माझी इच्छा आहे. आपण जनताजनार्दन आहांत. आपला आशीर्वाद असावा एवढीच प्रार्थना ! "

साऱ्यांचीं मनें भारावून गेलीं. आदराने भरून गेलीं. त्या तशा स्थितींतच सभेचें काम संपलें.

मी गर्दीतून मार्ग काढून व्यासपीठाजवळ गेलों. सज्जन पाटील शेवटीच होते. मी हळूच त्यांना म्हणालों,

" नमस्ते ! "

" नमस्कार ! "

" ओळख लागते काय ? "

त्यांनी एकदा मला आपादमस्तक पाहिलें. थोडासा विचार केला अन् हसत विचारलें,

" तुम्ही मास्तर नाही का ? "

" होय ! वाटलें—वाटलें आपण सर्व भूतकाळ विसरलां, तेव्हा ओळख लागणं कठीण ! "

" असें कसें ? चांगल्या गोष्टी का विसरायच्या असतात ? अन् तें उडदाचें वरण अन् तो कैरीच्या चिऱ्यांचा वाडगा ! कसा विसर पडेल बरें ! विसरूं म्हटलें तरी विसरतां येणार आहे का तें ? "

" मी तरी विसरूं शकलों नाही ! "

" मी कांही अगदीच दगड नाही. "

" छे छे ! असें कोण म्हणेल बरें ? भलताच समज करून घेऊं नका अं ! किती छान बोललांत तुम्ही. मन मोहरून गेलं ! "

" अहो ! यांत आमचें काय आहे ? बोलविता धनी वेगळाचि ! आम्हांला काय येतें ? "

" असें कसें ! " अंतःकरणांतील तळमळ शब्दांत उमटली जावी ! "

" जाऊं द्या तें ! हल्लीं कुठे असता तुम्ही ? मास्तरकी करतां की सोडली चळवळींत ? "

" तेवढा भाग्यवान् मी नाही ! मी हल्लीं येथल्या हायस्कुलांत शिक्षक आहें. "

नंतर माझ्याकडे टक लावून असमळशाने ते म्हणाले,

" मास्तर, जरा विचारूं का ? "

" वा ! त्याला परवानगी कशाला पाहिजे ! स्पष्ट विचारा ना काय विचारायचें तें. "

" एवढी चळवळ झाली, देशांत एवढा डोंब उसळला, तरी तुम्ही होतां तिथेंच दिसतां. "

" माझ्या लक्षांत नाही आलें आपलें म्हणणें ! "

" अजून तुमच्या अंगावर खादी नाही. तुम्ही शिकलीं–सवरलेलीं माणसें ! आम्ही अडाणी माणसें तुम्हांला काय सांगणार ? आम्हांला कोठला तेवढा अधिकार ? पण मनाला वाटतें, तुमच्यासारख्यांनी अजूनहि डोळे मिटून घ्यावे हें बरें नाही. किती साधी गोष्ट आहे......"

माझी मान शरमेने खालीं झुकली. खादी न वापरण्याकरितां मीं कितीकांशीं प्रतिवाद केला होता. आवेशाने झगडलों, भांडलों होतों. पण त्या क्षणीं माझी वृत्ति एकदम मूक झाली. त्या क्षणीं तरी मला खादी न वापरण्याबद्दल विषाद वाटला, खेद झाला. माझें मन व्याकुळ झालें.

माझ्या मनाची स्थिति त्यांच्या लक्षांत आली असावी.

" माफ करा ! मनाला वाटलें तें स्पष्ट बोललों. मागचें जाऊं द्या सारें. पुढचा काळ आपल्याकरतां आहे, एवढें लक्षांत राहिलें म्हणजे पुरे. "

तोंच त्या सर्वांची निघायची घाई सुरू झाली. मीं सज्जन पाटलांचा निरोप घेतला.

जातां जातां माझे दोन्ही हात आपल्या हातांत घेऊन ते म्हणाले,
"मास्तर, ऐकाल माझें ? मी अडाणी आहें. तुमच्याइतकें कळत नाही मला. पण टाकून द्या हें कापड ! यापुढे खादी वापरा ! माझ्याकरतां नव्हे, देशाकरतां ! नमस्कार !"

माझ्या तोंडून शब्दच फुटला नाही. मी बोलण्याच्या मनःस्थितींतच नव्हतों, तोंच ते पुन्हा म्हणाले,

"अन् हें पहा, जळगावला येतां का कधी ?"

"येतों एखाद्या वेळेस !"

"आलांत तर मला जरूर भेटा. मी जळगावलाच राहणार आहें. कॉंग्रेस-हाऊसमध्ये तपास केला की माझें घर कळेल तुम्हांला. बहुतेक तेथेच आपली भेट होईल."

"ठीक आहे. जळगावला आलों तर अवश्य भेट घेईन आपली."

"जरूर जरूर या."

मी घरीं आलों. विचारांचा खूप गोंधळ माजला होता डोक्यांत ! केवढा बदल झाला होता सजन्यामध्ये ! असें होईल हें पूर्वी स्वप्नांत कधीं वाटलें नव्हतें. प्रत्यक्षांत तें घडलें होतें.

नंतर बरेच दिवस गेले. मी जळगावला जाऊं शकलों नाही. त्यामुळे सज्जन पाटलांची व माझी भेट झाली नाही. पण मधून मधून त्यांच्या-संबंधीची हकीकत कानांवर येत होती.

सज्जन पाटलांचें घर म्हणजे एक लहानसा पुण्याश्रमच आहे. तेथील वातावरण इतकें पवित्र असतें की कोणीहि खोलींत पाऊल टाकतांच त्याचें मन एकदम प्रसन्न होतें.

समोरच महात्माजींची एक तसबीर आहे. तिला नेहमीं ताज्या फुलांची माळ घातलेली असते. चारी बाजूंला भिंतीवर थोर थोर देशभक्तांचीं सुंदर चित्रें टांगलेलीं आहेत.

सज्जन पाटील घरीं असले तर नेहमीं सूत कातीत असतात. आखूड धोतर व खांद्यावर एक पंचा याशिवाय घरीं त्यांच्या अंगावर कांहीच नसतें. बाहेर निघतात तेव्हा एका कुडत्याची फक्त त्यांत भर पडते.

कोणीहि येवो, त्याच्याशीं अतिशय नम्रपणाने व आपलेपणाने ते

७१५६५

बोलतात. एका वेळचे त्यांचे सहकारी–दरवडेखोर लुटारू, चोर त्यांच्या सहवासाने योग्य मार्गावर आले आहेत. त्यांनाहि आपल्या पूर्वकृतींचा पश्चात्ताप झाला आहे. सज्जन पाटील आपल्या सहकाऱ्यांसह शक्य असेल ती जनसेवा नेहमी करीत असतात.

कधी ते एखादा रस्ता झाडतांना दिसतात, तर कधी संडास साफ करतांना आढळतात. कोणींहि त्यांच्याकडे जावें व हक्काने त्यांना आपल्या कामाला जुंपावें.

जेथे कांही मदत करतां येईल तेथे नेहमी धांव घ्यायची. कुठे गाजावाजा नाही, बडंबड नाही, जाहिरातबाजी नाही, कार्य करतों असा आव नाही. सारें मुकाट्याने करायचें. सेवाव्रताचें असें पालन करणारे फारच विरळा !

अशा बातम्या ऐकून आदराने, कौतुकाने मन मोहरून जाई. न कळत सजन्या अन् सज्जन पाटील हीं दोन्ही चित्रें माझ्या डोळ्यांसमोर उभीं राहात. गटाराची गंगा झालेली पाहून कोणाला समाधान वाटणार नाही ! गुरुजींच्या पुण्यस्पर्शामुळे दगडाचा देव झाला होता; लोखंडाचें बावनकशी सोनें बनलें होतें. दगडखड्याचें रत्नांत रूपांतर झालें होतें. कांटेरी वनाला नंदनवनाचें रूप प्राप्त झालें होतें.

दोन-तीन वर्षें गेलीं. गुरुजी सर्व मायापाश तोडून निघून गेले. जगण्याचा त्यांना उबग आला होता. सारा महाराष्ट्र शोकसागरांत बुडून गेला होता. दुःखाचा पहिला भर ओसरल्यावर माझ्या मनांत विचार आला, ‘ गुरुजींच्या मृत्यूमुळे सर्वांनाच दुःख झालें. पण सज्जन पाटलांसारख्या लोकांना तें किती जाणवलें असेल ! गुरुजींच्यामुळे ज्यांना पुनर्जन्म लाभला होता, त्यांचीं हृदयें किती व्याकुळ झालीं असतील ? सज्जन पाटलाला आता एकदा भेटलेंच पाहिजे ! ”

असेच आणखी कांही दिवस गेले. आणि एके दिवशीं अशी चमत्कारिक वार्ता कानांवर आली. मी एकदम बावरून गेलों. माझ्या भावना गोठून गेल्या ! मन थिजून गेलें ! एका क्षणांत साऱ्या जगावरचा माझा विश्वास उडाला. श्रद्धा ढासळली ! माझ्या हृदयांतील कोमल भावसुमनें पार करपून गेलीं.

त्या वर्षा दोन वर्षांत कांही दरोडे पडले होते. चोऱ्या झाल्या होत्या.

पोलिसांनी मोठ्या शिताफीने त्यांचा तपास लावला होता. सारे गुन्हेगार अचूक पकडले गेले होते. आणि अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी की, ते सर्व सजन्याचे सहकारी होते. त्यांनींहि सजन्याप्रमाणेंच देशाकरितां सर्वस्व पणाला लावलें होतें. आपल्या गुन्ह्यांचा त्यांनी कबुलीजबाब दिल्यामुळे शंका-कुशंकांना जागाच नव्हती त्या सर्वांचा म्होरक्या पूर्वींप्रमाणेच आताहि सजन्याच होता. सारें त्याच्या सूचनेप्रमाणे होत होतें.

बहुतेक माल सजन्याच्या घराच्या आंतील बाजूस लपविलेला सांपडला. मोठ्या हिकमतीने पोलिसांनी त्याचा शोध लावला.

सजन्याने साऱ्यांच्या डोळ्यांत धूळ फेकली होती. लांडग्याने गाईचें कातडें पांघरलें होतें. गटार शेवटीं गटारच असल्याचें दिसून आलें होतें. कावळ्याने बगळ्याचा बेमालूम वेष घेतला होता. पण शेवटीं खरें बाहेर आलें होतें. कावळ्याचें अंतरंग उघडें पडलें होतें. तो सज्जन नव्हता; सजन्याच होता.

कसलेला नट आपली भूमिका तिच्याशीं समरस होऊन वठवीत असतो. पण किती काळ ? एक दिवस, दोन दिवस, फार तर आठवडाभर—महिनाभर ! पण कित्येक वर्षें सजन्याने आपली भूमिका अशी वठविली होती की, कुशाग्र बुद्धिमंतांचीहि दिशाभूल व्हावी. निष्णात् धूर्तांच्याहि डोळ्यांत त्याने धूळ फेकली होती. साऱ्यांना चकविलें होतें.

सजन्याला योग्य ठिकाणीं पाठविण्यांत आलें.

आणि मला वाटलें—क्षणभर कां होईना, मला वाटलें, हें पाहायला गुरुजी नाहींत हें फार फार बरें झालें. त्या देवपुरुषाला या घटनेमुळे मृत्यूपेक्षाहि अधिक यातना झाल्या असत्या. त्यांचें हृदय फाटून गेलें असतें. ते कोसळून पडले असते !

★

## ५

# मोरूभाऊंचें हितवचन

महिनाभर मन स्वस्थ नव्हतें. तिसऱ्या वर्षाची ट्रेनिंग कॉलेजची परीक्षा चांगल्या रीतीने पास झाल्याबद्दलचा आनंद ओसरूं लागला होता. पुढच्या विचाराने मनाला एक प्रकारची हुरहुर लागली होती.

कोठे नेमणूक होणार? गाव कसें मिळेल? चांगलें मिळालें तर ठीक; नाहीतर किती त्रास होईल! शाळा मोठीच असेल याबद्दल शंका नव्हती; पण हेडमास्तर कसे असतील? आपल्याशीं ते कसे वागतील? घर चांगलें मिळेल की नाही? वगैरे अनेक विचार मनांत उसळून गोंधळ घालीत होते.

अशा मनःस्थितींत असतां एक दिवस कठोऱ्यांतील शाळेच्या हेडमास्तरांनी–रावबा पाटलांनी–बोलावणें पाठविलें. त्यांच्या हातांत माझ्या नेमणुकीच्या हुकुमाचें पाकीट होतें. पोस्टमनने त्यांच्याजवळ तें दिलें होतें. एकवेळचा त्यांचा मी मोठा आवडता विद्यार्थी होतों. त्यांच्याच मार्गदर्शनामुळे मी ट्रेनिंग कॉलेजमध्ये गेलों होतों.

मी जातांच त्यांनी पाकीट फोडलें. तितक्यांत आणखी एक दोन शिक्षकहि तेथे आले.

" तुझी किनगावला नेमणूक झाली आहे." आंतील कागदावरून नजर फिरवीत रावबा म्हणाले.

" छान गाव आहे! शाळेची इमारतहि नवीनच बांधलेली आहे. " तेथे आलेल्यापैकी एक शिक्षक म्हणाले.

" किनगाव म्हणजे विठोबा पाटलांचें गाव! त्यांना भेटलें की ते सारी

सोय लावतील. ”

“ कोणालाच भेटायची जरुरी नाही. ” रावबा म्हणाले. “ त्याला हेडमास्तर फार चांगले मिळाले आहेत. मोरूभाऊंसारखा गोड माणूस आपल्या साऱ्या जिल्ह्यांत नाही. तुझें नशीब चांगलें म्हणून पहिल्यानेच तुला असे हेडमास्तर मिळाले आहेत. ते तुला कसलीच उणीव भासूं देणार नाहीत. मुलाप्रमाणे वागवतील. सांभाळून घेतील. ”

“ तुम्ही एक ओळखपत्र द्या मला म्हणजे बरें होईल. ”

“ चिठीचपाटीची त्यांच्या बाबतींत मुळीच जरूर नाही. तूं निःशंक मनाने जा ! ” हुकुमाचें पाकीट माझ्या हातांत देत रावबा म्हणाले, “ उद्याच नीघ व ताबडतोब कामावर रुजू हो म्हणजे पगार सुरू होईल. मोरूभाऊ सारी मदत करतील. मोरूभाऊंबद्दल थोडीशी ऐकीव माहिती मलाहि होतीच. मन निश्चिंत झालें. महिनाभर वाटत असलेली धाकधूक नाहीशी झाली. त्यांच्यासारखा हेडमास्तर नौकरीच्या आरंभींच मिळाला ही मला मोठीच समाधानाची गोष्ट वाटली.

कठोऱ्यापासून किनगाव सुमारें दहा मैलांवर होतें. तयारी करून ठेवलेलीच होती. दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटे निघालों. तेथें नऊ-साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पोंचलों.

शाळेंतच मोरूभाऊंना भेटलों.

अतिशय आपलेपणाने आणि जिव्हाळ्याने त्यांनी मला माझी हकीकत विचारली. शाळा सुटायला वेळ होता. हाताखालच्या शिक्षकाला योग्य त्या सूचना देऊन ते माझ्याकरतां घर पाहायला गावांत निघाले.

आम्हीं तीन-चार घरें पाहिलीं. त्यांतील एक त्यांनीच पसंत केलें. त्यांच्या घरापासून तें जवळच होतें. तसेच आम्ही त्यांच्या घरीं गेलों. शाळा सुटली होती. शाळेचा शिपाई घरीं आला होता. त्याला त्यांनी माझ्याकरतां ठरविलेलें घर साफ करावयाला सांगितलें.

घरीं अगोदरच निरोप गेला होता.

“ माई ! ” मोरूभाऊंनी हांक मारली. एक आठ दहा वर्षांची मुलगी धावत आली.

“ हें पाहा ! जेवायची तयारी झाली की पाटपाणी कर व आम्हांला

हाक मार. ”

थोड्याच वेळांत माई बोलवायला आली. आम्ही जेवावयाला बसलों. मी, मोरूभाऊ व त्यांचा बबन नांवाचा बारा-तेरा वर्षांचा मुलगा. माईच वाढत होती. वाढतांना त्या पोरीची त्रेधातिरपीट उडत होती. तिची आई पलीकडून फक्त पदार्थ काढून देत होती. जेवतांना कोणीच बोलत नव्हतें. मला तें थोडेंसें चमत्कारिक वाटलें. या ब्राह्मणाच्या घरांत गोषा कुठला ? मी मुलासारखा ! मग माईच्या आईने--बाईने--वाढायला कां येऊं नये ? अं: ! असेल कांही कारण. मी लागलीच तें विसरलों.

सारी व्यवस्था नीट झाली. आमची गाडी मार्गाला लागली. मोरूभाऊ माझ्याशींच प्रेमाने वागत होते असें नाही. सर्वच शिक्षकांशीं ते आपलेपणाने वागत. कोणालाहि कांही अडलें, हवें-नको असलें की मोरूभाऊंकडे जाऊन त्याने आपलें गाऱ्हाणें सांगावें. त्यांनी पित्याच्या जिव्हाळ्याने सारें ऐकून मार्गदर्शन करावें. साऱ्या शिक्षकांचें जणूं एक मोठें कुटुंबच होतें. त्या कुटुंबांत कोठे कटकट नव्हती की हेवादावा नव्हता. सगळे अतिशय प्रेमाने वागत. कुटुंबांतील कर्त्या पुरुषावर कुटुंबाचें स्वास्थ्य कसें अवलंबून असतें तें मीं अनुभवाने पाहिलें.

पण मोरूभाऊंच्या घरीं गेलों की सारें वातावरण बदलल्यासारखें वाटे. एक प्रकारची गूढ विषादाची सांवली त्यांच्या घरावर पडल्यासारखी दिसे. पुष्कळदा मला त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग येई. पण तेथे जातांच मनावर एखादें ओझें ठेवल्यासारखें होई. मोरूभाऊ घरीं फारच थोडें बोलत. त्यांच्या मुलाशीं बोलतांना तर मीं त्यांना कधीच पाहिलें नव्हतें. जें बोलायचें तें सारें माईशीं ! बाईंना मीं कित्येक दिवस पाहिलेंच नव्हतें. ती बाई मुकी तर नाही, असा विचारहि एकदोनदां माझ्या मनाला चाटून गेला. पण मोरूभाऊ घरीं नसतांना मला जेव्हा एकदा त्यांच्याकडे जाण्याचा प्रसंग आला त्या वेळीं माझा तो भ्रम दूर झाला. बाईंनी मोरूभाऊइतक्याच जिव्हाळ्याने माझी विचारपूस केली. माझ्या पत्नीबद्दल मला विचारलें. तिला त्यांच्याकडे बसायला पाठवून देण्याबद्दल सूचना दिली.

बबन तर पुष्कळदा माझ्या भोवतींभोवतींच राहात असे. मोठा लाघवी होता पोर. त्याची सारखी चिंवचिंव चाले. त्याचें समाधान करतां करतां

ग्रंथ संग्रहालय ठाणे स्थ
वि: चरित्र
अनुक्रम ..................
क्रमांक ....१०८९.... नों: दि: ........

कित्येकदा माझी दमछाट होई. पण हें सर्व माझ्याकडे तो आल्यावरच ! त्याच्या घरीं त्याची सारंगी वाजतांना मला कधींच दिसली नव्हती. असें कां ?

भुताटकीचा त्या घराला शाप तर नव्हता ? घराच्या परिसरांत पाय ठेवला की बोलका माणूसहि अबोल व्हावा, शब्द पांगळे व्हावे, याचें कारण काय ? कोणाला विचारावें तर तेंहि मनाला रुचेना. कसें विचारायचें ? पण सर्वांच्याच मनांत ही गोष्ट गळवाप्रमाणें ठसकत असावी, असें मला दिसून आलें.

कोणीच बोलत नसे. अप्रिय गोष्ट प्रत्येकजण कटाक्षाने टाळतांना दिसे. त्या बाबतींत बोलणें म्हणजे देवमूर्तीला पाय लावणें अशीच सर्वांची भावना दिसून येत होती. पण माझें तरुण मन मला स्वस्थ बसूं देईना. मीं या साऱ्या प्रकाराचा शोध लावण्याचा प्रयत्न केला.

आणि मला कळलें —

" बबन पांच वर्षांचा होता. माई वर्षा दोन वर्षांची असेल. त्या वेळीं बबनने कशाचा तरी हट्ट धरला. माई सारखी रडत होती. बबनहि ऐकत नव्हता. बाई वैतागल्या. त्या म्हणाल्या,

" अहो, याला समजवा ना जरा. सारखा सतावतो आहे. "

मोरुभाऊ कांहीतरी कामांत होते. त्यांनी हातांतलें काम सोडलें व बबनला समजावण्याचा प्रयत्न केला. बबन कांही केल्या ऐकेना.

मोरुभाऊंना राग आला. अगोदरच त्यांच्या कामांत व्यत्यय आला होता. त्यांनी बबनच्या कोंवळ्या गालावर एक थप्पड मारली.

बबन कळवळून रडूं लागला.

बाई चिडल्या. त्यांनी माईला खाली आदळलें. बबनला उचलून घेत त्या संतापून म्हणाल्या,

" याला समजावणं म्हणतात वाटतं ? "

" भलताच हट्ट काय कामाचा ? किती समजावून सांगायचं ? "

इतक्या वेळांत माईने भोकाड पसरलें होतें. तिला उचलून घेत मोरुभाऊ चिडून कांहीतरी बोलणार तोंच बाई कडाडल्या,

" पुरुषांची जातच निष्ठुर. खबरदार माझ्या मुलाला हात लावलांत तर यापुढे ! "

" तुझा मुलगा ? तुझा एकटीचाच की नाहीं ! "

" हो हो, एकटीचाच. तुम्हांला काय वाटायचें त्याच्याबद्दल ? नऊ महिने ओझें बाळगलें मीं ! मांसाचा लोळागोळा वाढवला मीं ! माझ्या रक्तामांसाचा आहे तो. तुम्हांला काय प्रेम वाटेल त्याच्याबद्दल ? कसाया-सारखं मारायला पाहिजे ! "

" अग पण...... "

" बोलूं नका एक अक्षर आमच्याशीं. "

" ठीक आहे. घेऊन बैस तुझ्या मुलाला. पण पुन्हा माझ्याशीं बोला-यला मात्र येऊं नकोस. "

" मुळीच येणार नाही. कांही अडणार नाही आमचें ! " मारच खायचा की नाही तुमच्या हातचा ! हात लावूं नका माझ्या मुलाला यापुढे ! "

" बरं आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें होऊं दे. आजपासून तुमच्याशीं बोलणें बंद. "

" मग आमचेंच कांही अडलें आहे काय ? "

शब्दाला शब्द वाढून भलतेंच झालें. ध्यानींमनीं नव्हतें तें घडलें. वेळ गेली. राग ओसरला; पण दोघांच्याहि मनाला पीळ बसला——

आज आठ-नऊ वर्षें झालीं होती या गोष्टीला. पण त्या घरांतील हवा जी दूषित झाली होती ती अजूनहि तशीच होती.

मोरूभाऊ बोलत फक्त माईशीं. कांही हवें-नको असेल तें सांगावें माईला. कोणी बसायला आला की मोरूभाऊंनी म्हणावें,

" माई, दोन कप चहा ! "

" बाईनी मुकाट्याने चहा करून माईबरोबर पाठवावा. बबनला पेन्सिल हवी असल्यास त्याने बाईना सांगावें. बाईनी म्हणावें, " माई, बबनला पेन्सिल दे. " घरांतील तूप संपलें की बाईनी म्हणावें, " माई, तूप संपलें आहे. " मोरूभाऊंनीं तूप आणवून द्यावें.

आठ वर्षांत या स्थितींत फरक पडला नव्हता. पुढेहि पडेल असें वाटत नव्हतें. आठ वर्षांत पत्नी पतीशीं बोलली नव्हती. पतीने पत्नीची विचार-पूस केली नव्हती. मुलाने बापाला हांक मारली नव्हती. अन् बापाने मुलाला जवळ घेऊन त्याच्या अंगावरून प्रेमाने हात फिरविला नव्हता.

एकाच घरांत रहावयाचें, एकमेकांवर प्रेम करायचें, पण एकमेकांशीं चुकूनहि बोलायचें नाही. कोणाला हवें–नको असेल तें काळजीपूर्वक पाहायचें पण लक्ष नाही असें दाखवावयाचें. शक्य तों सारेच व्यवहार शब्दावांचून करावयाचे. शब्द वापरावेच लागले तर अगदी मोजून मापून बोलायचें. मोठेंच दिव्य होतें तें. यंत्राप्रमाणे सारे व्यवहार चालत होते.

पण आता तीच परिस्थिति सर्वांच्या अंगवळणीं पडली होती. त्या प्रसंगापासून त्या घरावर जी विषादाची छाया पडली होती तिच्यांत वावरणें कोणालाच रुचत नव्हतें. पण काय करावें तेंहि कोणाला सुचत नव्हतें. मोरूभाऊ अगर बाई यांच्याशीं या बाबतींत बोलण्याचें कोणालाच धैर्य नव्हतें व इच्छाहि होत नव्हती. या गोड फळांना लागलेली कीड अशी काढावी हें कोणालाच कळत नव्हतें.

दिवस भराभर जात होते. मोरूभाऊंचा माझ्याविषयींचा जिव्हाळा–प्रेम सारखें वाढत होतें. ते माझे हेडमास्तर आहेत, ही भावना मनांतून केव्हाच नाहीशी झाली होती, तरी मी त्यांच्या घरीं जाण्याचें शक्यतों टाळीत होतों.

एक दिवस, ध्यानीं-मनीं नसतां अचानक माझ्या बदलीचा हुकूम आला. नांदेडला माझी बदली करण्यांत आली होती.

सर्वांनाच वाईट वाटलें. पुन्हा 'नवी विटी नवें राज्य.' येथे मन मोहरलें होतें. जीव हरखला होता. जिव्हाळा ओढ लावीत होता. सारींच माणसें आपलेपणाने वागत होतीं. गावहि जवळच होतें. व्यवस्थाहि छान लागली होती. हें सारें सोडून जाणें जिवावर आलें; पण उपाय नव्हता.

मोरूभाऊंनी भरल्या डोळ्यांनी निरोप दिला. बाईच्या डोळ्यांतहि वात्सल्य तरंगत होतें. शब्दांनी प्रकट न होणारे भाव दोघांच्याहि डोळ्यांत दिसत होते.

मनांत आलें—

एकमेकांशीं न बोलतां अशाच रीतीने हीं माणसें आपले भाव व्यक्त करीत असतील काय? कांही दिवसांनी यांना बोलण्याचा विसर तर पडणार नाही ना? हा कसला पीळ यांच्या मनांत घर करून राहिला आहे? किती काळ तो तसाच ठाण मांडून राहणार आहे?

जास्त विचार करायला वेळ नव्हता.

नांदेडच्या नव्या परिस्थितींतहि मी लवकरच रमून गेलों. शाळा मोठी होती. शिक्षक व मुलेंहि खूप उत्साही होतीं. गावाला लागूनच तापी नदीचा संथ, खोल प्रवाह धावत होता. संध्याकाळीं आट्यापाट्या खेळाव्या व घामाने ओलेंचिंब झाल्यावर तापीवर धावत जावें. पाण्यांत खूप डुंबावें, नंतर रमतगमत घरीं जावें. वेळ कसा जात होता कळत नव्हतें. असा बराच काळ लोटला.

आमच्या आट्यापाट्यांचा संघ चांगलाच तयार झाला. खेळाडूंचें कौशल्य पणाला लावण्याकरतां कोठेतरी सामना देणें अवश्य वाटूं लागलें.

चोपड्याला रामभाऊ बजाज यांनी आट्यापाट्यांचा नमुनेदार संघ बनविल्याचें कळलें. त्यांच्याशीं लढत देण्याची तीव्र इच्छा मला झाली. रामभाऊ आणि मी ट्रेनिंग कॉलेजमध्ये तीन वर्षें बरोबरच शिकत होतों. शेवटच्या वर्षीं तर आम्ही एकाच खोलींत रहात होतों.

कॉलेजमध्ये नेहमी आट्यापाट्यांचे सामने होत असत. एका पक्षाला नेहमी रामभाऊ संघनायक असे. दुसऱ्या पक्षाची जबाबदारी माझ्यावर असे. वर्षभर आम्ही खेळाच्या मैदानावर एकमेकांवर मात करण्याचा प्रयत्न करीत असूं. आट्यापाट्यांच्या खेळांत खूप भांडणें होतात. खेळतांना भांडण चांगलें रंगलें की, हातांत हात घालून खोलीकडे जातांना आम्हांला मोठी मौज वाटत असे.

आमच्या खेळाडूंना मीं डिंवचलें. त्यांची ईर्ष्या मीं जागृत केली. दोन विद्यार्थ्यांना चोपड्याला पाठवून मीं रामभाऊंच्या संघाशी आमच्या संघाचा सामना ठरविला.

मला सामना खेळावयाचा तर होताच, पण खरें म्हणजे मला मोरूभाऊंना भेटायचें होतें. माझ्या बदलीनंतर थोड्याच दिवसांनीं मोरूभाऊ चोपड्याला आले होते. बबन तेथेच हायस्कुलांत शिकत होता. रामभाऊंच्या संघांतील तो एक भरंवशाचा खेळाडू होता.

आम्ही चोपड्याला पोंचलों. रामभाऊ व त्यांचे खेळाडू उत्सुकतेने आमची वाट पाहात होते. मला पाहतांच बबन धांवतच आला. त्याने माझे दोन्ही हात प्रेमाने हातांत धरले. आम्हांला भोवतालच्या सर्वांचा विसर पडला. आम्ही एका बाजूला जाऊन बोलत बसलों.

मीं मोरूभाऊ व बाई यांची चौकशी केली.

बबनचे डोळे भरून आले. कांही दिवसांपूर्वी बाई सोडून गेल्याचें त्याने सांगितलें. हळूहळू मीं त्याच्याकडून सर्व माहिती काढली.

" बाई आजारी पडल्या. पहिल्याने आम्हांला विशेष वाटलें नाहीं. पण पुढे दुखणें बळावलें. मोरूभाऊ सारखे जागत बसत, तरीहि दोघांचें बोलणें होत नव्हतें. ते नुसते एकमेकांकडे पाहात.

दुखणें वाढतच होतें. परिणामाची आम्हांला कल्पना येऊन चुकली. बाईच्या जिवाची सारखी उलघाल होत होती. शेवटीं त्यांना राहावलें नाही. त्यांनी मोरूभाऊंना हांक मारली. दोघांच्याहि डोळ्यांतून झरझर पाणी वाहूं लागलें.

भाऊ जवळ बसतांच मोठ्या कष्टाने त्यांच्या पायांला हात लावून त्या म्हणाल्या,

" मला क्षमा करा."

" छे ! तुझी चूक नाही. माझीच सारी चूक आहे."

" असें कां म्हणतां ? पत्नीला इतका अहंकार काय कामाचा ? ज्याच्या पायाची सेवा करायची त्याच्याशीं जिद्द ! पतीशीं अशा अभिमानाने वागायचें ! देव मला कशी क्षमा करील ? "

" वेडी आहेस ! मीच घसरलों. पतीने पत्नीला सांभाळायचें असतें. तिचें चुकलें तर तिला नीट समजावून द्यायचें असतें. तिचा हात धरून तिला बरोबर न्यायचें असतें. पण मी माझं कर्तव्य विसरलों."

" नाही; तुमची चूक नाही. स्त्रीने पतीच्या शब्दाबाहेर जायला नको हें माहीत असूनहि मी अभिमानाने वागलें. तुमच्याशीं असा अबोला धरला—"

" खरेंच तुझी चूक नाही. पुरुष शहाणा. त्याच्यावर अधिक जबाबदारी. चूक त्याने सुधारली पाहिजे; पण मी अभिमानाच्या भरीला पडलों. कर्तव्याची हेळसांड केली. पत्नीची, मुलांची आबाळ केली. अगदी, अगदी घसरलों— "

कितीवेळ दोघांच्याहि डोळ्यांतून सारखें पाणी वाहात होतें. एका तपाचें किल्मिष त्यांत वाहून गेलें.

आम्हीहि कष्टी, भारावलेल्या हृदयाने तें दृश्य पाहात होतों.

त्यानंतर चारपांच दिवस बाई होत्या. भाऊंशिवाय कोणाकडूनहि त्या औषध घेत नव्हत्या. भाऊंचा हात सारखा हातांत धरून ठेवला होता त्यांनी. जणूं त्यांना कोणी आपल्यापासून दूर नेईल ! भाऊंशीं त्या सारख्या बोलत होत्या. वैद्यांनी बोलायची मनाई केली होती. पण आतां त्या कोणाचेंच ऐकायला तयार नव्हत्या. "आता मी गप्प बसणार नाही. काय व्हायचें तें मला कळलें आहे. माझें हरवलेलें धन मला मिळालें आहे. बारा वर्षांचा उपवास मला सोडायचा आहे. " त्या निक्षून म्हणाल्या.

दोनचार दिवस असे गेले आणि बोलतां बोलतां एके दिवशीं बाई आम्हांला सोडून गेल्या. " बबनने डोळे पुसले. माझाहि हात नकळत डोळ्यांकडे गेला.

" मोरूभाऊंचें आतां कसें आहे ? "

" आता दिसेलच तुम्हांला. तेव्हापासून ते कुणाशींच बोलत नाहीत. अगदी नाइलाज झाला म्हणजे कामापुरतें बोलतात. ते जणूं शब्दच विसरून गेले आहेत. त्यांची प्रकृतीहि खूप खालावली आहे. "

" चल, आपण घरीं जाऊं. अगोदर भाऊंची भेट घेऊं. "

" त्यांना सामन्याबद्दल सांगून जाऊं. "

" चल, सामना कोठे पळून जातो ! आपण आल्याशिवाय तो थोडाच होणार आहे ! मी येथे सामना खेळायला आलों नाही; तें नुसतें निमित्त आहे ! "

आम्ही बबनच्या घरीं गेलों.

मोरूभाऊ समोरच बसले होते. उसाच्या चिपाडाप्रमाणे खंगलेले ! अगदी दुबळे झालेले ! निस्तेज डोळे खूप खोल गेलेले !

थोड्या दिवसांत केवढा फरक पडला होता त्यांच्यामध्ये ! त्यांना पाहतांक्षणीं माझा ऊर भरून आला.

मला पाहतांच त्यांना झालेला आनंद ते लपवूं शकले नाहीत. अत्यंत आवेगाने माझा हात धरून त्यांनी माझें स्वागत केलें.

ते फारसें बोलले नाहींत. पण त्यांचें मन कळायला मला शब्दाची जरूर भासली नाही. मलाहि बोलणें शक्य झालें नाही.

बऱ्याच वेळाने ते हलकेंच म्हणाले,

" बाई गेल्या ! "

" मला कळलें तें. "

"एक लक्षांत ठेव. आयुष्यभर लक्षांत ठेव. तुटेल तोंपर्यंत ताणूं नकोस. आपल्या प्रेमाच्या माणसाशीं वागतांना अभिमानाला बळी पडूं नकोस. मानापमानाच्या कल्पनांनी डोकं फिरवून घेऊं नकोस ! दुराग्रह, हट्ट मर्यादेबाहेर जाऊं देऊं नकोस. प्रेमाच्या माणसापुढे पड खाण्यांत, कमीपणा पत्करण्यांतच मोठेपणा असतो; माझेंच म्हणणें खरें, दुसऱ्याच्या मनांत काय येईल याचा विचार करण्याची मला काय जरूर ? माझ्या विचार-सरणींत चूक असणें शक्य नाही हा अहंकार माणसाला फार फार घातक असतो. त्याच्या प्रेमाचीं माणसें त्यामुळे त्याला दुरावतात. तो स्वतः दुःखी होतो व आपल्या माणसांनाहि दुःखी करतो. त्यांचेंहि सुख नष्ट करतो. पण मला फार उशीरा कळलें हें. म्हणून सारखा तळमळतो आहें मी ! अशी चूक तूं करूं नकोस ! "

बबन आश्चर्यानें मोरूभाऊंकडे पाहात होता. किती दिवसांनी ते असे एकसारखे बोलले. इतकीं वाक्यें किती दिवसांनी त्याला त्यांच्या तोंडून ऐकायला मिळालीं.

" लक्षांत ठेवीन मी नीट हें भाऊ ! कधी विसरणार नाही ! "

" तूं सुखी होशील असा तुला माझा आशीर्वाद आहे ! "

मीं त्यांच्या पायांला हात लावून भारावलेल्या मनानें त्यांचा निरोप घेतला.

त्या दिवशींचा सामना कसा झाला, मला कळलेंच नाही !

★

# ६

# कर्जाची फेड

“ मी केव्हाची तुमची वाट पाहतों आहें ! ” मी शाळेंतून घरीं येतांच ओटीवर थांबलेला एक माणूस उभा राहात म्हणाला.

मीं आपादमस्तक त्या गृहस्थाकडे पाहिलें. ऊन-पावसांत सतत काम केल्यामुळे त्याचा चेहरा खूप करपल्यासारखा दिसत होता. काळाने त्याच्या मुखावर आपल्या अनेक निशाण्या स्पष्ट उमटविल्या होत्या. तरीहि त्यामागील त्याचा चेहरा कोठेतरी पाहिल्यासारखें मला वाटलें, पण निश्चित कांही आठवेना.

“ मी आप्पाभाऊंचा सालदार ! ” मीं त्याला ओळखलें नाही हें त्याच्या लक्षांत आलें असावें. “ मला त्यांनी मुद्दाम तुमच्याकडे पाठविलें आहे ! ”

“ अस्सें ! कसें काय चाललें आहे त्यांचें ? फार दिवसांत त्यांची भेट झाली नाही. ”

“ कशी होणार ? किती वर्षांत तुम्ही कठोऱ्याला आला नाहींत ! त्यामुळेच माझीहि ओळख तुम्हांला पटली नाही. ”

“ काय म्हणताहेत आप्पाभाऊ ? आता एकदा त्यांची अवश्य भेट घेतली पाहिजे. ”

“ तुम्हांला त्यांनी भेटायला बोलावलें आहे. मुद्दाम हा निरोप तुम्हांला सांगण्याकरतांच त्यांनीं मला पाठवलें आहे. ”

“ ठीक आहे ना त्यांचें ? ”

" बऱ्याच दिवसांपासून त्यांना ' मानगी ' आली आहे. अगदीं खंगून गेले आहेत. "

" काय होतें आहे त्यांना ? "

" म्हातारपणची मानगी ! पिकलें पान केव्हा गळून पडेल याचा कांही नेम नाही. मग केव्हा येणार म्हणून सांगूं ? "

" येत्या रविवारीं येतों. "

" फार बरें वाटेल त्यांना तुम्ही भेटल्यामुळे ? किती आठवण काढली त्यांनी तुमची ! शेवटीं मला पाठवलें. ' एकदा भेटून जा म्हणावें ' म्हणून सांगितलें. "

" ठीक आहे. रविवारीं येतों म्हणून सांग. तूं जेवण वगैरे करून घे अन् मग जा. "

× × ×

" एकदा भेटून जा " हे शब्द ऐकतांच माझ्या डोळ्यांसमोर सुमारे वीस वर्षांपूर्वींचा काळ एकदम उभा राहिला. त्या वेळींहि मला असाच त्यांचा निरोप आला होता.

तो निरोप ऐकतांच मी कितीतरी थरारलों होतों. अनामिक भीतीने माझें मन गोंधळून गेलें होतें. अंगांतलें रक्त क्षणभर गोठल्यासारखें मला वाटलें होतें.

आप्पाभाऊंसमोर जाऊन उभें राहणें काय सोपें होतें ? तें एक दिव्य होतें ! पण त्या दिव्यांतून जायलाच हवें होतें ! त्यांनी बोलावल्यावर न जाणें गावांत कोणालाच शक्य नव्हतें ! पाटील-तलाठ्यांना काय किंवा हेडमास्तरांना काय, आप्पाभाऊंचा शब्द कधी ओलांडतां येत नव्हता ! मग माझी काय कथा ?

आप्पाभाऊ गावचे अनभिषिक्त राजे होते. हें राजेपण त्यांना गावाने खुशीने दिलें होतें. सर्वांवर त्यांची जबर जरब होती एरवीं बेफाम वागणारीं बेलगाम तरणीं पोरें त्यांच्या समोरून जातांना सुतासारखीं नरम होत असत. कधीहि पदराची पर्वा न करणारी पोरगी त्यांच्यापुढून जाण्यापूर्वीं डोकीवर पदर सांवरून घेतल्याखेरीज जाण्याचें धाडस कधीच करीत नसे.

नेहमी क्षुल्लक मानापमानासाठी तणतणणारीं माणसें त्यांच्यासमोर आज्ञाधारक मुलांसारखीं बसत असत. कधीकाळी गावांत येऊन हुकमत गाजविणारे मामलेदार-फौजदार आप्पाभाऊंच्या डोळ्यांचा मागोवा घेऊनच पुढचें पाऊल टाकात असत. आप्पाभाऊ आम्हांला जमदग्नि वाटायचे. ते वाटेल त्याला फटकारीत असत.

एकदा खळवाडींत आग लागून एकाचें खळें जळालें होतें. सर्व चारा जळून गेला होता. त्याच्या गुरांना उपाशी मरावें लागणार होतें. आप्पाभाऊंनी सर्वांकडून थोडा थोडा चारा गोळा करून त्याची गरज भागवली होती.

नंतर आगीच्या कारणाचा शोध घेण्याकरतां फौजदारसाहेब आले होते. ते त्या भागांत नवीनच होते. पाटील-तलाठ्यांनी त्यांना सांगितलें होतें की, " आकसानं कांहीं झालेलें नाहीं. विडी-चिलीम ओढतांना काडी फेकली गेली असेल. " पण फौजदारांना तें पटलें नव्हतें. त्यांनी शेजारचे खळेवाले व आजूबाजूचे लोक बोलावले होते, व त्यांना छेडायला सुरुवात केली होती. आग विझली होती, पण तो आग्यावेताळ भडकला होता. अशी संधि त्याच्या दृष्टीने मोठीच पर्वणी होती. दोनचार दिवसांत फौजदाराने त्या लोकांना ' दे माय धरणी ठाय ' असें केलें होतें.

आप्पाभाऊ सारें पाहात होते, शेवटीं ते चावडीवर फौजदाराकडे गेले होते व त्यांनी करड्या आवाजांत विचारलें होतें,

" सरकार, कां गरिबांना छळतां ? "

" कोण रे तूं ? " फौजदाराने लाल डोळे करून गुर्मींत विचारलें होतें.

" या गावचा कुत्रा ! लोकांना छळूं नका. जड जाईल तुम्हांला ! " एवढेंच बोलून ते निघून आले होते. फौजदार भडकून उठला होता. त्याने मिशीला पीळहि भरला होता.

पण पुढे काय झालें कोणास ठाऊक. सारा तमाशा थांबला होता व फौजदार कापसासारखा मऊ झाला होता.

आप्पाभाऊ आमच्या गावचे पोलादी पुरुष होते. भर रस्त्यावर असलेल्या आपल्या वाड्याच्या ओटीवर ते नेहमी बसलेले असत. गावचा मुख्य वापर याच रस्त्याने चालायचा. त्यामुळे साहजिकच त्यांची सर्वांवर नजर राहात असे. ते फारसे बोलत नसत, पण त्यांचा चौकस डोळा

सगळीकडे फिरत रहावयाचा. गावांतल्या एका आडदांड मुलाने कोणातरी पोरीची एकदा खोडी काढली होती. तेव्हा तो हिरवा-निळा होईपर्यंत हातांतल्या निरगुडीच्या फोकाने त्यांनी त्याला धडा शिकविला होता. गावांत बरीचशी ' भिल्लांची वस्ती. ' किरकोळ चोऱ्या करण्याकडे त्यांची प्रवृत्ति. पण आप्पाभाऊंची जरब अशी की, गावच्या शिवारांत ते कोणाच्या काडीला हात लावायचे नाहीत. जें करायचें तें सारें परक्या शिवारांत. ते ओटीवर बसलेले दिसले की आम्हां मुलांना तेथें जणूं वाघच बसलेला दिसायचा. आम्ही दुरून त्या दुर्वासाला टाळून जात असूं.

आप्पाभाऊंचा निरोप येतांच मी मनाच्या तशा स्थितींत त्यांच्याकडे जायला निघालों होतों. आपल्या हातून कांही चूक झाली का म्हणून मी सारखे हृदयाचे कानेकोपरे धुंडाळत होतों; पण तसें तर कांही वाटत नव्हतें.

त्यांच्यापुढे जाऊन उभा राहिल्यावर घडलेलें संभाषण तर कालच घडल्याप्रमाणे अजूनहि मला वाटतें. त्या घटनेनंतर माझ्या जीवन-प्रवाहाला अगदी निराळें वळण लागलें. आज मला जे दिवस दिसत आहेत ते तसे दिसायला तो प्रसंग कारणीभूत झाला आहे. नाहीतर...नाहीतर....ती कल्पनाच नको.

मी आप्पाभाऊंच्यापुढे जाऊन उभा राहिलों होतों.

" या ! "

पहिला फटका बसतांच माझा जीव उडून गेला.

थोड्याच दिवसांपूर्वी सातवीची परीक्षा पास झालेला मुलगा मी ! त्याला खेडेगांवांत ' अहो-जाहो ' कोण म्हणणार ? तो शब्द माझ्या कानांना परिचित नव्हता. आप्पाभाऊंचा तो अनपेक्षित शब्द कानीं पडतांच मी थिजून गेलों. असहायपणे मीं त्यांच्याकडे पाहिलें.

" मीं तुला कांही मागितलें तर देशील काय ? "

माझ्या कांहीच लक्षांत येईना ! माझ्यासारख्या मुलाजवळ हा एवढा मोठा गृहस्थ मागणार तरी काय ? मी त्याला काय देऊं शकणार ? काय आहे हें ?

" बोल, देशील काय ? "

" अं ! काय म्हणतां ? "

"मला एक वचन पाहिजे तुझ्याकडून!"

"कसलें वचन?"

"तूं माझें ऐकणार आहेस का?"

"अशी शंका कां वाटते आपल्याला?"

"मला वचन पाहिजे तुझ्याकडून 'पुन्हा पत्ते खेळणार नाही' असें!"

मीं अधिकच गोंधळून त्यांच्याकडे पाहिलें होतें.

एकदम माझे दोन्ही हात आपल्या रांकट-कणखर हातांत धरून ते म्हणाले होते,

"माझी नजर आहे पोरा तुझ्यावर! तूं हुशार आहेस. फायनलच्या परीक्षेंत तूं फार चांगले मार्क मिळविले आहेस! पण आतां तूं हें काय चालवलें आहेस? तूं तीन पत्ते खेळायला लागलास! घरीं बोलायला कोणी नाही! बापाने बरीचशी इस्टेट जुगारांत घालविली. समोर असें उदाहरण! मुलाने बापाच्या पावलावर पाऊल टाकलें तर नवल काय? पण पत्त्यांचा नाद फार वाईट आहे बरें! दोन तीन पोरें जुगारापायीं धुळीला मिळालेलीं तुला माहीत नाहीत काय? तो देवचंद, तो गोपू. चांगलीं पोरें! वाया गेलीं! अन्नाला महाग झालीं! भिकेची झोळी गळ्यांत पडली! तुला पाहून मोठी उमेद वाटायची! पण तुझा हा नाद कळला! जीव उडून गेला. अजून कांहीं बिघडलें नाही. यापुढे त्या वाटेस जाऊं नकोस! मला वचन दे, 'पुन्हा जुगार खेळणार नाही म्हणून!"

आप्पाभाऊंच्या हृदयाच्या गाभ्यांतून एक एक शब्द बाहेर पडत होता. त्यांच्या मनाच्या वेदना, जिव्हाळा, तगमग, तळमळ, वात्सल्य शब्दाशब्दांतून जाणवत होतें. वर्षाकाळांत सह्याद्रीचे काळे फत्तर इंचा-इंचावर पाझरूं लागतात, त्याप्रमाणें जणूं त्यांचें पोलादी मन अक्षराअक्षरांतून पाझरत होतें. अंतरीची कोंवळीक साध्या शब्दांना वज्राचें सामर्थ्य कसें देत असते, तें मी स्वतःच अनुभवीत होतों.

आप्पाभाऊंच्या हातांत माझे हात होते. त्यांच्या त्या कठोर हातांवर मखमलीची लव वठली होती. डोळ्यांतून निरपेक्ष दयेचा, वात्सल्याचा माझ्या सर्वांगावर वर्षाव होत होता. त्या अमृतांत मी न्हाऊन निघालों होतों.

" देणार ना वचन मला ? " माझे हात हृदयाशीं ओढीत आप्पाभाऊंनी जरा वेळाने मला विचारलें होतें.

तो थोर पुरुष माझी याचना करीत होता. माझ्या हितासाठी लाचार होऊन तो मजजवळ मागणें मागत होता. 'तरुशिरीं मूळ उफराटें' कसें असतें हें मी उघड्या हृदयानें व अर्धमिटल्या डोळ्यांनी पाहात होतों.

" देतोस ना वचन ? "

" आप्पाभाऊ, मला आणखी मारूं नका. लाजवूं नका. मी पुन्हा कधीं जुगार खेळणार नाही. "

" शपथ घे. "

" मी तुमच्या पायाची शपथ—"

" नको ! माणसाच्या पायाची शपथ घेऊं नये. एखादे वेळेस ती मोडायचा मोह व्हायचा. शपथ नेहमी देवाची घ्यावी. "

" तुम्ही सांगाल तशी, सांगाल त्याची शपथ घेतों. "

" पुरे, माझें काम झालें ! "

खरोखर काम झालें होतें माझें ! घसरणीवरून सांवरलों होतों मी ! उषःकाल दिसला होता मला ! आप्पाभाऊंनी तो दाखविला होता.

आणि आज पुन्हा तसाच मला त्यांचा निरोप आला होता. अगदी तेच शब्द इतक्या वर्षांनी पुन्हा ऐकत होतों.

रविवारीं सकाळीच मी आप्पाभाऊंना भेटायला निघालों होतों. पिशवींत थोडीशीं मोसंबीं घेऊन मोटार-स्टँड गाठला होता.

रस्त्याने मन आप्पाभाऊंच्या आठवणींभोंवतीं सारखें फिरत होतें.

त्या प्रसंगानंतर ट्रेनिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळावा म्हणून मी अभ्यास करूं लागलों होतों. आप्पाभाऊंनी एक खोली दिली होती. तेथेच फावल्या वेळीं, शेतांतून परत आल्यावर, वाचीत बसत होतों. आप्पाभाऊंच्या सांगण्यावरून ट्रेनिंग कॉलेजमधून नुकतेच शिकून आलेले एक शिक्षक मला मधून मधून मार्गदर्शन करीत होते.

प्रवेशपरीक्षेमध्ये माझा दुसरा क्रमांक आला होता. सुटींत जेव्हा मी गावीं परत आलों होतों, तेव्हा आप्पाभाऊंना झालेला आनंद मला त्यांच्या डोळ्यांत दिसत होता.

" माझी खात्री होती ! " तीनच शब्द ते बोलले होते, पण त्यांत त्यांना वाटणारा अभिमान, स्वतःच्या कृतीविषयींची निष्ठा आणि कर्तव्य-पूर्तीचें समाधान यांचा पूर्ण आविष्कार झालेला मला समजून आलेला होता.

तिसऱ्या वर्षांत माझा नंबर आला, त्या वेळीं पुन्हा तेच तीन शब्द मीं त्यांच्या तोंडून ऐकले होते. तोच आनंद, तेंच समाधान मला त्यांच्या डोळ्यांत दिसलें होतें.

माझ्या तिसऱ्या वर्षाच्या परीक्षेचा निकाल कळला तेव्हा तर त्यांना कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें होतें. त्यांचा आनंद माझ्या आनंदापेक्षा निःसंशय अधिक होता.

पुढे किनगावला माझी नेमणूक झाली होती. रुजू व्हायला दोनचार दिवसांचा अवधि होता. संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून तयारी करावी लागते. आमची स्थिति तशीच होती. आप्पाभाऊंच्या तें लक्षांत येतांच त्यांनी मला बोलावून घेतलें होतें; व माझ्या हातावर पंचवीस रुपये ठेवले होते.

" भांडीं वगैरे जरुरीचें सामान घे ! "

" पैसे कशाला पण ? " कांहीतरी बोलायचें म्हणून मी बोललों होतों.

" मग काय, पैशाशिवाय तुला भांडीं मिळणार आहेत ? "

" तरी पण तुम्हांला त्रास... "

" शिकूनहि शहाणपण आलं नाही. जा. पुढें सवड झाली म्हणजे परत कर. महिनाभर नौकरीच्या गावीं काय खाणार ? मला दिसतें आहे सारें ! "

उलटून बोलायची सोय नव्हती.

त्या पंचवीस रुपयांच्या पायावरच मीं माझ्या संसाराची इमारत उभारली होती.

आणि दोन-तीन महिन्यांनंतर ती रक्कम मी आप्पाभाऊंना परत द्यायला गेलों तेव्हाचें तें भाषण ! नुकतेंच घडल्याप्रमाणे मला आठवत होतें.

" कां ? अगदी ओझें झालें होतें काय ? "

" आपलें किती ऋण डोक्यावर ठेवायचें ! "

" ऋण फेडण्याचा विचार चाललेला दिसतो आहे ! "

" आप्पाभाऊ, आपलें ऋण माझ्याकडून कधीतरी फिटणार आहे का? हें किरकोळ देणें-घेणें आहे. मुद्दल सारें तसेंच राहणार आहे. त्यांत मी आकंठ बुडालों आहें. हा वरवरचा हिशेब आहे."

" अरे, पण इतकी काय घाई होती? तुझें सगळें व्यवस्थित होऊं द्यायचें होतेंस, मग... "

" कल्पनेबाहेर माझें व्यवस्थित चाललें आहे. आपण या एकदा पाहायला. मला फार फार आनंद होईल. "

" अरे! तूं हे पैसेहि आणून दिलेस. नाहीतर आलों असतों रोहिल्या-सारखी वसुली करायला! "

" तशी खात्री असती तर आतांच हे पैसे परत नेले असते मीं! अन् भाग पाडलें असतें तेथे यायला तुम्हांला! मी पण कच्च्या गुरूचा चेला नाही. पठाण-रोहिला परवडतो, पण तुमच्यासारखे लोक नाहीं परवडत. त्याचें कर्ज तो कोणत्या ना कोणत्या रीतीने वसूल करून घेतो; पण हे असे लोक ऋणकोला आपल्या ऋणांत कायमचे गुदमरवून टाकतात. ऋणकोला आपल्या ऋणाची फेड करण्याची संधि ते कधीच देत नाहीत. आपल्या कातडीचे जोडे करून त्यांच्या पायांत घालायची ऋणकोची तयारी असते; पण हे असे खमंग असतात-आजन्म आपल्या ऋणांत जखडून ठेवतात. त्याला मुक्त व्हायची कधींच संधि देत नाहीत. "

" तूं बाबा आता विद्वान् झाला आहेस. माझ्यासारख्या अडाणी माणसाला तूं काय बोलूं देणार आहेस? "

" म्हणजे हें सारें काय बोलणेंच आहे? यांत खरेपणा नाही? " मला किंचित् दुखावल्याप्रमाणे वाटून मीं एकदम त्यांना विचारलें,

" तसें नाही रे बाबा! सारें खरें आहे! मी रोहिल्याप्रमाणे माझ्या ऋणाची तुझ्याकडून फेड करून घेईन. प्रसंग येऊं दे. मग तर झालें? "

" तो प्रसंग लवकर यावा अशी माझी इच्छा आहे. "

" म्हणजे तूं ऋणमुक्त व्हावास म्हणून मीं अडचणींत सांपडावें असेंच ना? "

" आप्पाभाऊ! "

" अरे, थट्टाहि समजत नाही का तुला? ठीक आहे. तुझ्याकडून सर्व कर्जाची फेड करून घेईन मी. तुला मुक्त करून टाकीन. "

× × ×

अशा विचारांत मन फिरत असतां मी गावीं पोंचलों. सरळ आप्पाभाऊंच्या घरींच गेलों. समोरच आप्पाभाऊंचा मुलगा श्रीधर कांहीतरी करीत होता.

" या ! या ! सर, आप्पाभाऊ सारखी तुमची वाट पाहताहेत. कितीदा विचारलें आतापर्यंत ! "

" बरें आहे ना ? "

" तसें ठीक आहे, पण भारीच ढासळली आहे प्रकृति. "

" औषध कोणाचें सुरू आहे ? "

" रामा लोखंड्यांचें औषध आहे. आताच पाहून गेले ते ! "

" काय म्हणतात ते ? "

" म्हणतात वयोमान झालें आहे. तशी प्रकृति बरी आहे; पण त्यांनी कांहींतरी मनांत खंत बाळगली असावी. त्यामुळे औषधाचा व्हावा तसा परिणाम होत नाही. "

" बरें चला, पहिल्याने पाहूं या तर खरें ! "

आम्ही आंत गेलों.

मला पाहतांच आप्पाभाऊ उठायचा प्रयत्न करूं लागले. मीं त्यांना तसेंच निजवलें.

" उठूं नका आप्पाभाऊ ! "

" ये बाबा, किती वाट पाहायला लावलीस रे ! "

" मला कल्पना नव्हती. नाहीतर मी रविवारपर्यंतहि थांबलों नसतों. "

" श्रीधर, स्नान-जेवणाची व्यवस्था कर यांच्या. सावकाश, व्यवस्थित होऊं दे सारें ! "

" होईल की ! काय घाई आहे ? "

× × ×

सर्व आटोपल्यावर मी आप्पाभाऊंच्या जवळ जाऊन बसलों. कांही वेळानंतर इतर माणसें उठून गेलीं. आम्ही दोघेंच राहिलों.

मी त्या पोलादी पुरुषाकडे टक लावून पाहात होतों. त्यांचेहि डोळे माझ्यावर खिळले होते. दुसऱ्यावर सत्ता चालविणाऱ्या त्या पुरुषाची आता स्वत:वरहि सत्ता चालत नव्हती. ते अगदीं अगतिक झालेले दिसत होते.

त्यांच्या शरीराची कणखर कांब जणूं वितळून मऊ झाली होती. डोळ्यांतील रग केव्हाच निघून गेली होती. जराजर्जर हाडांचा सांपळा डोळ्यांना दिसत होता.

त्यांनी माझे दोन्ही हात हातांत घेतले. पूर्वीं असेच माझे हात त्यांनी हातांत धरले होते. पण केवढा फरक होता त्या वेळच्या आणि आताच्या हात धरण्यांत? त्या वेळीं रक्ताच्या कणाकणांत जिवंतपणा होता. मला वाटलें होतें, ' हातावर मखमलीची लव वठली आहे. ' आता तेच हात अगदी निर्जीव रक्तहीन झाले होते. पोलादाचा कणखरपणा तर त्यांत नव्हता, त्यांतला गारवा मात्र जाणवत होता. अगदी शुष्क, रक्तहीन!

मी हळूच म्हणालों,

" किती खंगलांत आप्पाभाऊ ! "

" अरे बाबा, वय झाल्यावर असेंच व्हायचें! तें जाऊं दे. मीं तुला मुद्दाम बोलावणें पाठवलें होतें. किती दिवसांत तूं भेटला नाहीस. फार वाट पाहात होतों मी तुझी. पण विसरलास तूं मला ! "

" असें म्हणूं नका. "

" तूं विसरलास पण मी विसरलों नाही. सावकार ऋणकोला कधी विसरत नाहीं. ऋणको मात्र त्याला विसरतो, टाळतो. कधी भेटत नाहीं."

" आता तुम्ही फार बोलूं नका बरें ! "

" बोलूं दे रे मला. बोलण्याकरतां तर तुला बोलावलें. माझें मन मोकळें होईल. तर...हें पाहा, तूं माझा ऋणको आहेस ना ? "

" होय, तें काय सांगायला पाहिजे ? "

" मला माझ्या ऋणाची फेड करून पाहिजे. तूं तें ऋण फेडलें पाहिजे. वाटेल तें करून चुकतें केलें पाहिजे ! "

" जरा स्पष्ट सांगा ना आप्पाभाऊ. "

" मी दुसऱ्यांना सांगत होतों व ते माझें ऐकत होते; पण माझ्या घरचेच आता माझें ऐकत नाहीत. दुसऱ्यांना मीं रस्ता दाखविला, उपदेश

केला, मार्गाला लावलें, पण माझ्या मुलाला मी रस्ता दाखवूं शकत नाही. तो चुकतो आहे हें पाहात असूनहि मी कांही करूं शकत नाही. उघड्या डोळ्यांनी मला पाहावं लागतं. मन सारखं तगमगत असतं. "

" आप्पाभाऊ, जरा शांत व्हा. श्रीधरची कांही चूक होत असेल तर आपण कांहीतरी तोड काढूं. मी वाटेल तें करीन. तुम्ही निश्चिंत व्हा. "

" हें बघ, दुसऱ्यांना जुगार खेळूं नका म्हणून मी पटवून देऊं शकत होतों, पण श्रीधरला मात्र मला तें पटवून देतां येत नाही. त्याला जुगाराचा नाद लागला आहे. मला तो थोडासा वचकून असतो, पण...तूं कांहीहि कर; पण त्याला यांतून सोडव. माझ्या ऋणाची अशी फेड करून पाहिजे मला ! "

" आप्पाभाऊ, फेड कसली ? माझें तें कर्तव्य आहे आणि मी यशस्वी होईन असें निश्चित वाटतें मला. तुम्ही कांही काळजी करूं नका. "

" तुझ्याबद्दल श्रीधरच्या मनांत निष्ठा आहे. तुझें तो ऐकेल. "

" तुम्ही सारें मनांतून काढून टाका अन् स्वस्थ पडून राहा. मी सारें पाहतों. सारें व्यवस्थित करतों. "

आप्पाभाऊंना मीं आश्वासन दिलें खरें, पण तें कांही सोपें काम नव्हतें ! नादी माणसें सहजासहजीं आपला नाद सोडीत नाहीत. कौशल्यानेच श्रीधरची समजूत घालणें अवश्य होतें. सर्व दिवसभर मी विचार करीत होतों, पण निश्चित उपाय दिसेना. फुंकर मारून इजा होऊं न देता कांटा काढावयाचा होता.

संध्याकाळीं श्रीधर व मी त्याच्या शेताकडे फिरत फिरत गेलों. इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मीं मूळ विषयाला हात घातला.

" श्रीधर, बऱ्याच दिवसांत मी गावाकडे आलों नाही. गावांत कांही नवलविशेष ? "

" तसें तर कांही नाही. "

" आताहि पूर्वीप्रमाणे जुगाराचे डाव चालतात की नाही ? "

" म्हणजे ? " श्रीधरने चमकून विचारलें.

" अरे बाबा, पूर्वी आपल्या गावांत तीन पानांचा डाव असा रंगत असे ! कांही बहाद्दर आपली वर्षाची कमाई एका दिवसांत घालवीत असत. किती

जणांना आपलं घरदार, शेतमळे विकावे लागले आहेत. त्यांची अन्नान्न दशा होऊन त्यांच्या मुलांमाणसांच्या तोंडांतील घांस काढून घेतला गेला आहे. फार फार हाल झाले आहेत कांही लोकांच्या बायकापोरांचे. म्हणून विचारतों, अजूनहि तसेंच चालू आहे का ? "

" खेळतात कांही कांही लोक ! "

" मोठी चूक करतात बिचारे ! त्यांची चूक पटवून देणारे त्यांना कोणी मिळत नाहीत, त्यामुळें ते घसरतात व आयुष्याचा खेळखंडोबा करून बसतात. वेळेवर चूक कळून ती सुधारतां आली तर केवढा फरक पडतो माणसांमध्यें, तुला कल्पनाहि होणार नाही ! "

श्रीधरने माझ्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहिलें.

" माझ्याकडेच पाहा ना ! तुला नवल वाटेल सांगितलं तर...मीहि एक जुगारी होतों. मला योग्य मार्गदर्शक मिळाला म्हणूनच माझ्या जीवनांत एवढी क्रांति झाली. एका थोर गृहस्थाने मला सावरलें नसतें तर मी कोणत्या अवस्थेंत असतों याची कल्पनाहि करवत नाही. माणूस घसरतो, चुका करतो; पण त्याचें नशीब चांगलें असलें तर त्याला कोणीतरी महाभाग सावरतो. "

श्रीधर मुकाट्याने ऐकत होता. त्याच्या हृदयांतील खळबळीचा ठसा त्याच्या मुखावर स्पष्ट उमटलेला दिसत होता.

" आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या थोर गृहस्थाचें नांव काय ? " श्रीधरने एकदम विचारलें.

" मलाच नव्हे तर अनेकांना आप्पाभाऊंनी सावरलें आहे. आजचे हे दिवस मी केवळ त्यांच्यामुळे पाहूं शकलों. तुला अभिमान वाटला पाहिजे अशा थोर पुरुषाचा पुत्र असल्याबद्दल ! "

किती वेळ आम्ही मुकाट्याने चालत होतों. श्रीधरच्या मनांतील गोंधळाची मला कल्पना होती. त्याला विचाराला वेळ देणेंच योग्य होतें.

कांही वेळ गेला. श्रीधरचें मन शांत झालें.

" सर, " श्रीधर आवेगाने म्हणाला, " मलाहि असा महाभाग आढळला आहे. माझ्यापुढे तो उभा आहे. मला कबूल करायला आता मुळीच लाज वाटत नाही. मला तीन पत्त्यांचा नाद लागलेला आहे—नव्हे

होता ! आपण माझे डोळे उघडले. आप्पाभाऊंनी मला कितीदा सुचवलें पण मीं लक्षच दिलें नाही त्यांच्या म्हणण्याकडे. म्हाताऱ्याच्या मनाला तेंच लागलें असावें. त्यामुळेच त्याने हाय खाल्ली असेल. आपण परत जाऊंया ! ''

आम्ही परत फिरलों.

आप्पाभाऊंच्या खोलींत आम्ही शिरतांच श्रीधरने त्यांच्या पायांवर हात ठेवून सांगितलें, " बाबा, तुमच्या पायाची शपथ घेऊन सांगतों, यापुढे मी कधी जुगार खेळणार नाही. मला क्षमा करा ! ''

केवढा आनंद झाला आप्पाभाऊंना. त्यांचे निस्तेज डोळे तेजाने लुकलुकूं लागले. त्यांच्या गाला-ओठांत रक्त फिरूं लागल्याचा स्पष्ट भास झाला मला !

" मी आता लवकरच बरा होईन. '' नंतर माझ्याकडे वळून ते म्हणाले, " तूं आपला कर्जरोखा फेड करून फाडून टाकला आहेस. ''

" इतक्यांत नाही. कांही दिवस जाऊं द्या. मग ठरेल खरोखर कर्जरोखा फाडला की नाही तें ! ''

मी परत आलों.

बऱ्याच दिवसांनी आप्पाभाऊंची कापऱ्या अक्षरांत लिहिलेली चिठ्ठी मला मिळाली.

" आशीर्वाद. कर्जाची पूर्ण फेड झाली. पण असा प्रसंग येऊन कर्जाची फेड कोणाचीहि व्हायला नको. त्यापेक्षा कर्ज बुडालें तरी चालेल.

आप्पाभाऊ. ''

मला अतिशय समाधान वाटलें.

★

# ७

# तो खेडवळ माणूस

" हं, थांबा ! ओहोळाचें पाणी पिऊं नका. त्या टेकाडांतून पाझरणाऱ्या झरीचें पाणी प्या. "

" कां प्यायचें नाही ओहोळाचें पाणी ? किती स्वच्छ, नितळ दिसतें आहे. "

" पाणी स्वच्छ दिसतें, नितळ वाटतें; पण तें प्यायला योग्य नाही. अपाय होईल तें प्याल्यामुळे. "

" समजलें नाही तुम्ही काय म्हणतां तें ! "

" वरच्या बाजूला या ओहोळाच्या कांठीं बचनागाचीं झाडें आहेत. त्यांच्या मुळ्यांतून हें पाणी वाहात येतें. त्यामुळे तें स्वच्छ दिसत असलें तरी अपाय करतें म्हणून तें प्यायचें नाही. "

" असें आहे काय ? आम्हांला हें काय माहीत ? स्वच्छ दिसलें, तहान लागली आहे म्हणून प्यायला धजलों. "

" शहरांतील लोक तुम्ही ! वरचा देखावा पाहून चटकन् बरें-वाईट ठरवितां. आम्ही खेडवळ माणसें ! आम्हांला फारसें कळत नाही तुमच्या-सारखें ! पण आम्ही वरवर पाहून कधी भुलत नाही. नोट रुपयाची कां असेना, चारदा पाहून घेऊं ! दिडकीसुद्धां नीट पारखल्याशिवाय खिशांत घालणार नाही कधी. तुम्ही आम्हांला बावळट समजून हसतां पण तसे आम्ही पक्के असतों. खरें की नाही सर ? "

" खरें आहे. अगदी खरें आहे. " मला नकार देतां येणें शक्यच नव्हतें.

कांही विद्यार्थी व दोन-तीन शिक्षक मिळून आम्ही सातपुड्यांत सहलीला गेलों होतों. दिवाळीच्या सुटीचे दिवस होते. दिवाळीच्या सुमारास सातपुड्याची शोभा खरोखरच अवर्णनीय असते. मीं कित्येकदां तें सौंदर्य पाहिलें आहे. पुष्कळदां मला वाटतं, ' महाबळेश्वराकडे न झुकतां एखादा साहेब जर पूर्वीं सातपुड्याच्या शिखरांकडे येऊं शकला असता, तर सातपुड्यांतील पाल, शिरेल, पन्हाळा वगैरे ठिकाणांना कदाचित् माथेरान-महाबळेश्वराइतकें महत्त्व आलें असतें.

त्या वर्षीं तर खूपच पाऊस झाला होता. त्यामुळे सातपुड्याचीं शिखरें अतुल वैभवाने मिरवीत होतीं. नद्या-नाले खळाळून वाहात होते. वृक्षा-वृक्षावर चैतन्य नांदत होतें. लता-वेली नव्या नवरीच्या साजाने अन् लाजेने वृक्षराजांना कवळीत होत्या. उन्हाळ्यांत शुष्क, निर्जीव वाटणारे डोंगर जीवनाने रसरसून हसत-बोलत होते. किती वेळ आम्ही मुग्ध होऊन डोंगर माथ्यावरून भोंवतालची शोभा पाहात होतों. नंतर आम्ही पलीकडच्या दरींत उतरलों.

साऱ्यांनाच दमल्यासारखें वाटत होतें. दरींत खळाळून वाहणारा एक ओहोळ दिसला. स्वच्छ स्फटिकासारखें पाणी दिसतांच तें पिण्याकरतां मुलें धावलीं. तोंच आमच्याबरोबर असलेल्या गणसा ( गणेश ) पाटलांनी त्यांना हटकलें. कठोऱ्याहून गणसा पाटील आमच्याबरोबर आले होते. आम्हांलाहि बरोबर कोणीतरी माहितगार हवाच होता.

" बचनागाचीं झाडें आहेत काय वरच्या बाजूला ? " कोणींतरी विचारलें.

" खूप आहेत. अहो, डोंगरच हा. त्यांत सर्व प्रकारचीं झाडें उगवायचीं. अमृताप्रमाणें गोड फळें असलेलीं झाडें येथे आढळतील, तर गवळणीसारखीं अत्यंत सुंदर दिसणारीं भयंकर विषारी फळें येणारीं झाडेंहि दिसतील. साऱ्या वनस्पतींचें हें मायपोट. चांगलें-वाईट येथे सारें कांही आहे बरें ! "

" पण कांहो, तो माणूस पाहा. तो तर या ओहोळाचेंच पाणी पीत आहे ! "

" अरे बाळ, आम्ही खेडवळ माणसें वाटेल तें पचवूं शकतों. बचनागाचं पाणीच काय प्रत्यक्ष बचनागहि आम्ही पचनीं पाडतों. तुम्ही शहरांतील नाजूक लोक. ती सूचना तुमच्याकरतां. तुम्ही परत गेल्यावर आजारी पडलांत,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम .............. वि: चरि
क्रमांक ....२०४१.... नों: दि: ......

तर खापर फुटेल आमच्या डोक्यावर ! आम्ही खेडवळ माणसें दगड-गोटे पचविण्याइतके पक्के असतों ! ”

आम्ही सहल आटोपून परत आलों. पण सबंध रस्ताभरच नव्हे तर परत आल्यावरहि तो ‘ खेडवळ ’ माणूस सारखा माझ्या डोळ्यांसमोर उभा असलेला मला दिसत होता.

तो पहिल्याने मजकडे आला तेव्हाचा प्रसंग मला आठवला. एके दिवशीं सुमारे दहा वाजतां गणसा पाटील व एक गृहस्थ माझ्याकडे आले होते. येतांबरोबर त्यांनी विचारलें होतें,

“ काय सर, ओळखलें का ? ”

“ वा ! हां काय प्रश्न आहे ? ओळखणार नाही असें कधी होईल का गणसाकाका ? ”

“ अरे बेटा, शहरांतील लोक चटकन् ओळख विसरतात, म्हणून विचारलें. माझी खात्री होती म्हणा, सर गावची ओळख कधी विसरणार नाहीत. अंगाखांद्यावर खेळला आहेस माझ्या. कशी ओळख विसरशील ? म्हणून तर येथे आलों. माझी पुतणी इथेच आहे. भाचाहि आहे. पण तिकडे कोठे न जातां मुद्दाम तुझ्याकडे आलों. ”

त्या माणसाच्या अंगाखांद्यावर खेळल्याचें मला कांही आठवत नव्हतें. कदाचित् त्या वेळीं मी फार लहान असेन. पण एवढ्या अगत्याने आलेला गावचा माणूस पुतणी-भाच्याकडे न जातां आपल्याकडे आलेला. मी मोठ्यानेच घरांत सांगितलें होतें,

“ अहो, चहा करा बरें दोन-तीन कप. ”

“ आता चहा कशाला ? जेवायची वेळ आहे. पण होऊं द्या चहा. स्वयंपाकाला नाहीतरी वेळ लागणारच आहे; त्यापूर्वी चहाला हरकत नाही. चहाला कधी नाही म्हणायचें नसतेंच म्हणा. काय महाजन ? ” त्यांनी बरोबर आलेल्या गृहस्थाला विचारलें होतें.

महाजनांकडून उत्तराची अपेक्षा नव्हतीच.

नंतर गणसा पाटील स्वयंपाक खोलींत गेले होते.

“ काय बेटी, कणीक भिजवलीस का ? जरा जास्तच घे बरें. तुम्ही शहरांतलीं माणसें फार नाजूक. तुमचें खाणें मुंगीचें. आमचें हत्तीचें !

अर्धें जेवण होत नाहीं तोंच भांडीं खडखडूं लागतात. अन् मग तुम्हांला लाजेनें अर्धमेलें होतें. म्हणून तुला अगोदरच सुचवून ठेवावें म्हटलें. मुलीला का लाजवायचें असतें? परक्याला का सांगायचें आहे? घरच्यासारखेंच आहे सारें. काय सर, मी म्हणतों तें खरें आहे ना?"

"अहो, घरच समजायचें हें आपलें. तुम्ही का परके आहांत?"

"समजायचें कशाला? आहेच की माझें घर हें! तूं परका नाहीस की ही पोर परकी नाही. आमच्या गल्लींतच तिचें माहेर. म्हणून तर येथे आलों."

"पण आज आलां आहांत कोणीकडे तुम्ही गणसाकाका? नुसतें घर पाहायला कांही तुम्ही येणार नाही."

"अरे बाबा, विनाकारण कोण कशाला येतो? महाजनांचें कोर्टांत काम होतें थोडेंसें. ते म्हणाले 'चला.' म्हणून आलों. खाणावळींत जेवायला कांही आपल्याला आवडत नाही. अन् मिठाई कितीहि खाल्ली तरी पोट भरत नाहीं. म्हणून यांना म्हटलें, 'आपले सर आहेत. तेथेच जाऊं. घरचें जेवण पोटभर मिळेल!'"

स्वयंपाक झाल्यावर आमचीं जेवणें झालीं होतीं.

मनुष्य बोलायला जसा जबर, तसाच जेवायलाहि जबर होता. असा जेवणारा मीं तरी तोंपर्यंत पाहिला नव्हता. गृहस्थाला संकोच-भीड कांहीच माहीत नव्हती. बायकोची फजिती झाली नव्हती; पण तिला अक्षरशः भांडीं पालथींच घालावीं लागलीं होतीं. मनांत येऊं नये तरीहि मनांत येऊन गेलें—वाळवंटांत उंट पाणी भरून घेतात त्याप्रमाणेच...

नंतरहि दोनतीनदा ते आमच्याकडे आले होते.

प्रत्येक वेळेस अशीच तऱ्हा होती. एखादा दुसरा माणूस नेहमीच बरोबर असायचा. बहुधा त्याच माणसाचें कांहीतरी काम असायचें! त्यांनी कधी वेळ-अवेळ पाहिली नव्हती की आमच्या अडीअडचणींचा विचार केला नव्हता. जें पाहिजे, जसें पाहिजे तसें त्यांनी घरांतून करवून घेतलें होतें.

अन् प्रत्येक वेळीं परत जातांना ते म्हणाले होते, "सर, आम्ही तुमच्याकडे येतों, पण तुम्ही कांही गांवी येत नाही. किती वर्षांत तुम्ही

कठोऱ्याला आलां नाहीं ! या ना एकदां तरी. गरिबाच्या घरच्या मीठ-भाकरीची एकदा चव घ्या !"

मीं गावाला जाणें टाकलें होतें. मला तिथे जाणें रुचत नसे. परिस्थितीमुळे त्या गावाविषयींची माझ्या मनाची ओढ मी मनांतच दडपून टाकीत होतों. गणसा पाटलांनाच नव्हे तर गांवच्या पुष्कळ लोकांना हें माहीत होतें. तरी त्यांचा आग्रह मात्र चालूच असे.

पण त्या वेळीं अकस्मात् कठोऱ्याला जावें लागलें होतें. त्या गावचे दोन विद्यार्थी आमच्या शाळेंत होते. त्यांनी सातपुड्यांतील त्या वर्षीच्या वनश्रीची खूप स्तुति केली होती. कोठेतरी सहलीला जायचें तर तिकडेच चला असा आग्रह केला होता. दोनतीन शिक्षक तयार झाल्यामुळे मनांत नव्हतें तरी मला त्यांच्याबरोबर जाणें भाग पडलें होतें. पंधरा-वीस विद्यार्थ्यांसह आम्ही संध्याकाळीं कठोऱ्याला गेलों होतों. तेथील मराठी शाळेच्या हेडमास्तरांनी रात्रीं शाळेच्या इमारतींत आमची सर्वांची तात्पुरती उतरण्याची सोय केली होती.

गावांत जातांबरोबर मीं गणसा पाटलांना निरोप पाठविला होता. ते आले त्या वेळीं आमचें सारें आटोपलें होतें.

" सर, फार आनंद झाला तुम्ही आल्यामुळें ! किती दिवस तुम्हांला सांगत होतों, विनवीत होतों गावाला या म्हणून. आज तो भाग्याचा दिवस आला. "

" सातपुड्यांत सहलीला जायचें आहे आम्हांला. या पोरांचा आग्रह होता. ठरवलें या गावावरून जायचें. तुम्हीहि एकदां या म्हणतच होतां. "

" अहो, मी एकदा या म्हणत नव्हतों. एकदा तरी या म्हणत होतों. या सहलीमुळे तरी तुम्ही आलां आंपल्या गावीं ! नाहीतर तुम्ही वळूनहि पाहात नव्हतां !"

" आलों ना पण शेवटीं ! कशाकरतां कां होईना आलों हें तर खरें ? "

" अहो, किती आनंद झाला मला ! कसें सांगूं तुम्हांला ? जाऊं द्या. सारी व्यवस्था झाली ना ? कांही अंथरुण-पांघरुण हवें का ? गुरुजी आपल्या सोसायटींतील सत्रंजी व गाद्या आणायच्या होत्या. "

" सारी सोय केली गुरुजींनी ! "

वास्तविक तुम्हीं माझ्याकडेच यायला पाहिजे होतें. सोसायटीच्या इमारतींतहि सर्वांची सोय झाली असती; पण मास्तरहि कांही परके नाहींत. आमचें गाव म्हणजे खरोखर एक मोठें कुटुंब आहे. तुमच्या शहरासारखें नाही येथे ! एकाचें तोंड पूर्वेकडे तर त्याच्या शेजाऱ्याचें तोंड पश्चिमेकडे. येथे सारे जणू एका घरचे ! परकेपणा, भेदभाव आम्ही ओळखत नाही. खरें ना गुरुजी ? ”

गुरुजींना होय म्हणण्याशिवाय गत्यंतर नव्हतें.

दुसऱ्या दिवशीं सकाळींच आम्ही निघालों होतों. घरचें काम टाकून गणसा पाटील आमच्याबरोबर आले होते.

सहल मजेंत झाली होती.

संध्याकाळीं आम्ही कठोऱ्याला परत आलों होतों.

तेथे आल्यावर जरा वेळानें गणसा पाटलांनी आमच्या दोन विद्यार्थ्यांना छेडलें होतें.

“ काय रे, गुरुजींना कांहीं चहा बिहा देणार की नाही ? कधी नवत तुमच्याकडे आले अन्....”

मुलांचा तर सारखा आग्रह होता. शेवटीं आम्ही त्यांच्याकडे गेलों होतों. जातांबरोबर भाऊकाकांना—त्या मुलांपैकी ज्याच्या घरीं आम्ही गेलों होतों त्याच्या वडिलांना गणसा पाटील म्हणाले होते, “ भाऊकाका, पाहुण्यांना तुमच्याकडे चहाला आणलें आहे. त्यांना सांगितलें, आमच्याकडे तुमच्यासारखा चहा मिळणें कठीण ! फक्त भाऊकाकांकडे तुम्हांला चांगला चहा मिळेल. असा चहा साऱ्या गावांत कोठेच होत नाही. सकाळी घेतला तरी दुपारपर्यंत जिभेवरची चव जात नाही. चहा घ्यावा तर भाऊकाकांकडेच. ते नाही म्हणत होते, थकून आलों म्हणत होते; पण आणलें शेवटीं ! माझ्याकडेच मी नेणार होतों; पण आमच्याकडचा चहा म्हणजे नुसती गुळवणी ! तुमच्याकडच्या चहाची का त्याला सर येणार आहे ? आम्हां खेडवळांकडे त्यांना हवा तसा चहा कोठला ? ”

भाऊकाकांनी आमचें मनःपूर्वक स्वागत केलें होतें. नुसता चहाच नव्हे तर त्याबरोबर खाणेंहि तेथेच झालें होतें ! नंतर दुसऱ्या दिवशीं आम्ही

परत आलों होतों. गणसा पाटलांच्या घरीं जाण्याचा कांही मला योग आला नव्हता.

परत आल्यावरहि तो ' खेडवळ ' माझ्या मनासमोर सारखा कां उभा होता याची आतां तुम्हांला कल्पना येईल.

त्यानंतर मात्र ते माझ्याकडे अजूनहि आले नाहीत. तरीहि घरीं कोणीहि पाहुणा आला की बायकोला हटकून त्यांची आठवण येते.

नंतर बऱ्याच वर्षांनी मी कठोऱ्याला गेलों होतों. सकाळीं मारुतीच्या पारावर गणसाकाका व गावांतील पांच-चार लोक बोलत बसलेले मला आढळले. मी दिसतांच गणसाकाकांनी मला हाक मारली.

" हें पाहा सर, तुम्हीच थोडासा आमचा निवाडा करा. बाब कांही तशी महत्त्वाची नाही. पण तुमच्यासारखा तिऱ्हाईत निकाल द्यायला चांगला."

मी आश्चर्यानें त्यांच्या तोंडाकडे पाहातच राहिलों. कोणती बाब, कसला निवाडा द्यायचा ? मला कांहीच कळेना.

" हें पाहा, आपल्या पंचायतीची कांही रक्कम माझ्याकडे आहे. मी ती केव्हाहि द्यायला तयार आहें. यांना मीं सांगितलें, ' मध्यरात्रीं रक्कम घेऊन चला. पैन् पै मोजून देतों. फक्त माझी एक अट आहे. ' "

" कसली अट ? " भाग घ्यायची इच्छा नसूनहि मी नकळत त्यांच्या वादांत शिरलों.

" अट कांही तशी महत्त्वाची नाही. माझें यांना एवढेंच सांगणें आहे, " बाबांनो, माझ्याकडची रक्कम केव्हाहि घेऊन चला. पेटींत आहे असें समजा. पण अगोदर पूर्वीच्या रकमा कांही लोकांकडे आहेत त्यांच्याकडून त्या काढा. त्या मिळाल्याशिवाय कांही आपण देणार नाही ! या सबबीनें तरी त्या निघतील ! मजजवळची रक्कम जाते कुठे ? पंचायतीची रक्कम. न देणाराचें कधी बरें होईल का ? सांगा तुम्हीच सर, मी म्हणतों त्यांत कांहीं गैर आहे का ? "

मी कांहीच उत्तर देऊं शकलों नाही.

खरें सांगायचें तर त्यांत गैर कांहीच नव्हतें. पण घातलेली अट कधीहि पुरी होणें शक्य नव्हतें हें सर्वांना माहीत होतें. पूर्वीच्या रकमा वसूल होणें

अशक्य होतें. अर्थातच गणसा पाटलांकडील रक्कमहि निघणें कठीण होतें. तें सुसरीने गिळलेलें माणिक होतें !

पण त्या माणसाची खरी कल्पना अजून मला यायची होती. ती आली तेव्हा मी अगदीं थिजून गेलों. माझ्या भावनेची जगांत अगदीं उलथा-पालथ झाली.

महादू कोल्हे मोठा धूर्त माणूस होता. त्याची उभी हयात मुलकी खात्यांत नौकरी करण्यांत गेली होती. पै-पैचा हिशेब करण्याची त्याला संवयच झालेली होती. अतिशय व्यवहारी माणूस म्हणून त्याची ख्याति होती. त्या माणसाने म्हणे गणसा पाटलांना एक हजार रुपये दिले होते. ती रक्कम वेळेवर परत न मिळाल्यामुळे त्याने गणसा पाटलावर फिर्याद केली होती.

महादूभाऊ गणसा पाटलाचे सख्खे मावसभाऊ होते. दोघांचीहि स्थिति चांगली होती. दोघांचें एकमेकांकडे जाणेंयेणेंहि बरेंच होतें. महादू कोल्हे जळगावला राहात होते. गणसा पाटील जळगावला गेले की त्यांच्याकडेच जात असत. अशा स्थितींत ही फिर्यादीची काय भानगड आहे हें आम्हांला समजेना. महादूभाऊ माझेहि नातलग होते. एकंदर हकीकत कळल्यावर कुतूहल मला स्वस्थ बसूं देत नव्हतें. तरीपण त्यांची भेट होईपर्यंत गप्प बसणें भाग होतें.

आणि एके दिवशीं गणसा पाटलांची व माझी अकस्मात् स्टेशनवर गांठ पडली. कोर्टाची तारीख असल्यामुळे जळगांवला जात होते. मीहि कांहीं कामाकरितां जळगावलाच निघालों होतों.

त्यांनीच प्रथम विषय काढला

" काय सर, जळगावलाच निघालांत ना ? आमच्या नशिबीं जळगावला फेऱ्या करणें लिहिलें आहेसें दिसतें ! "

" काय झालें गणसाकाका ? "

" अहो, महादूभाऊने हजार रुपयांची फिर्याद केली आहे ना माझ्यावर ? काय म्हणावें या माणसाला, कांहीं कळत नाही ! "

" फिर्याद कां केली त्यांनी ? "

" मी तरी तेंच म्हणतों ना ! मीं त्याचे पैसे द्यायला कधी नाही म्हटलें होते ? त्याचे पैसे मला द्यायचेच होते. पै न् पै मी देणार होतों; पण त्याला धीर कोठे होता ? शहरांत राहणारा तो, त्याला वाटलें या खेडवळ माणसाला फिरवावें घाण्याच्या बैलासारखें जरा. फिरतों आहे आता असा. काय करतों बिचारा ! "

मीं त्या बिचाऱ्याकडे जरा न्याहाळून पाहिलें. खरेंच, मनुष्य पैसे द्यायला तयार असतां असा उतावळेपणा करायची कांही जरूर होती ? नाहीतरी महादू कोल्हा होताच तसा. पैसा म्हणजे परब्रह्म होतं त्याला. तरीहि आपसांत असें त्यांनी कां करावें पैसा मिळणार असतां तें मला कळेना.

" खरें सांगायचें सर, तर त्या माणसाने माझ्यावर पैसे देऊन मोठे उपकार केले आहेत. ऐन अडचणीच्या वेळीं त्यानें माझी गरज भागविली आहे. मीं हे उपकार कधीं विसरणार नाही. त्याला मीं तसें स्पष्ट सांगितलें. अनेकदां सांगितलें. तूं कांही काळजी करूं नकोस, मी पैसे घेऊन तुझ्या घरीं येईन. व्याजांतसुद्धा पैची सूट मागणार नाही. पण माणसाने विश्वास ठेवूं नये म्हणजे काय ? सख्ख्या भावापेक्षा मी त्याला जास्त मानतों अन् तो माझ्यावर कवडीचा विश्वास ठेवायला तयार नाही. कसें वाईट वाटणार नाही माणसांना. "

" मी सांगू काय त्यांना ? "

" कांही उपयोग व्हायचा नाही. तुम्हांला कल्पना नसेल त्या माणसाची. तो कोणाचें ऐकायचा नाही. पैसा हा देव आहे त्याचा; पण मी म्हणतों, कोणत्याहि गोष्टीला मर्यादा हवी. याला खरोखर पैशाची गरज नाही. कोण चाटणार आहे पैसा कुणाला ठाऊक ? ना मूल ना बाळ; पण कवडी-कवडी-करतां जीव देतो अगदी ! आम्हांला का पैसा नको ? कोण पैशाकरितां धडपडत नाही ? पण याचें सारेंच मुलखावेगळें आहे. "

महादूभाऊंच्या चिक्कूपणाची मला कल्पना होती; पण इतकें कांही मला वाटत नव्हतें.

" तुम्हांला सांगितलं तर नवल वाटेल, सर ! पण मीं पैसे घेतल्यानंतर दोन दिवसांनी प्रॉ. नोट करून नेऊन दिली या माणसाला. तरी या माणसाने एकदम कोर्टाचा रस्ता धरला. त्याला वाटत असेल आपण

शहरांतले, हुशार ! हा गणसा खेडवळ ! घुमवूं याला. पण आता मींहि ठरवलें आहे; ' दाखवतों या खेडवळाचा हिसका त्याला. आम्ही कांही कच्चे नाही की कच्च्या गुरूचे चेले नाही. आम्हीहि तसे पक्के आहोंत ! "

तशी माझी खात्री होऊं लागली होती.

तरी पण त्या माणसाच्या बोलण्यावरून मला कांही नीटसा बोध झाला नाही. कुठेतरी, कांही तरी गैरसमज असावा असें मला वाटलें ! तेवढ्यांत जळगाव आलें आम्ही आपापल्या मार्गाला लागलों.

असेच कांही दिवस गेले. एके दिवशीं आप्पासाहेब पाटील वकील अचानक मला भेटले. बोलत बोलत आम्ही त्यांच्या घरीं गेलों. ते गणसा पाटलांचे वकील होते. आप्पा अतिशय हुशार वकील होते; मनाला पटेल तोच खटला ते घेत असत. पैशांची त्यांना पर्वा नव्हती. खोटी बाजू ते सहसा लढवीत नसत. त्यांनी मला सांगितलें,

" महादू कोल्हे तुमचे नातलग आहेत ना ? त्यांना म्हणावें, ही फिर्याद काढून घ्या. मुद्दाम त्यांच्याकडे जाऊन सांगा एवढें. "

" कां बरें आप्पा असें ? "

" मोठें चमत्कारिक स्वरूप आलें आहे केसला ! "

" चमत्कारिक स्वरूप येण्यासारखें केसमध्ये काय आहे त्यांत ? साधीं देण्याघेण्याची फिर्याद ! "

" मलाहि प्रथम तसेंच वाटलें. पण गणसा पाटील म्हणतात, ही प्रॉ. नोट खोटी आहे. तिच्यावरची सही त्यांची नाही. "

मी एकदम चमकलों. मी हें भलतंच ऐकत होतों.

" मला कळलें नाही तुम्ही काय म्हणतां तें. "

" नोटेवरची सही गणसा पाटलांची नाही. साक्षीदार तर गणसा पाटलांना ओळखतहि नाहींत. आम्हीं हस्ताक्षरतज्ज्ञाकडून सही तपासून घेतली. गणसा पाटलांच्या अनेक सह्यांशीं तुलना करून त्याने निर्णय दिला, की ही सही गणसा पाटलांच्या सहीशीं जुळत नाही. प्रॉ. नोट गणसा पाटलांच्या हस्ताक्षरांत आहे. पैसे मिळावे म्हणून त्यांनी ती लिहून नेली होती; पण पैसे न मिळाल्यामुळे त्यांनी ती तशीच टाकली महादूभाऊकडे, व ते वैतागाने निघून गेले. महादूभाऊने त्या नोटचा तिकीट लावून सही

करवून उपयोग केला. खोटी सही केल्याचा गुन्हा — भयंकर गुन्हा — महादूभाऊकडून घडला आहे. साक्षीदार आमच्यासमक्ष सही झाली नाही असेंच सांगणारे आहेत."

मी चकित झालों महादूभाऊंना मी ओळखत होतों. पैशाकरितां अशी गोष्ट ते करतील असें कांही मनाला पटेना. मी आश्चर्याने आप्पांच्या-कडे पाहातच राहिलों.

"केस पुढे चालली तर काय होईल तें सांगतां येत नाही !"

"मग काय करूं मी असें म्हणतां तुम्ही ?"

"फिर्याद काढून घ्यायला सांगा. भलतेंच कांहीं व्हावें हें मला रुचत नाही व पटतहि नाही."

"पण आप्पा, त्या माणसाने पैसे घेतल्याचें मजजवळ कबूल केलें होतें."

"मजजवळहि कबूल केलें आहे. म्हणूनच मी तुम्हांला हें सांगतों आहें. तो म्हणतो पैसे मला मिळाले आहेत; पण ही सही माझी नाही. मीं त्याला सांगितलं, 'पैसे द्यायचे आहेत ना ?' तर तो 'हो' म्हणतो. पण लागलीच म्हणतो, महादू माझं न ऐकतां कोर्टांत गेला आहे त्याअर्थी कोर्टांत जें होईल तें होऊं द्या. मला पैसे द्यायचे आहेत. मी ते देईनच ! कधी ठेवणार नाही; पण त्याचा कोर्टाशीं कांहीं संबंध नाही. कागदपत्रा-प्रमाणे कोर्टांत जें व्हायचें तें होईल. माझाहि नाइलाज झाला. अगोदर मला कल्पना असती तर मीं अशी केस घेतली नसती. आता असाच मार्ग काढल्याशिवाय इलाज नाही."

"तो पैसे द्यायला तयार आहे म्हणतां ? पण तो देईल का पैसे ?"

"मला वाटतें, देणाऱ्या माणसाने या स्थितीला साऱ्या गोष्टी कधी येऊं दिल्या नसत्या. तो माणूस 'पक्का' दिसतो. केस काढूनच घेतली पाहिजे. मला केस चालवतां येईल; पण मला तें रुचत नाही. यांत काय तें समजा !"

मी महादूभाऊंकडे गेलों. त्यांना सारें सांगितलें.

म्हाताऱ्याच्या अंगाचा तिळपापड झाला. डोळ्यांत अंगार फुलला. संतापाने तो बेभान झाला. किती वेळ त्याच्या तोंडून शब्दहि फुटला नाही.

बऱ्याच वेळाने त्याला मन आवरणें शक्य झालें.

" खरें काय आहे मला सांगा बरें सर्व ! "

" सर, तुम्हांला पहिल्यापासून सारें सांगतों. सुमारें सात वर्षांपूर्वी हा माणूस एके दिवशीं रात्रीं दहा वाजतां माझ्याकडे आला. माझ्या पायां पडला. सोसायटीच्या पैशाची याने अफरातफर केली होती. दोन दिवसांत याला दोन हजार रुपये भरायचे होते. नाहीतर याच्या हातांत हातकड्या पडणार होत्या. काकुळतीने त्याने विनवणी केली. ' माझ्या मुलाबाळांकडे पाहा, कच्च्याबच्च्यांचा दुवा घ्या ' म्हणून माझ्यापुढे लोटांगण घातलें. मला वाईट वाटलें, खूप दुःख झालें. कोणालाहि पैसा देणें माझ्या जिवावर येतें ! पण त्या दिवशीं माझें मन विरघळलें. मीं चटकन् दोन हजारांचा चेक फाडून याच्या हातावर ठेवला.

" दोन-तीन दिवसांनी तो माझ्याकडे पुन्हा आला. त्यानें एक प्रॉ. नोट करून आणली होती दोन हजारांची. मोठ्या काकुळतीने तो म्हणाला, ' भाऊ, केवढी अब्रू वाचविली तुम्ही माझी ! सख्खा भाऊहि असें करणार नाही. ही नोट असू द्या तुमच्याजवळ. पैसे परत केले म्हणजे नेईन मी ती ! ' मी त्यांच्याजवळची नोट घेतली. "

" कुठे आहे ती नोट ? "

" तीन वर्षें संपायच्या सुमाराला तो एक हजार रुपये घेऊन आला. मला म्हणाला, ' भाऊ हे हजार रुपये घ्या. अन ही राहिलेल्या हजार रुपयांची प्रॉ. नोट. हिच्यावर साक्षीदारांच्या सह्या नाहींत, त्या तुम्ही कोणाच्या तरी करून घ्या. ती पूर्वीची दोन हजारांची प्रॉ. नोट मला परत द्या. ' मीं त्याला ती प्रॉ. नोट परत दिली. "

" तुम्हीं त्याच प्रॉ. नोटवर हजार रुपयांचा भरणा कां लावून घेतला नाही ? "

" तेवढी जरूर वाटली नाही मला. असें कांही हा मनुष्य करील अशी चुकूनहि कल्पना शिवली नाही माझ्या मनाला. मी न म्हणतां त्याने पहिली प्रॉ. नोट करून मला आणून दिली होती. "

" अहो, तुम्हीं चेक दिल्यामुळे त्याला गत्यंतर नव्हतें. प्रॉ. नोट आणून दिली यांत विशेष कांही नव्हतें ! "

" माझ्या कांहीच लक्षांत आलें नाही. मी येथल्याच दोन माणसांच्या सह्या त्या प्रॉ. नोटवर नंतर करून घेतल्या."

" मग त्याचें साक्षीदारांबद्दलचें म्हणणें खरें होतें तर ! "

" पुढे तीन वर्षांत पैसे परत देण्याची गोष्ट त्याने कधीं काढली नाही. मी त्याला मधून मधून सुचवीत होतों. प्रत्येक वेळीं तो म्हणायचा, 'भाऊ, बिलकूल चिंता करूं नका. हात मोकळा झाला की आणून देतों सारी रक्कम. तुम्हीं कोणत्या परिस्थितींत रक्कम दिली तें मी कधीच विसरूं शकणार नाही. तुम्ही निश्चिंत रहा.' शेवटीं प्रॉ. नोट मुदतींतून जाईल असें वाटलें तेव्हा मी कठोऱ्याला गेलों. त्याला पैसे मागितले. निदान दुसरी प्रॉ. नोट करून दे म्हणून सांगितलें. त्यावर तो म्हणाला, 'तुम्ही पुढे चला. चार-आठ दिवसांत मी पैसे घेऊनच येतों.' मी परत आलों."

" मग आला का तो पुन्हा ? "

" मीं वाट पाहिली. खूप वाट पाहिली. शेवटीं मुदतीचे दोनच दिवस बाकी राहिले. मी पुन्हा कठोऱ्याला गेलों. तो गृहस्थ घरींच नव्हता. कोठेतरी गावाला गेलेला होता. मी निराशेने परत आलों. अगदीं शेवटच्या दिवशीं नाइलाजाने मीं फिर्याद केली. नाहीतर ती प्रॉ. नोट मुदतींतून गेली असती."

" आता एकच सांगा. त्याने ही प्रॉ. नोट आणून दिली तेव्हा तुमच्या समक्ष तिच्यावर सही केली का ? "

" त्याने सही करूनच ती प्रॉ. नोट आणली होती."

" आता कळलें सारें. तुम्ही कोर्टांत चला अन् फिर्याद काढून घ्या ! "

" काय म्हणून ? "

" प्रॉ. नोटवरची सही त्याची नाही म्हणून ! "

त्यांच्याहि डोक्यांत प्रकाश पडला.

त्याने प्रॉ. नोट आणून दिली, तेव्हाच तिचे पैसे द्यायचे नाहींत हें निश्चित ठरविलें असावें. म्हणूनच तिची फिर्याद व्हावी असें तो वागला होता.

महादूभाऊंनीं फिर्याद काढून घेतली. त्यांना ती काढून घेणें भाग पडलें. त्यांच्या हृदयाचा तळतळाट, जळफळाट होत होता, पण परिस्थितीपुढे त्यांचा इलाज चालला नाहीं.

कांहीं लिहून द्यायचें गणसा पाटलांनीं नाकारलें हें सांगायला नकोच.

नंतर सुमारें दोन महिन्यांनी गणसा पाटलांची व माझी गांठ पडली. मी कठोऱ्याला गेलों होतों. नेहमीप्रमाणे ते मारुतीच्या पारावर दोन-तीन जणांबरोबर गप्पा मारीत होते.

" या सर, केव्हा आलांत ? " मला पाहतांच त्यांनी विचारलं.

" काल संध्याकाळीं आलों. " मला जास्त बोलावेंसें वाटलें नाही.

" चला, घरीं जाऊं या चहाला. तुम्ही कांही अजून आमच्या घरीं आलां नाही. बऱ्याच वेळां आता तुम्ही येथे येतां; पण आमच्याकडे कधी येत नाही. गरिबाकडे पायधूळ झडूं द्या ना एकदा केव्हातरी ! "

" पण गणसाकाका, येथले सारे लोक म्हणजे एक कुटुंबच असें सांगितलें होतें ना तुम्हीं ? कोठेहि गेलें तरी चालेल. अमक्याकडेच जायचें असें कांही नाही ! "

" अरे बाबा, अशा कांही गोष्टी निव्वळ बोलायच्या असतात. मीं काय सांगितलें अन् काय नाही त्याला कांही महत्त्व नाही. व्यवहार पाहिला पाहिजे माणसाने ! आता हेंच पाहा ना. मी किती सांगत होतों महादूभाऊला फिर्याद करूं नका म्हणून ! ऐकलें का त्याने ? त्याने व्यवहार पाहिला. कायद्याचा आश्रय घेतला. मलाहि तेंच करावें लागलें. जें व्हायचें तें होऊंद्या, असें मींहि म्हटलें ! अन् त्यानंतरहि जें झालें त्याला कांही महत्त्व आहे का ? मी अजूनहि सर्वांना सांगतों, ' कोर्टांत कांहीहि ठरलें तरी मला महादूभाऊचें देणें आहे हें कांही खोटें नाही. मी तें देणार आहेंच. पै न् पै देणार आहें. व्याजासुद्धां देणार आहे. न दिलें तर पुढें त्याच्या दारीं बैल होऊन मला तें फेडावें लागेल हें काय मला कळत नाही ? पूर्वी सांगत होतों तेंच आताहि सांगतों. हातांत रक्कम आली की पहिल्याने मी महादूभाऊच्या घरीं जाईन. त्याला हात जोडीन, माफ कर म्हणेन. पै ठेवणार नाही त्याची ! "

सारें खरें होतें. फक्त प्रश्न होता तो त्यांच्या हातांत रक्कम येण्याचा.

" मग तुम्हीं त्यांना लिहून कां दिलें नाही तसें ? "

" काय विचारतोस बाबा मला खेडवळ पाहून ? अरे, लिहून देण्याचा

कसा फजा होतो तें पाहिलेंस ना तूं? लिहिण्याला असतें का कांही महत्त्व? माणसाच्या शब्दाला किंमत असते. शब्द दिला म्हणजे दिला.’’

मीं त्या आधुनिक हरिश्चंद्राकडे नवलाईने पाहिलें.

“ आता हेंच पाहा ना तूं! हे सारे लोक मला म्हणताहेत, खोटी प्रॉ. नोट केल्याबद्दल करा केस आता तुम्ही महादूभाऊवर? पळतां भुई थोडी होईल त्याला! उलट येईल तो दाराशीं फेऱ्या मारायला, पाय धरायला. पण आपल्याला पटत नाही तें! त्याने उपकार केले आहेत आपल्यावर! आपली हातकडी चुकवली आहे; त्याच्यावर हातकडीचा प्रसंग आपण आणायचा का? जन्मांत आपल्याकडून असें वंगाळ काम होणार नाही! तुम्हीच सांगा, गणसा पाटील असा हलकटपणा कधी करील का?’ यांना तेंच मी नेहमीं सांगतों, ‘नाहीं बाबांनो, जनाची नसली तरी मनाची कांहीतरी आहे मला अजून.’ खूप आग्रह करतात हे लोक पण आपण त्यांना अगदीं धुडकावून लावतों. खोटें असलें तर विचार यांना!”

काय विचारणार मी कपाळ? त्या पक्क्या माणसापुढे मला काय बोलतां येणार होतें?

“ अरे, यांचेंच काय घेऊन बसलास? मला तीन-चार वकिलांनीहि आग्रह केला. ‘नुसती फिर्याद करतों म्हणून म्हण! पांच हजार रुपये मिळतील तुला महादूकडून! त्यांतून त्याचे एक हजार देऊन टाक! व्यवहार व्यवहारासारखा होऊं दे. पण मीं सांगितलें, ‘पांच काय, पंचवीस हजार रुपये मिळाले तरी असें कांही मी करणार नाही. माझा मुलगा तर फिर्याद करायलाहि निघाला होता. म्हणे, आपली त्याने बेअब्रू केली. आपण कशाला त्याच्या अब्रूचा विचार करायचा? पण मीं त्याला साफ सांगितलें, ‘अरे बाबा, एखाद्याने गाय मारली म्हणून आपण वासरूं का मारायचें?’ त्याने माझ्यावर उपकार केले आहेत. मी विसरणार नाही ते कधी! मग प्रत्यक्ष मुलाशीं वाईटपणा आला तरी चालेल!”

मला असह्य झालें तें सारें ऐकणें!

मी तसाच उठून परत आलों.

खानदेशच्या सुपीक जमिनींत नाना प्रकारच्या वृक्षलता उगवतात, वाढतात. आमच्या सुखांत त्यामुळे केवढी भर पडते ? पण तिच्यांत कोठे बचनागाचीं विषारी झाडेंहि फोफावलेलीं आढळतात. नशीब आमचें की तीं झाडें फार थोडीं असतात !

किती दिवस तरी हेच विचार माझ्या डोक्यांत घोळत होते, थैमान घालीत होते.

★

८

# उघड्या पाटील

शाळेंत कसला तरी समारंभ होता. मी किनगावच्या शाळेंत नुकताच आलों होतों. माझी कोणाशीच फारशी ओळख नव्हती.

समारंभाकरतां गावांतील कांही सद्गृहस्थांना आमंत्रण दिलेलें होतें. ते यायला लागले तसे हेडमास्तर त्यांना व्यासपीठावरील खुर्च्यांवर नेऊन बसवूं लागले. एक शिक्षक मला त्यांच्याबद्दल माहिती सांगत होते.

थोड्याच वेळांत एक म्हातारे गृहस्थ आले. तोकडें धोतर, अंगावर फक्त लहानसें उपरणें व जुनी पगडी. हेडमास्तरांनी त्यांना व्यासपीठावर नेऊन बसविलेलें पाहून मला नवल वाटलें. आलेल्या लोकांत ते गृहस्थ अगदी उठून दिसत होते. बहुतेकांनी आपल्या जवळचे चांगल्यांतले चांगले कपडे घातले होते. आपण व्यवस्थित दिसावें हा सर्वांचा प्रयत्न चाललेला आढळून येत होता. यांचें मात्र कशाकडेच लक्ष नव्हतें.

मीं त्या शिक्षकाकडे उत्सुकतेनें पाहिलें. माझा हेतु त्यांना कळला.

" ते उघड्या पाटील. "

" पण यांचें नांव काय ? "

" नांव...नांव मलाहि माहीत नाही. सर्व लोक त्यांना त्याच नांवाने ओळखतात. नेहमी त्यांचा असाच पेहराव असतो. "

" हिवाळ्यांतहि अंगांत नसतें ? "

" बाराहि महिने. त्यांत कधीच बदल होत नाही. असामी चांगली गबर आहे, पण पैशाचा उपयोग करण्याचें गृहस्थाला ठाऊकच नाही. "

" असें ! इतका कंजुष ? "

" कळेल तुम्हांला लवकरच ! "

त्यांचें खरं नांव मला कळलेंच नाही. तें कळावें असें मला कधी वाटलेंहि नाही. आज त्याची जरूरहि नाही; पण पूर्वीहि कधी जरूर भासली नव्हती. अनेक वेळां त्यांची माझी गांठ पडत असे. कित्येकदा घटका घटका आम्ही एकमेकांशी बोलत बसलों असूं; पण त्यांच्या नांवाचा उल्लेख होण्याचा प्रसंगच येत नसे. समक्ष त्यांना नांवाने हांक मारण्याची आवश्यकता भासत नसे, आणि मागें त्यांच्याविषयी बोलायचें झालें, तर इतरांप्रमाणें मीहि ' उघडू पाटील ' म्हणूनच त्यांना संबोधीत असें.

गावांतील सारे लोक, लहानापासून थोरापर्यंत त्यांना ' उघडू पाटील ' याच नांवाने ओळखीत असत. थोड्याच दिवसांत मला मिळालेल्या माहितींत अतिशयोक्ति मुळीच नव्हती हें माझ्या लक्षांत आलें. त्यांच्या अंगांत मला कधीच कपडा दिसला नाही.

जाडेंभरडें आखूड धोतर, डोक्यावर जुनें पागोटें व खांद्यावर एक तोकडें उपरणें हाच त्यांचा पोषाख. त्यांत मला कधीच बदल आढळला नव्हता. रक्त गोठविणाऱ्या थंडींतहि अंगावर दुसरें कांही कधी दिसलें नव्हतें.

त्यांनी बंडी घातल्याचें आपण पाहिलें आहे म्हणून अभिमानाने सांगणारे एकदोन जण गावांत होते. ते सांगत की, एकदा कोर्टांत साक्षीची पाळी आली असतां त्यांना अंगांत बंडी घालावी लागली होती. वकिलाने बजावल्यामुळे त्यांचा नाइलाज झाला होता. बंडी तर शिवलेली नव्हती. शेवटी कोणाची तरी मागून आणून त्यांनी ती अंगांत घातली होती, व वेळ निभावून नेली होती. पण फार जुनी गोष्ट होती ती. कोर्टांत त्यांच्या-बरोबर असलेल्या दोन-तीन माणसांशिवाय कोणालाहि तें दृश्य पाहण्याची संधि मिळाली नव्हती. त्या वेळींहि कोर्टाच्या आवारांत शिरल्यावरच त्यांनी बरोबर नेलेली बंडी अंगावर चढविली होती. साक्षीचें काम संपवून कोर्टाच्या इमारतीच्या बाहेर येतांबरोबर त्यांनी ती काढून टाकली होती. ते नेहमीच उघडे दिसत असल्यामुळे सारा गाव त्यांना ' उघडू पाटील ' याच नांवाने ओळखूं लागला होता.

पाटीलबुवा कमालीचे चिक्कू होते. गृहस्थ चांगला सुखवस्तु. घरीं जमीन-

जुमला बराच. उत्पन्नहि छान होतें. पण पैसा खर्च करावयाचा म्हटला की त्यांच्या अंगावर कांटा उभा राहात असे. घरांत फक्त एक मुलगी व एकच मुलगा. मुलाचें नांव होतें दौलत. पण यांच्या कंजुषपणामुळे त्याचीहि आबाळ व्हायची. त्यांच्या अंगावर धड कपडेहि दिसायचे नाहीत एकदा कांहीतरी निरोप घेऊन दौलत मजकडे आला. त्याच्या अंगांत सदरा नव्हता. मीं विचारलें,

" कां रे, सदरा नाही घातला अंगांत ? "

" तो धुतला आहे. अजून ओला आहे. "

" दुसरा सदरा नाही का ? "

" दुसरा ? " त्याने आश्चर्याने माझ्याकडे पाहिलें.

माझ्या मनांत आलें, ही यांची खरी ' दौलत ' उघड्यावर वावरते आहे आणि हा गृहस्थ सोनें नाणें कोंडून ठेवतो आहे. कोणाकरतां ठेवतो देव जाणे !

कोणत्याहि कामाला त्यांच्याकडून पैसा सुटायचा नाही. अगदीच नाइलाज झाल्याशिवाय घरांतील मोठें कुलूप लावलेली पेटी उघडायची नाही. घरांत दाणागोटा भरपूर असे. कांही अडलें तर त्यांतून थोडासा मागील दरवाजाने बाहेर पडत असे. माउली आला प्रसंग नकळत निभावून नेई. पाटीलबुवांना मागण्यापेक्षा हा वाममार्ग फार सोपा असा तिचा अनुभव होता. मुलांच्या गरजाहि त्याच रीतीने भागविल्या जात.

असें होतें तरी उघडू पाटलांना तोंडावर छेडण्याची कोणाचीहि हिंमत नव्हती. आणि त्याचें एकच कारण होतें. आपला पैसा खर्च होऊं नये, हें त्यांना जितक्या तीव्रतेने वाटे, तितक्याच तीव्रतेने दुसऱ्याचाहि पैसा खर्च होऊं नये, असेंहि पण त्यांना वाटे. पुष्कळशीं कंजुष माणसें अशीं असतात की स्वतः झीज सोसायची त्यांची तयारी नसते; पण दुसऱ्याच्या पैशावर जितकी चैन करतां येईल तितकी करायला ते एका पायावर तयार असतात. आपला पैसा कडीकुलुपांत जपून ठेवायचा व इतरांचा जितका उधळतां येईल तितका उधळावयाचा. त्यांच्या घरीं कोणाचें बोट भिजावयाचें नाही, पण दुसऱ्याकडे आमंत्रण लावून घेण्याची वाट मात्र डोळ्यांत तेल घालून पाहावयाची. पण हा आपपर भाव उघडू पाटलांच्या ठिकाणीं मुळीच

नव्हता. स्वतःचा पैसा खर्च करणें त्यांच्या जितकें जिवावर येत असे, तितकेंच दुसऱ्याचा पैसा खर्च होणेंहि त्यांच्या जिवावर येत असे. त्यांच्या घरीं कधीं कोणाला चहा मिळत नसे; कारण तो होतच नसे. दोनदां जेवावयाच्या ऐवजीं तीनदां जेवावें, पण अशा वायफळ खर्चाच्या गोष्टी करूं नयेत ही त्याची वृत्ति! दुसऱ्यांनाहि ही गोष्ट पटवून देण्याचा ते प्रयत्न करीत. कोठे चहा झाला असतां ते गेलेच, तर त्यांच्या चेहऱ्यावर नाराजीची छटा उमटून जात असे. अतिशय आग्रह केल्यामुळे त्यांनी चहा घेतलाच तर, कडूचिराइताचा काढा घेत असल्याप्रमाणे त्यांना वाटावयाचें. तीच गोष्ट इतर बाबतींतहि. मला एक दोनदां तर त्यांनी चांगलेंच ऐकविलें होतें.

माझ्याकडे कोणीतरी पाहुणे आले होते. जेवण झाल्यावर मीं एका विद्यार्थ्याला दिडकीच्या विड्या व दिडकीच्या सुपाऱ्या आणायला सांगितलें. आम्ही गप्पा मारीत बसलों. सुपारी-विड्या आल्यावर पाहुण्यांनीं विडी पेटविली. मीं सुपारी फोडून एक खांड त्यांना दिलें. तितक्यात उघडू पाटील आले.

"या या, बसा! जरा सुपारी घ्या!" मीं त्यांना विनंती केली.

अनिच्छेनेच सुपारीचा तुकडा त्यांनी हातांत घेतला. थोडा वेळ आम्हीं गप्पा मारल्या. पाहुणे जायला निघाले. दारापर्यंत जाऊन मीं त्यांना निरोप दिला. उघडू पाटील बसलेलेच होते. मीहि त्यांच्या शेजारीं बसलों.

बोलूं का नको असा भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसला.

शेवटीं ते म्हणाले,

"विड्या केवढ्याच्या आणल्या होत्या?"

"दिडकीच्या." त्यांच्या विचारण्याचा हेतु माझ्या लक्षांत येईना.

"किती आल्या?"

"आठ!"

"पाहुण्यांनी किती ओढल्या? दोन वाटतं?"

"छे! एकच ओढली त्यांनी! ह्या सात विड्या शिल्लक आहेत."

"सुपाऱ्या केवढ्याच्या आणल्या होत्या?"

"त्याहि एकाच दिडकीच्या आणल्या होत्या!

" चार आल्या होत्या वाटतं ? समोर पडलेल्या सुपाऱ्यांकडे पाहात उघड्र पाटील म्हणाले,

" हो ! त्यांतील एक फोडली. तीन तशाच राहिल्या. " जे प्रश्न येतील असें वाटलें, त्यांचीं एकदमच उत्तरें दिलीं मीं. त्या साऱ्या तपासणीचा रोख अजूनहि माझ्या लक्षांत येईना.

" तुम्ही कधी विडी ओढीत नाही. सुपारीहि खात नाही. खरं ना ? " त्यांना तें माहीत होतें.

" कधीच नाही. "

" आता ह्या सात विड्या व तीन सुपाऱ्या उरल्या. याचें काय करणार ? "

" राहतील घरांत. एखादे वेळीं कोणी आला तर उपयोगी पडतील. "

" अहो, पण आज दोन दिडक्या खर्च करायची काय जरूर होती ? एका दिडकींत विड्या अन् सुपाऱ्या आणून भागलें नसतें का ? नाहीतरी ह्या वस्तू पडूनच राहतील ना ? कदाचित् कोठेतरी पडतील व वायां जातील. असा निष्कारण खर्च करण्यांत काय अर्थ आहे ? कोणी आल्यावर उपयोगी पडतील. पण तोंपर्यंत त्या नीट राहतील का ? आणि कोणी येईल तेव्हा आणतां येणार नाहीत का ? आज दिडकी वांचली असती की ! "

ही तऱ्हा होती त्यांची. पै जर प्रचारामध्ये असती तर एका पैमध्ये दोन विड्या व एक सुपारी आणायची सूचना त्यांनी केली असती, हीं माझी खात्री होती. दिडकी खर्च करणें त्यांना रुचलें नसतें.

असाच दुसरा एक प्रसंग. मीं घर बदलावयाचें ठरविलें होतें. मी राहात असलेल्या घरापेक्षा दुसरें घर अधिक चांगलें होतें. जागा थोडी लहान होती, पण खेड्याच्या मानाने व्यवस्थित बांधलेली होती. आम्हांला मोठ्या जागेची जरूर नव्हती. दोघांना ती भरपूर होती. बायकोलाहि ती पसंत होती. राहत्या जागेपेक्षा त्या जागेचें भाडें जास्त होतें, पण आमच्या मनांतहि तो विचार आला नाही.

घरांतील सामान केव्हा हलवावयाचें याबद्दल आमच्या गोष्टी चालल्या असतां उघड्र पाटील आले.

" घर बदलावयाचं नक्की ठरवलें का ? " त्यांनी विचारलें.

" जवळ जवळ नक्कीच ठरलें आहे."

" कां बरें ? येथे कांही गैरसोय आहे का ? "

" छे, छे ! येथे तशी गैरसोय कांहीच नाही. उलट हीच जागा मोठी आहे. पण ती जागा व्यवस्थित आहे."

" यापेक्षा काय जास्त आहे तेथे ? "

" तसें जास्त तर कांही नाही. "

" या जागेचें भाडें काय आहे ? "

" आम्ही येथे एक रुपया भाडें देतों दरमहा. "

" अन् तेथे काय द्यावें लागणार आहे ? "

" तेथे दोन रुपये भाडें ठरलें आहे. "

" या जागेपेक्षा ती जागा लहान आहे. थोडी जास्त व्यवस्थित आहे; अन् तेवढ्याकरिता दुप्पट भाडं देणार तुम्ही ? चांगला विचार आहे ! "

" दोन रुपये म्हणजे कांही जास्त भाडें नाही ! "

" एक रुपयाच्या दुप्पट आहे. हें घर कांही वाईट नाही. इतकें चांगलें घर तरी दुसऱ्या कोणत्या मास्तरला मिळालें आहे ? अन् महिन्याला निष्कारण रुपया घालवायचा ! पैशाचें महत्त्वच तुम्हांला कळत नाही. सूनबाई, तूं तरी कांही सांगायचें ! "

सूनबाईंना बरोबर पटलें. आपण पैशाचा विचार अधिक करतों; योग्य ठिकाणींच आपण खर्च करतों. आपला नवरा उधळ्या आहे, असा बहुतेक बायांचा प्रामाणिक समज असतो. पाटीलबुवांच्या सूनबाईंचाहि तोच समज होता.

घर बदलायचा आमचा विचार ताबडतोब रद्द झाला.

आणि अशा त्यांच्या वृत्तीमुळेच कोणीहि त्यांच्या कंजुषपणाबद्दल त्यांचा तिरस्कार करूं शकत नव्हता. जें आपल्याबद्दल तेंच परक्याबद्दलहि ! आपण द्यायचें नाही, दुसऱ्याचें घ्यायचें नाही. स्वतःच्या पै-पैशाला जपायचें. दुसऱ्यानेहि आपल्या पै-पैशाला जपावें ही तळमळ. स्वतःच्या पैशाची जी किंमत तीच दुसऱ्याच्या पैशाची. म्हणूनच त्यांची चेष्टा करण्याची कोणालाच इच्छा होत नसें; अन् एखाद्याला ती झाली तरी त्याला हिंमत होत नसे-- तो

धजत नसे. तरीहि एक प्रकारचा पीळ – अढी – त्यांच्याविषयी बहुतेकांच्या मनांत बसलेली दिसे, हें मात्र खरें.

उघडू पाटलांनी जेव्हा आपल्या मुलीचें लग्न ठरविलें तेव्हा तर तो पीळ अधिकच झालेला दिसूं लागला.

पाटीलबुवांकडचें तें पहिलेंच कार्य होतें. त्यांना समक्ष कोणी बोललें नाही; पण आपसांत बोलतांना अनेकांच्या तोंडून अनेक तऱ्हेचे उद्गार बाहेर पडूं लागले.

" अरे, हा म्हातारा काय खाऊं घालणार ? "

" आजपर्यंत यांच्या घरीं कोणाचा हात भिजला नाही. आता किती जणांचा हात भिजेल पाहूं या ! "

" कांही खर्च न करतां लग्न करता येणें शक्य असतें तर त्यांना किती आनंद झाला असता."

जनतेच्या तोंडाला हात लावणें कोणाला शक्य झालें आहे ? बरेच लोक लांबून लांबून चौकशी करूं लागले. या म्हाताऱ्याकडून दहा-पांच लोकांच्या तोंडीं घास पडणें कठीण असेंच सर्वांना वाटत होतें. पापहि विकत न देणारा हा माणूस लग्न कसें करणार, हें पाहण्याची साऱ्यांनाच उत्सुकता लागून राहिली.

आणि नंतर आम्ही सारेच चकित झालों. जी गोष्ट पंधरा वीस वर्षांत घडली नव्हती, ती उघडू पाटलांनी करावयाची ठरविली होती. मुलीच्या लग्नांत वेस ( गावजेवण ) द्यावयाची त्यांनी तयारी चालविली. लग्नाच्या दिवशीं गावांतील सर्वांना जेवण द्यावयाचें, कोणाच्याहि घरीं चूल पेटूं द्यावयाची नाही; एवढेंच नव्हे तर गावावरून जे जातील त्यांनाहि जेवल्या-शिवाय जाऊं द्यावयाचें नाही. सर्वजण जेवून तृप्त झाले पाहिजेत. कोणीहि अतृप्त, उपाशी राहूं नये. ही कांही बोलायची गोष्ट नव्हती. तें जिकिरीचें काम तर होतेंच; पण सामान्य माणसाच्या आवांक्याबाहेरचेंहि होतें. तितका खर्च करणें कांही सोपी गोष्ट नव्हती. गावांत दोन-तीन पिढीजात श्रीमंतांचीं घरें होतीं, पण त्यांच्यापैकी कोणींहि अजून तें साहस केलें नव्हतें; निदान कोणीं केल्याचें आम्हीं ऐकलें नव्हतें.

कांहींना तर तें शक्यच वाटेना.

' कांही तरी होईल. कोणी जेवतील तर कोणी उपाशीच राहतील. हें सरलें, तें खुटलें, असाच गोंधळ माजेल. ' ही बऱ्याच जणांची कल्पना.

" मोठें नांव व्हायला पाहिजे, पण त्याकरता काय करायला पाहिजे हें कळलें की डोळे पांढरे होतील ! " असे कुत्सितपणाचे उद्गारहि कानांवर येऊं लागले. कांही गंमत पाहण्याकरितां टपूनहि बसले.

मी एकदा त्यांना म्हणालोंहि,

" तुम्हीं एवढें अंगावर घेतलें, पण कसें पार पडेल हें ? "

" तुम्हीं सर्वांनी मनावर घेतल्यावर काय कठीण आहे ? काम गावाचें आहे. मी निमित्तमात्र आहें. "

" पण किती खर्च येईल ? "

" देवदयेने सारें होईल ! खर्च काय नेहमी करावा लागतो ? अशा प्रसंगींच करायचा असतो. पैसा अशा योग्य कारणाकरिताच मिळवायचा असतो— जपून ठेवायचा असतो. "

" पण...पण वाटतं, एवढ्याची कांही जरूर नव्हती ! "

" हें देणं असतं ! तें द्यायला पाहिजे ! "

सर्व भोजनसमारंभ इतका व्यवस्थित पार पडला की सर्वांच्या शंका-कुशंका मनांतल्या मनांत आपोआप जिरल्या. गावांतीलच नव्हे तर आजूबाजूच्या गावचे कितीतरी लोक जेवून गेले. कांहींना तर उघडू पाटलांनीं मुद्दाम माणसें पाठवून बोलावून आणलें. आग्रह करकरून वाढावयास लावलें. लहानापासून थोरांपर्यंत सर्वांची पूसतपास केली.

सर्वांचीं जेवणें झाल्याचें पाहिल्यावर मगच त्यांनीं आपल्या तोंडांत अन्नाचा घास घातला; अन् त्याच दिवशीं त्यांनी एका अनाथाश्रमास खूप मोठी देणगी दिली.

★

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप
वि: चरित्र
अनुक्रम ..................
क्रमांक ....१०८९.... नों: दि: ..........

१

# बळी

एखादा अतिशय हसायला लागला की त्याला पुढे रडावें लागेल असें म्हणतात. तसा विचित्र अनुभव पुष्कळदा येतोहि; निदान मनुताईची आठवण झाली की मला या म्हणण्यांतील आशय तीव्रतेनें जाणवतो.

मनूताईचा लग्नसोहळा असा थाटांत झाला होता म्हणतात. त्या दहा पंधरा वर्षांत तसा लग्नसमारंभ झाला नव्हता. बाप आणि सासरा दोघेहि लक्ष्मीचे लाडके पुत्र होते. दोघे जिवलग मित्र होते. दोघांचा व्यापारधंदा भागीने एकत्र चालत होता. एक दोन ठिकाणीं दोघांनी जिन व प्रेस घातले होते. दोघांमधील प्रेमभाव दृढतर व्हावा म्हणून त्यांनीं हा सोयरसंबंध मनुताईच्या जन्मानंतर लवकर जुळविला होता.

मनूताई माधव पाटलांची थोरली मुलगी. तिला एक लहान भाऊ मात्र होता. कित्येक वर्षांत पाटीलबुवांकडे कार्य, समारंभ झाला नव्हता. त्यांच्या हौसेला व उत्साहाला सीमा नव्हती. तापीराम महाजनांचा कृष्णा हा नंबर दोनचा की तीनचा मुलगा. पण घरांत संपत्तीचा केर बराच साचला होता. त्यामुळे त्यांनाहि हात आवरून धरण्याचें कारण नव्हतें. एखाद्या कारणाकरिता पांच खर्च करा असें एका पक्षाने म्हटलें की दुसऱ्याची दहा खर्च करावयाची तयारी! मग कशाची कमतरता भासणार?

त्या लग्नाच्या वेळीं मी ××× गावीं नव्हतों. कांही वर्षांनंतर माझी तेथें बदली झाली होती. तरीहि कुठल्याहि लग्नसमारंभाच्या वेळीं मनूताईच्या लग्नाची गोष्ट निघत नव्हती, असें होत नव्हतें. कोणीना कोणी

११५५

तरी त्या लग्नाची आठवण काढून होणाऱ्या समारंभाची त्या लग्नसमारंभाशीं तुलना करीत असे व नाक मुरडीत असे. इतका तो सोहळा सर्वांच्या मनांत घर करून राहिला होता.

माझे केस कापतांना आमच्या सुका न्हाव्याने कितीदा तरी त्या समारंभाचें वर्णन मला ऐकवलें होतें. त्या लग्नप्रसंगीं तीन-चार दिवस गावांत दुसरीकडे कुठेहि चूल पेटली नव्हती. सुका अगोदरच मोठा गोष्टी-वेल्हाळ. त्यांत त्याला मनापासून बोलायला मिळालेला विषय—असा रंगून बोलत असे, कित्येकदां तर केस कापतांना त्याचा हातहि थांबत असे. त्या जेवणावळी, तें दारूकाम, तो पानसुपारीचा थाट, तें विहिणींचं न्हाणं. जणूं आतांच घडलें आहे असें तो भासवायचा ! आणि शेवटीं गहिवरल्या आवाजांत म्हणावयाचा "मनुताईच्या संसाराचा असा घोळ होईल अशी तेव्हा कोणाला कल्पना तरी होती का ? देवानं खरोखर डोळे झाकले आहेत असें वाटतें !"

मला साऱ्या गोष्टींची कल्पना आली, त्या वेळीं कळलें कीं, देवाने कांही डोळे झाकले नाहीत, माणसांनीच आपले डोळे मिटून घेतले आहेत. मानापमानाच्या कल्पनांच्या झडपा त्यांनी डोळ्यांना बांधल्यामुळे घाण्याच्या बैलाप्रमाणें त्यांना कांहीच दिसत नाही. आंधळेपणानें ते ठर-लेल्या चाकोरींतून जात आहेत. भोंवतालचें जग ते पाहूंच शकत नाहींत. त्यांची विचारशक्ति, प्रतिष्ठेच्या एकाच बिंदूभोवती गिरक्या घेत आहे.

मनूताईचें लग्न झालें तेव्हा तिचें वय आठ-नऊ वर्षांचें असेल. वास्त-विक वयाच्या चौथ्या पांचव्या वर्षीच तिचें लग्न व्हायचें, पण दोघेहि व्याही व्यापारधंद्यांत असे गुंग होते की अशा गोष्टींकडे लक्ष द्यायला त्यांना सवडच मिळत नव्हती. 'लवकरच करूं, या वर्षीं करायचंच' असें म्हणतां म्हणतां तीन-चार वर्षें सहज निघून गेलीं होतीं. शेवटीं त्यांनीं सवड काढून जेव्हा कृष्णाचें व मनूताईचें लग्न केलें, तेव्हां तीं त्या काळच्या मानाने बरींच मोठीं झालेलीं होतीं. पतिपत्नीच्या नात्याची ओझरती कां होईना, पण जाणीव उत्पन्न होण्याइतकें त्यांचें वय लग्नाच्या वेळेसच झालें होतें.

लग्नानंतर तीन-चार वर्षेंपर्यंत कधी सासरीं तर कधी माहेरीं, मनाला वाटेल

तेथें वाटेल तितके दिवस मनू राहायची. सासर-माहेर यांत तिच्या लेखीं भेद नव्हता. माहेरची माया सासरींहि ती अनुभवीत असे. कोणालाहि हेवा वाटावा असें आगळें भाग्य तिला लाभलें होतें. नवऱ्याची ओळखहि नवीन व्हायची नव्हती; तिनें अगदीं बाळपणीं कित्येकदां त्याच्याबरोबर भातुकलीचा संसार मांडला होता. साऱ्या गोष्टी दृष्ट लागल्यासारख्या होत्या.

आणि शेवटीं खरोखरच मनूताईच्या संसाराला दृष्ट लागली असें दिसून आलें होतें. कपाशीच्या व्यापारांत 'पाटील आणि महाजन' कंपनीला बरीच मोठी ठोकर बसली होती. हिशेबावरून दोन्ही व्याह्यांमध्ये प्रथम थोडीशी कुरबुर झाली होती आणि नंतर तिचें वैमनस्यांत रूपांतर झालें होतें. अमृत नासलें होतें, तें विषाप्रमाणें अपायकारक ठरलें होतें.

दिवाळीला मनूताई माहेरीं आली असतां ही बोलाचाली झाली होती. बोलतांना दोघांचाहि तोल गेला होता. 'तुमची मुलगी आमच्याकडे नांदायची आहे हें विसरूं नका' असें महाजनांनीं म्हणतांच 'माझी मुलगी मला जड नाही. मला दोन मुलगे आहेत असें मी समजेन' असें पाटील-बुवांनी उत्तर दिलें होतें, आणि नंतर शब्दाला शब्द वाढत गेला होता.

" तरुण मुलगी म्हणजे काळजांतली कट्यार ! भलतीच घमेंड बाळगण्यांत काय अर्थ ? "

" माधव पाटील बोलेल तसं करून दाखवील. नुसती घमेंड बाळगणार नाही. "

" तुमच्या मुलीला जरा विचारून पाहा. "

" काय विचारायचें ? या माधव पाटलाची ती मुलगी आहे हें विसरूं नका. "

" ठेवा मग तिला कायमची माहेरीं. "

" तें तुम्ही सांगायची जरूर नाही. "

" पोरीचा जन्म वाया जाईल ! "

" तें आमचें आम्ही पाहून घेऊं ! "

" मागाहून रडावें लागेल. "

" तुम्हांला आसवें पुसायला बोलावणार नाही. "

आणि नंतर......

दिवाळसणाकरिता माहेरीं आलेली मनूताई अजूनहि माहेरींच राहिली होती.

दोन्ही व्याह्यांमध्ये कोर्टकचेऱ्या सुरू झाल्या होत्या. प्रत्येकाभोवती दहापांच माणसें असायचीं. त्यांनीं इकडचें तिकडे, एकाचे दोन करायचे! त्यामुळे त्यांचे संबंध अधिकच कटुतर होत गेले होते. दोघांमधून विस्तवहि जाईनासा झाला होता.

'सून केवळ लक्ष्मी आहे. ती आली तर मुलीप्रमाणेंच आम्ही तिला वागवूं. पण तें शक्य दिसत नाही. कुत्र्याचें शेपूट का कधीं सरळ होतें?' असले महाजनांचे उद्गार एखाद्याने तिखट-मीठ लावून माधव पाटलांना सांगावे, अन् ते तुम्हांला कुत्रा म्हणतात म्हणून चिडवावें. त्यांच्या अंगाची आग आग व्हावी. त्यांनीहि जशास तसें बोलावें, 'नुसतें कुत्रें नाही--पिसाळलेलें कुत्रें आहे म्हणावें. गोळी घाला त्याला.' असें चिडून म्हणावें. अन् कोणीतरी महाजनांना सांगावें, 'ते तुम्हांला पिसाळलेलें कुत्रें म्हणतात, गोळी घातली पाहिजे सांगतात' महाजनांच्या डोळ्यांत अंगार फुलावा, अंगाचा तिळपापड व्हावा.

असें सारखें चालू होतें.

मी त्या गावीं आल्यानंतर हळूहळू हें सर्व मला कळलें. मनूताईचा भाऊ माझ्याच वर्गांत होता. मी राहायला घेतलेलें घरहि माधव पाटलांच्या वाड्यालगतचीं दोन घरें सोडून जवळच होतें. उन्हाळ्यांत तेथल्या जिनमध्येच तापीराम महाजनांचा मुक्काम होता. त्यामुळे थोड्याच दिवसांत त्या दोन्ही घराण्यांशीं माझा निकटचा संबंध आला. त्यांतील माणसांना मी अगदी जवळून पाहूं शकलों; आणि मला कळून आलें की, माणसें चांगलीं असूनहि अभिमानाच्या आहारीं जाऊन तीं कित्येकदा, फारसें कारण नसतां, एकमेकांचा कमालीचा द्वेष-तिरस्कार करूं शकतात. दुसऱ्याने केलेल्या चांगल्या गोष्टीहि त्यांना रुचत नाहीत, त्याच्याकडे तीं विकृत दूषित दृष्टीनेच पाहतात. खल नसूनहि त्यांच्याकडून खलपुरुषांप्रमाणे कृति घडते. ते सहज कसाबकरणी करायला प्रवृत्त होतात.

कृष्णाची नि माझी बरीच गट्टी जमली होती. पोरगा मोठा मोकळ्या मनाचा. एकदा संध्याकाळीं मी जिनमध्यें गेलों असतां मला तो म्हणाला,

" सर, आज फिरायला जाऊं या का? जीव अगदीं आंबून गेला आहे. जरा लांब जाऊन पाय मोकळे करूं या ! मला थोडंसं बोलायचंहि आहे तुमच्याशीं. "

आम्ही बाहेर पडलों अन् बऱ्याच दूरवर नदीकाठच्या एका टेकाडावर जाऊन बसलों.

कांही वेळ कृष्णा स्तब्ध बसला होता. त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या मनांत कसलीतरी खळबळ चालली असली पाहिजे हें स्पष्ट दिसत होतें. मी मुद्दामच बोललों नाही. थोड्या वेळाने तो हळूच म्हणाला,

" सर, घरांत मोठा वाद चालला आहे. "

" अरे, घरोघरच वाद चालतात. "

" पण हा वाद थोडा निराळ्या प्रकारचा आहे. "

" असं ? काय झालं आहे ? "

" माझें दुसरें लग्न करण्याचें घाटतें आहे. "

मला कृष्णाच्या मनाची कल्पना नव्हती. या बाबतींत आम्ही सहसा बोललों नव्हतों. एकदम कांहीतरी सांगणें योग्य नव्हतें. मीं प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिलें.

" तुमचें काय मत आहे ? "

" कशाबद्दल ? " मी मुद्दामच अज्ञान पांघरीत म्हणालों.

" या लग्नाच्या विचाराविषयी ! "

" तो तुमचा अगदी खासगी प्रश्न आहे. दुसऱ्याने त्यांत नाक खुपसणें कांही बरें नाही. "

" सर, मी केवढ्या आशेने तुम्हांला विचारतों आहें, अन् तुम्ही मला उडवून लावता ? माझ्या मनाचा असा गोंधळ झाला आहे ! मला समजतच नाहीं कांही ! तुमच्याजवळ मन मोकळें करावें म्हणून मीं तुम्हांला फिरायला आणलें. "

कृष्णाच्या डोळ्यांत टचकन् पाणी आलें.

मला वाईट वाटलें. प्रश्न अतिशय नाजुक होता, आणि माझ्या मर्यादा मी जाणून होतों. दोन्हींहि मान्यवर तालेवार घराणीं ! त्यांच्यामधील अटीतटीचे विकोपाला गेलेले संबंध ! दोन्ही घराण्यांतील प्रमुख माणसें

दुराग्रहाने बेभान झालेली! माझ्यासारख्या एका सामान्य शिक्षकानें कांही तरी सुचविणें कसें शक्य होतें? दोन्ही घराण्यांशीं माझे निकटचे संबंध आले असले तरी त्यांच्या मानबिंदूंच्या कक्षेंत मीं प्रवेश करणें कसें सयुक्तिक झालें असतें? लहान तोंडीं मोठा घास घेऊन स्वत:ला हास्यास्पद करून घेणें कांही मला रुचणें शक्य नव्हतें. त्या दोन्ही हेकेखोर माणसांनी या तरुण मुलांच्या जीवनाशीं जो खेळ मांडला होता, तो उघड्या डोळ्यांनीं दिसत असूनहि मला कांहीच करतां येणार नव्हतें हें मी पूर्णपणें जाणत होतों.

" कृष्णा, गैरसमज करून घेऊं नकोस माझ्या बोलण्याचा! काय चाललें आहे घरांत? "

" बाबा म्हणतात, ' आतां अधिक वाट पाहण्यांत अर्थ नाही. कृष्णाचं दुसरं लग्न करून टाकूं. ' "

" मग वाद कोठे उत्पन्न झाला? "

" आईला तें पटत नाही. "

" आईचें काय म्हणणें आहे? "

" मनूची काय कसूर आहे? ती दिवाळीला गेली नसती नि आपल्याकडेच त्या वेळीं असती तर—कसेंहि करून तिला घेऊन या एकदा. फार गुणाची मुलगी आहे! "

" अन् तूं काय म्हणतोस! "

त्याहि स्थितींत कृष्णा थोडासा लाजला.

" अरे, लाजतोस काय असा? तुला माझ्याजवळ मन मोकळें करायचें आहे ना? "

" ती खरंच फार चांगली मुलगी आहे! आम्ही तर बाळपणापासून एकत्र खेळलों-हसलों आहोंत. ती फार प्रेम करते माझ्यावर! "

" अन् तूं रे? तुझें नाही का तिच्यावर प्रेम? का एकांगीच आहे हें सारें? " संभाषणाचा ताण थोडा कमी व्हावा म्हणून मी म्हणालों.

" कशाला लपवूं! मी तिला अजूनहि विसरूं शकलों नाही. खरें सांगायचें तर पतिपत्नी म्हणून आमची नुकतीच ओळख झाली होती. ती माहेरीं दिवाळसणाला जायला निघाली तेव्हा मीं तिला बजाविलें, " चार

दिवसांपेक्षा जास्त राहायचें नाहीं !" तिनेहि सांगितलें, "तीन दिवसांत शक्य झालें तर परत येईन !" चार दिवसांचीं चारापेक्षां जास्त वर्षें आता झालीं ! मी तगमगतों आहें ! ती तिकडे झुरणीला लागली असेल ! मोठ्या माणसांचा खेळ चालू आहे अन् आमचा जीव जातो आहे !" कृष्णा आपल्याच तंद्रींत बोलत होता. मी तेथे आहें याचाहि क्षणभर त्याला विसर पडल्यासारखें दिसलें.

कांही वेळ मीहि स्तब्ध बसलों. त्याचा उमाळा जरा ओसरूं दिला.

"मग महाजन काय म्हणतात ? आईचें म्हणणें त्यांना पटतें की नाही ?"

"सगळें पटतें ! पण मनूला आणायची कोणीं व कशी हा प्रश्न आहे. ते म्हणतात, 'मनू आली तर घर तिचेंच आहे. मुलीपेक्षांहि तिच्यावर आम्ही अधिक माया करूं. पण तिचा बाप फार हेकट आहे. वैरी आहे तिचा ! गोळाभर अन्नावर रात्रंदिवस राबणारी मोलकरीण मिळाली आहे त्याला ! तो तिला कधीच पाठविणार नाही. वाट पाहायची तरी किती ? आता डोक्यावरून पाणी जायला लागलें आहे.'"

"अस्सें !"

"लवकरच मुली पाहायला सुरुवात करणार आहेत ते." त्यापूर्वी मनू आली तर..."

"इतकी सोपी गोष्ट नाही ही ! तुमच्याकडून कोणीतरी आणायला गेल्याशिवाय कसें शक्य होईल तें ?"

"तुम्ही तिला सांगा. तुम्हांला ती थोरल्या भावाप्रमाणे मानते. तुमचें ती ऐकेल !"

"अशा बाबतींत माणसें खरीं नातीं डोळ्यांआड करतात, तर मानलेल्या नात्यांना तीं काय हिशेबांत धरणार ?"

"माझा निरोप सांगा. मी लाज-भीड न बाळगतां सांगतों. तिला म्हणावें, 'कसेंहि करून ये. येथे तुला सारे मानानेच वागवितील. मागची आठवण कोणीहि काढणार नाही. या घरची तूं लक्ष्मी आहेस ह्याचें कोणालाच विस्मरण झालेलें नाही.' एवढें माझ्याकरिता करा. कराल ना....?"

त्याने माझे दोन्ही हात हातांत घेतले अन् अत्यंत काकुळतीने पाणावलेल्या डोळ्यांनी मला म्हटलें,

" कृष्णा, मला करतां येईल तें सारें मी तुमच्याकरिता करीन. तुम्ही सुखी झालांत तर माझ्याइतका कोणालाच आनंद होणार नाही. "

दुसऱ्याच दिवशीं सहज म्हणून मी माधव पाटलांच्याकडे गेलों. योगायोगहि नीट जुळून आला होता. कोर्टाच्या कामाकरिता पाटीलबुवा तालुक्याच्या गावीं गेले होते.

" काय आई, काय चाललें आहे ? "

" कांही नाही. नुकतेंच जेवणखाण झालें. जरा लवंडलें आहें घटकाभर !"

" तिला मीं म्हटलें, जरा पड थोडा वेळ; पण ती काय ऐकते ? बसली आहे अंगणांत गोवऱ्या थापीत ! "

" काय मनूताई, सालदार आहेत की अशीं कामें करायला. तूं कशाला करायला पाहिजेत हीं कामें ? " मीं अंगणांत जाऊन म्हटलें.

" स्वस्थ बसून तरी काय करायचें ? अन् खाल्लेली भाकरी पचली तर पाहिजे ना ? "

" भाकरी पचण्याकरिता तूं कामें करतेस होय ? सारखें कांही ना कांही करीत असतेस. अन्न पचत नाही म्हणूनच ना हें सारें ? " मीं तिच्या डोळ्यांत खोल पाहत तिला विचारलें.

तिने चटकन् नजर वळवली. अन् हळूच म्हणाली,

" भाऊ, कांहीतरी कामांत असलें -- मन गुंतवलें म्हणजे बरें वाटतें. नाहीतर -- नाहीतर वेळच जात नाही. "

योग्य क्षण आलेला मला दिसून आला.

" मनूताई, काल माझ्याकडे कृष्णा आला होता. "

तिने उत्सुकतेने आपली नजर माझ्या चेहऱ्यावर खिळविली. माझ्या चेहऱ्यावर कांही वाचतां येतें का हें ती पाहत होती. तिचे प्राण जणू तिच्या डोळ्यांत गोळा झाले होते.

" ' तूं आपल्या घरीं निघून ये ! कसंहि करून निघून ये ! ' असा तुला निरोप कळवायला मला त्याने सांगितलें आहे. "

जिवाचा कान करून मनूताई ऐकत होती.

" तो म्हणाला, ' चार दिवसांत नव्हे तीनच दिवसांत तूं परत येणार होतीस. चार वर्षें नव्हे चार युगें लोटलीं ! ' तो तुझी वाट पाहत आहे, भिरभिरत्या नजरेनं वाट पाहत आहे, रात्रंदिवस वाट पाहत आहे. "

तिचे हृद्बंध तुटले. डोळ्यांतून खळाळून पाणी वाहूं लागलें.

कांही वेळाने तिने आपलीं आसवें पुसलीं. गद्गदलेल्या आवाजांत ती म्हणाली, " भाऊ, मी फार फार अभागी आहें ! "

" पण तूं तिकडे गेलीस तर तुझे दुर्दिन संपतील ताबडतोब ! "

" तिकडे जायचें, पण कसें ? सासर माहेरची अब्रू मुलीच्या हातांत असते. मी अशी गेलें तर साऱ्या घराण्याची अब्रू जाईल. ही निर्लज्ज आपल्या सुखाकरिता धावली. बापाच्या मुखाला तिने काळें फासलें. भाऊ, त्यांना म्हणावें, ' तुम्ही नुसते या; अन् तोंडाने नसलें तर नुसत्या डोळ्याने मला ' चल ' म्हणा. ' मी तश्शी धावत निघेन. केसांवरून हात फिरवायलाहि थांबणार नाही. "

" ठीक आहे ! सांगतों, पाहतों प्रयत्न करून पण..."

" एवढें कशाला ? त्यांना म्हणावें, तुमच्या घरचें कोणीहि – लहान मूलसुद्धां आलें तरी चालेल. त्यानें येऊन फक्त मला ' चल ' म्हणावें. मी क्षणभरहि येथे थांबणार नाही."

" तेंच तर कठीण आहे. पण तुला सुखी करण्याकरिता मला शक्य तें मी करीन ! "

" मी वाट पाहत आहें, सांगा."

" बरें आतां. येतों मी !" मीं जड अंतःकरणाने ताईचा निरोप घेतला.

मनूताईकरिता मी कांहीहि करूं शकलों नाही.

× × ×

कृष्णाला मीं सारें सांगितलें. त्याच्या पुढेहि तसेंच संकट होतें ! बापाच्या मनाविरुद्ध जाणें त्याला शक्य नव्हतें. बापाने त्याला तळहातावरच्या फोडा-प्रमाणे जपून वाढविलें होतें. त्याला दुखवायचें, त्याचा सारा मान-अभिमान मातीला मिळवायचा ! त्यापेक्षां दुःखानं पिचून मरणें फार चांगलें असें त्याला वाटत असलें तर त्यांत कांही नवल नव्हतें. त्याला बोल लावतां येणें शक्य नव्हतें.

त्यानंतर पंधरा-वीस दिवसांनीं एका तारखेला पाटीलबुवा यावलला गेले असतां कोर्टांतील काम आटोपल्यावर पाटीलबुवांची व महाजनांच्या वकिलांची सहज गांठ पडली – कदाचित् वकीलसाहेबांनी मुद्दामच गांठ पडावी अशी योजना केली असेल. त्या वेळीं वकीलसाहेब त्यांना म्हणाले,

" काय पाटीलबुवा, पुरे नाहीं का होत अजून ह्या कोर्टकचेऱ्या ? "

" म्हणजे मीच कोर्टकचेऱ्या करतों आहें वाटतं ? "

" तसें नाही हो ! पण आम्हांलासुद्धा हें बरें नाही वाटत ! "

" वकिलांनी असें म्हणावें हें नवल आहे ! "

" अहो, वकील झाला तरी माणूसच असतो ना ? एका वेळचे जिवलग मित्र तुम्ही !....तुमच्यांतील हीं भांडणें मिटावीं असेंच वाटतें आम्हांला !"

" आमच्यापैकीं एकजण तरी मेल्याशिवाय तीं मिटणें शक्य नाही !"

" पण तुमच्या ह्या भांडणांत मुलांचा कां बळी देतां तुम्ही ? तुम्ही खुशाल भांडा. पण . "

" अहो, तीं आमचींच मुलें ! आमच्या पोटीं येण्याचें पाप त्यांनी केलें त्याला काय उपाय आहे ? "

" महाजन आपल्या मुलाचें दुसरें लग्न ठरवायचा विचार करताहेत. तसें म्हणत होते ते एकदा."

" दुसरें ठरवो की चौथें ठरवो, मला काय करायचें आहे ? "

" नाही, मी त्यांना म्हणत होतों मनूबद्दल काय करणार ? "

" त्यांना तो विचार करायची जरूर नाही. "

" आपण तिच्या अन्नवस्त्राची व्यवस्था करायला तयार आहोंत असं ते म्हणाले. " पाटीलबुवांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां वकीलसाहेब म्हणाले.

" अस्सें ! माझी मुलगी उपाशी मरते आहे असें वाटतें काय त्यांना ? आमच्या घरीं घासभर अन्न मिळणेंहि कठीण झालें आहे म्हणून त्यांना आमची कीव वाटते आहे ! असेंच ना ? त्यांना म्हणावें, अन्नावाचून तडफडून मरायची पाळी आली तर एखादी आड-विहीर जवळ करूं; पण तुमचें मेलेलें अन्न खाणार नाहीं. "

" फारच चिडतां तुम्ही पाटीलबुवा. जरा शांत व्हा ना. ! "

" चिडण्यासारखें बोलल्यावर न चिडायला मी काय वकील आहें ? आम्ही सामान्य माणसें ! "

ही अफूची गोळी वकीलसाहेबांनी गिळून टाकली. अन् ते म्हणाले, " तुमच्या मुलीचें जीवन व्यर्थ जाऊं नये, अशी त्यांची फार इच्छा आहे."

" मी आभारी आहें त्याबद्दल. "

" म्हणून त्यांचें म्हणणें आहे – वाटलें तर ..वाटलें... "

" काय ? "

" मुलीला मोकळी करून द्यायला आम्ही तयार आहोंत. तिने कोठेहि सुखाने संसार करावा. "

" त्यांना सांगा, माधव पाटलाच्या कुळांत मुलीचें लग्न एकदाच होत असतें. लग्नबंधनांतून तिला फक्त मृत्युच सोडवतो.

" अन् त्यांना आणखी सांगा, मुलीला अन्नवस्त्र काय देतां ? एकदा मुलाच्या लग्नाचा खर्च झाला आहे. आता पुन्हा लग्नाचा खर्च करणें जिवावर येत असेल तर लग्नाच्या खर्चाची यादी माझ्याकडे पाठवून द्या. सर्व रक्कम मिळेल. अन् आणखीहि तिसरें लग्न मुलाचें करायचें असेल अन् खर्चाचें जिवावर येत असेल तर त्याचीहि मी व्यवस्था करीन. एवढें त्यांना जरूर कळवा. त्यांचा निरोप मला आपण कळवला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. आणि माझा निरोप कळविण्याबद्दलचे आभारहि आतांच आगाऊच मानतों. बरें आहे. येतों. "

दिवस भराभर जात होते.

एके दिवशीं आम्हांला कळलें कृष्णाचें दुसरें लग्न झालें. मला अतिशय विषाद वाटला. मी कांहींच करूं शकलों नव्हतों. त्या वर्षीं हंगामांत कृष्णा जिनमध्यें राहायला आला नाही. दुसऱ्या वर्षीं तो आला; पण मला भेटलाच नाहीं. एक-दोनदा मीं त्याला भेटण्याचा प्रयत्न केला, पण तसा योग आला नाही. मलाहि विशेष उत्सुकता नव्हती. जें व्हायचें तें होऊन गेलें होतें. आतां कांहींच उपाय नव्हता.

मनूताई रात्रंदिवस कामांत गुंग होती. मन मारून हिमतीने जगत होती. हृदयांत आग भडकली असूनहि सर्वांशीं हसत-खेळत बोलत होती. तिच्याशिवाय पाटीलबुवांच्या घरचें पान हालत नव्हतें. आपण दुःखीकष्टी आहों

हें दुसऱ्याला कळूं नये म्हणून तिचा आटोकाट प्रयत्न चालू असे. उदबत्ती जळत होती. सुवास पसरत होता. पण तिचें जीवन कमी कमी होत आहे याची कोणालाच जाणीव नव्हती.

एक दिवस अचानक कृष्णा मला भेटला. मला पाहतांच त्याने मान खालीं घातली. त्याचें मन अजूनहि त्याला खात असावें. मीं त्याच्याकडे विशेष लक्षच दिलें नाहीं. त्याचें बोट धरून चालणाऱ्या दीड-दोन वर्षांच्या गोंडस मुलानें माझें मन ओढून घेतलें.

" युवराज वाटतं ? "

" हं ! "

मीं हात पुढे केले. गुलामाने माझ्या अंगावर झेप घेतली.

" गोड मुलगा आहे अं ! "

" हं ! "

" फार दिवसांनी भेट झाली आपली ! नाही ? "

" हं ! "

" पुरे रे ! जरा मोकळ्या मनाने बोल की. "

" काय बोलूं ? मला तोंड आहे का बोलायला ? "

" अरे, हे योग असतात. आपण माणसें देवाच्या हातांतील खेळणीं आहोंत. तूं काय केलेंस ? परिस्थितिच अशी उत्पन्न झाली की तुझ्या ठिकाणीं कोणीहि असतें तरी हेंच घडलें असतें. "

त्याला जरा बरें वाटलें असावें. नंतर तो मोकळ्या मनाने बोलूं लागला. " मागच्या वर्षीं मी तुम्हांला मुद्दाम भेटलों नाही ! "

" अस्सें ! "

" मला तुम्हांला भेटावेसेंच वाटत नव्हतें. तुमची भीति वाटत होती मनांत. मला तुम्ही फार नादान, चंचल समजत असाल ! "

" छे ! तसें मी कांहीच समजत नव्हतों. तूं भेटला असतास तर तुला तें कळून आलें असतें, अन् तुझा गैरसमज दूर झाला असता. "

" खरेंच का तुम्ही मला तसें समजत नाही ? "

" मुळीच नाहीं. मी निराळेंच समजतों व तूं भेटला असतास तर तुला तें कळून आलें असतें ! "

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्रम .................... वि: चारित्र
क्रमांक ....१०४१....... नों: दि: ........

" काय समजूत झाली आपली ? "

" मोठ्या माणसांनी आपल्या कल्पनांपायीं तुमचा बळी दिला आहे. बळी नेहमीं दुबळ्यांचाच दिला जातो. तुम्ही दुबळे आहांत. तुम्हांला परिस्थितीपुढे मान वाकवावी लागली आहे. "

" मी तुम्हांला भेटलों नाही ही मोठीच चूक केली तर ! "

" जाऊं दे ! आतां भेटत जा ! पूर्वीप्रमाणेच मोकळ्या मनाने बोलत जा. कांही भीड-संकोच बाळगूं नकोस ! "

" एवढें कळल्यावर पुन्हा कशी चूक करीन मी ? "

नंतर तो जायला निघाला. त्याने हात पुढे केले व मुलाला म्हटलें,

" चला, घरीं जाऊं आता. " पण तो मला जो चिकटला तो सुटेच ना !

" बाळ, नांव काय बरें तुमचें ? "

" मधू ! "

" वा, छान ! मधाप्रमाणेच गोड आहे. "

" चल बाळा, चलायचं ना घरीं ? "

" आम्ही नाही ! आम्ही यांच्या बलोबल जानाल ! यांच्या घलीं ! "

" आपण मग जाऊं. आता घरीं चलायचें ! "

" अंहं ! आतांच जायचं ! "

" कृष्णा, आता असें करूं. मी घेऊन जातों या साहेबांना घरीं. तूं ये अर्ध्या-एक तासाने अन् मग घेऊन जा त्याला. "

" तो तुम्हांला त्रास देईल ! कधी स्वस्थ बसायचा नाही. "

" नाही, मी देवासालखा बसेन. "

" बरें आहे. मी येईन कांही वेळाने त्याला परत न्यायला ! "

" आम्ही नाही येनाल ! "

" बरें बरें ! "

मी मधूला घेऊन घरीं आलों. मुलांत तो ताबडतोब मिसळला व खेळण्यांत रंगून गेला.

जरा वेळाने मनूताई कांहीतरी कामाकरतां आमच्याकडे आली. मुलें दंगा करीत होतीं. त्यांचा खेळ पाहण्यांत तीहि रमली. नवीन मुलाला पाहून तिने विचारले,

" हें लेणें कोणाचें ? "

" घेईल त्याचें ! तूं घेत असशील तर तुझें ! " आपण काय बोलत आहोंत हें कळण्यापूर्वीच मी बोलून गेलों.

" म्हणजे ? अशीं का वर आलींत मुलें ? "

" कृष्णाचा मधू आहे तो ! " गोंधळ टाळण्याकरिता मीं एकदम सांगून टाकलें.

मनूताई टक लावून त्याच्याकडे पाहूं लागली. जणूं ती डोळ्यांतून त्याचें रूप आपल्या हृदयांत सांठवून घेत होती. नंतर आवेगाने तिने त्याला उचलून घेतलें. एकामागून एक त्याचे मुके घ्यायला सुरवात केली. तें पोरगेंहि तिच्या छातीला बिलगलें.

आणि मनूताईच्या डोळ्यांतून अश्रूंच्या सरी कोसळूं लागल्या. तिचा हुंदका तिला अनावर झाला. मधू गोंधळून तिच्याकडे पाहूं लागला. मी पुढें होऊन त्याला मजजवळ घेतलें. मनूताई एकदम घरांत गेली. किती वेळ तरी जमिनीवर पडून ती रडत होती. माझ्या पत्नीने हळूच तिचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. एखाद्या लहान मुलाप्रमाणे ती मनूताईला थोपटूं लागली अन् तीहि आसवें पुसूं लागली.

बऱ्याच वेळानें मनूताईचा आवेग ओसरला. मीं तिच्याकडे पाहिलें. या फटक्याने केवढा फरक पडला होता तिच्या चेहऱ्यामध्ये ! मीं पाहिलें न पाहिलें तोंच ती निघून गेली. पण तेवढ्यांत माझ्या मनांत येऊन गेलें—

एखाद्या निद्रित ज्वालामुखीच्या शिखरावर लतावृक्ष वाढावे, त्यांवर फळें-फुलें बहरावीं, सगळीकडे आनंद भासावा, कोणालाहि त्याच्या हृदयांत धगधगणाऱ्या आगीची कल्पना असूं नये, तोंच तो ज्वालामुखी जागृत व्हावा, अंतस्थ लाव्हा उसळून वर यावा, लतावृक्ष करपून त्यांचा कोळसा व्हावा अन् सारें शिखर क्षणांत जीर्ण-शीर्ण व्हावें, तसें मनूताईकडे पाहतांच मला वाटलें. तिच्या हृदयांतल्या आगीची मला एका क्षणांत कल्पना आली.

मनूताई निघून गेली. कृष्णाहि येऊन मधूला घेऊन गेला. मनाची असह्य कळ मात्र मागे राहिली.

पुढे लवकरच मीं भुसावळच्या इंग्रजी शाळेंत नोकरी पत्करली. नव्या वातावरणांत जुन्या गोष्टींचा मला बराच विसर पडला. नव्या मित्रमंडळींत

मी रमून गेलों. नवें खेळणें हातांत आलें की हातांतलें जुनें खेळणें मुलें टाकून देतात असें म्हणतात; पण मुलेंच असें करतात असें नाहि, तर मोठीं माणसेंहि तसेंच करतात. त्यांचीं खेळणीं मात्र निराळीं असतात.

दोन-तीन वर्षें कशीं गेलीं हें मला कळलें नाहीं. एकदा एक माणूस माझ्याकडे निरोप घेऊन आला, तुम्हांला डॉ. खाचणे यांच्या दवाखान्यांत बोलावलें आहे म्हणून. माधव पाटलांकडून तो निरोप आला होता.

मी दवाखान्यांत गेलों. समोरच पाटीलबुवा उभे होते. मला पाहतांच ते जरा पुढे आले.

" मनूताईला आणलें आहे. डॉक्टरांना बोलावलें होतें. त्यांनी सांगितलें, भुसावळला दवाखान्यांत घेऊन चला. फोटो काढला पाहिजे. "

" कोठे आहे मनूताई ? "

" आंत बसली आहे. गाडींतून येतांना तिला बराच त्रास झाला. "

मी आंत गेलों. मनूताईकडे पाहतांच मला चरका बसला. फूल कोमेजून गेलें होतें. अटकर-कणखर बांधा असलेल्या मनूताईचीं हाडें मोजतां येत होतीं. मला पाहतांच तिने हसायचा प्रयत्न केला. अगदी निर्जीव हास्य होतें तें !

डॉक्टरांनी फोटो घेतला. इतरहि तपासणी केली. चार पांच वाजतां पुन्हा बोलावलें. आम्ही सर्वजण माझ्या घरीं आलों.

मला जरा एकीकडे घेऊन मनूताई म्हणाली,

" भाऊ, एक मागणें आहे. आजपर्यंत कोणाला कांही मागितलें नाही मीं. कोणापुढे तोंड वेंगाडलें नाही. आज मात्र—"

" काय पाहिजे मनूताई तुला ? "

" मला कळलें आहे, माझे फार थोडे दिवस राहिले आहेत. मरणापूर्वी एकच इच्छा आहे. "

" अगदी मोकळ्या मनाने सांग. "

" त्यांची फक्त भेट व्हावी अशी इच्छा आहे. त्यांना एकदांच भेटायचें आहे ! त्यांच्या पायांवर हात ठेवून क्षमा मागायची आहे. परत जायचें कबूल करून मी गेलें नाही. त्यांना फार दुःख झालें याबद्दल. राग आला

असल्यास आता तो सोडून द्या म्हणून सांगायचें आहे. डोळे भरून त्यांना पाहायचें आहे. पुरवाल एवढी माझी इच्छा ?"

" होय ताई, तुझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून मी शक्य तें सारें करीन. पण तूं अशी निराश कां होतेस ? डॉक्टर फार चांगले आहेत. तुला खात्रीने बरें वाटेल."

" मला आता बरें व्हायची इच्छा नाही. या शरीराचें ओझें मला आता झेपत नाहीं. अन् भाऊ, जगायचें कशाकरतां ? तूं म्हणतोस निराश कां होतेस ! कसली आशाच नाही तर निराश व्हायचा प्रश्नच कोठे येतो ?"

मी काय बोलणार यावर ? मला शब्दच सुचत नव्हते.

" भाऊ, कोणाजवळच मला बोलतां येत नव्हतें. तुमची भेट झाली नसती तर मी कधी बोललेंच नसतें. तुमच्याजवळ इतक्या स्पष्टपणाने बोललें. तुम्ही कदाचित् मला निर्लज्ज म्हणाल मनामध्ये !"

" छे ताई, भलतेंच कसें म्हणेन मी ! मी काय तुला नवीन ओळखतों आहें ? तुझा निग्रह काय मीं पाहिला नाही ?"

" ही शेवटची इच्छा आहे माझी. या धर्माच्या बहिणीला एवढी भीक घाला. तिचा दुवा घ्या. तिला समाधानाने मरण येईल. अगदी हसत हसत ती मरणाला मिठी मारील."

" तूं शांत हो. मी करतों सारें !"

दुपारीं आम्ही डॉक्टरकडे गेलों.

" येथे दवाखान्यांत ठेवून नीट पथ्यपाणी केलें तर प्रकृतींत थोडीफार सुधारणा होईल." पूर्ण तपासणी केल्यावर बनलेलें मत डॉक्टरांनी सांगितलें.

अन् आम्ही दोघेच असतां ते म्हणाले, "अवस्था कठीण आहे. येथे राहिली तर कांहीं दिवस आयुष्य वाढेल इतकेंच."

मी व पाटीलबुवा परत आलों. ताईला दवाखान्यांत ठेवावें असा रस्त्यानेच आम्हीं बेत ठरविला होता. त्या विचाराला अनुसरून मी ताईला म्हणालों,

" मनूताई, तूं येथेंच थोडे दिवस दवाखान्यांत रहा ! डॉक्टर म्हणतात, येथे औषधपाणी, पथ्याचें नीट होईल."

" घरींहि मी बरोबर औषधपाणी घेईन."

" इथे डॉक्टरांना नेहमीं नजर ठेवणें शक्य होईल."

" त्याची कांही विशेष जरूर नाही."

" बाबा इथें राहतील. आम्ही आहोंतच ! "

" तुम्हांला त्रास कशाला आणखी ! "

" वेडी, त्यांत त्रास कसला ? "

" नको ! मला घरींच न्या ! जें व्हायचें असेल तें घरींच होऊं दे ! "

मी पाटीलबुवांना हळूच म्हणालों, " तिच्या मनाविरुद्ध वागण्यांत कांही अर्थ नाही. तिला अधिकच खंत वाटेल. तिला समाधान होईल असेंच वागलें पाहिजे ! आपण डॉक्टरांना नेहमीं भेटत जाऊं. "

" ठीक आहे, तिची मर्जी ! " पाटीलबुवांचे डोळे भरून आले. " ती अलीकडे अशीच हट्टी झाली आहे ! किती दिवस तिने दुखणें अंगावरच काढलें. आम्हांला कळूंच दिलें नाहीं. अति झालें, हातपाय चालेनासे झाले तेव्हां सांगितलें. पहिल्या पहिल्याने तर औषधेंहि नीट घेत नव्हती. पोरीचा मीं फुकट बळी दिला अभिमानापायी. " त्यांनी हळूच डोळे पुसले.

पाटीलबुवा मनूताईला घेऊन परत गेले.

मी दोन-तीन दिवसांनी कृष्णाच्या गावीं गेलों. तेथें एका मित्राकडे थांबलों व कृष्णाला बोलावणें पाठवलें. तो ताबडतोब आला, अन् आला तो चिडूनच आला.

" तुम्ही येथें येऊन माझ्याकडे कां आलां नाही ? काय म्हणून दुसरीकडे उतरलांत ? "

" अरे, माझे फार जुने स्नेही आहेत ते ! त्यांना राग आला असता मी दुसरीकडे उतरलों असतों तर ! "

" म्हणजे आमच्या रागाची कांही तुम्हांला किंमत नाही ? "

" उगीच अर्थाचा अनर्थ करूं नकोस ! मी तुझ्याकडेच आलों आहें. "

" हें माझें घर नाही ! "

" पुन्हा तूं अनर्थ करतो आहेस. मी काय म्हणतों तें ऐकल्यावर तूं माझ्याविषयीं रोष धरणार नाहीस. "

" बरें ! आता अगोदर घरीं चला. "

" चल. रस्त्यानेच सांगतों तुला सारें ! "

मीं सर्व हकीकत त्याला सांगितली. अन् शेवटीं म्हणालों, " केवळ तुला भेटण्याकरतां मनू जीव धरून आहे. आता फार थोडे दिवस उरले आहेत तिचे. क्षयाने तिळातिळ जळून, झिजून ती अगदी खचली पिचली आहे ! तुला नेण्याकरतांच मी आलों आहें. "

कृष्णाचें हृदय पिळवटून निघालें. " मी येतों, आताहि निघायची माझी तयारी आहे, पण मी त्यांच्या घरीं कसा जाऊं ? तेथे तिच्याशीं मला कसें बोलतां येईल ? कोणत्या तोंडाने मी तेथे येऊं ? इतके दिवस झाले, पण मी तिला विसरूं शकलों नाही; पण अशाहि स्थितींत त्या लोकांच्या दाराशीं जाणें मला कसें शक्य आहे ? "

" मी मोठ्या आशेने आलों होतों. कृष्णाला मी आणीन व मनूताईची मरणकाळची इच्छा पुरवीन असा मोठा आत्मविश्वास मला होता. असें कांही होईल अशी मला मुळींच कल्पना नव्हती.

मी गोंधळलों. दिङ्मूढ झालों. काय बोलावें हें मला समजेना.

पुन्हा कृष्णानेच बोलायला सुरवात केली.

" मनूची व माझी भेट झालीच पाहिजे. मला आता चैन पडणार नाही ! पण......असें केलें तर ? "

" काय केलें तर ? "

" डॉक्टर म्हणाले होते ना, ' तिला दवाखान्यात ठेवा म्हणून ? ' तिला दवाखान्यांत घेऊन या ना ! त्या ठिकाणीं मी तिला केव्हांहि भेटूं शकेन. किती वेळहि बोलूं शकेन तिच्याशीं ! "

" पाहायचं कसें जमतें तें ! "

" पाहूं नका, घडवून आणा. माझ्याकरता एवढें करा. कसेंहि करून तिला दवाखान्यांत आणा. मी तेथेंच थांबेन. तिची शुश्रूषा करीन. तिला बरें करण्याची शिकस्त करीन. तिला सन्मानाने येथे आणीन. माझी दुसरी पत्नी मला साथच देईल या कामांत. माझी तशी खात्री आहे. निदान शेवटीं तरी तिची सेवा मला करतां येईल. माझें कर्तव्य केल्याचें मनाला समाधान वाटेल. माझ्या मनाला कायमची लागलेली जाचणी तरी कमी होईल. "

त्याने रस्त्यांतच माझे दोन्ही हात धरले. अत्यंत काकुळतीने माझ्याकडे पाहून म्हटलें, " तुमचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. "

" उपकार कसले ? तुमची भेट झाली तर मलाहि समाधान–आनंद वाटेल. दु:खांतहि बरें वाटेल ! "

" मी तुम्हांला आता येथे राहण्याचा आग्रह करीत नाही. थोड्या वेळाने तुम्ही निघूं शकाल. डॉक्टरांच्या दवाखान्यांत तिला तुम्ही घेऊन या शक्य तितक्या लवकर. मी उद्यां येतोंच तेथे ! "

" तूं दोन-तीन दिवसांनी आलास तरी चालेल. सारें जमायला दोन दिवस सहज लागतील."

त्याच दिवशीं संध्याकाळीं मी परत आलों.

दुसऱ्या दिवशीं मनूताईला पाहायला म्हणून मी पाटीलबुवांच्या गावीं गेलों. मनूताईला अंथरुणावरून उठणेंहि आता कठीण झालें होतें.

मनूताई एकटीच असतांना मीं तिला सारें थोडक्यांत सांगितलें. त्याहि स्थितींत तिच्या चेहऱ्यावर आनंद फुलून उठला.

तिने पाटीलबुवांना हांक मारली.

" बाबा, भाऊ म्हणतात, ' मी दवाखान्यांतच राहायला पाहिजे होतें.' मला दवाखान्यांतच घेऊन चला ना ! "

आमच्याकडून काय तुझं औषधपाणी नीट होत नाहीं, बाळ? काय वाटेल ती व्यवस्था करूं आपण घरीं ! मी डॉक्टरांना रोज दोनदां यायला सांगितलें आहे. "

तितक्यांत डॉक्टरहि तेथें आले.

पाटीलबुवांनीं मनू काय म्हणते तें त्यांना सांगितलें. त्यांनीं काळजीपूर्वक मनूला तपासलें. इंजेक्शन दिल्यावर आम्ही बाहेर ओटीवर बसलों.

" हलविण्यासारखी मनूची स्थिति नाही. दोनचार दिवसांनीं जर थोडी शक्ति आली तर नेतां येईल. आज तर नेणें शक्य वाटत नाही. एखाद्या वेळेस रस्त्यांतच... "

मी निराश झालों. परिस्थिति बिनतोड होती. कांही बोलणेंच शक्य नव्हतें. मनांतील विचार–खळबळ मनांतच दडपून ठेवावी लागली.

दवाखान्यांत आताच जातां येत नाही हें मनूला कळतांच तिचा थोड्या वेळापूर्वीचा उल्हास एकदम मावळला. आशाहि मावळली.

मी डॉक्टरांबरोबरच परत निघालों. रस्त्यानें मीं त्यांना सारें सांगितलें. " पण हें फार उशीरा झालें. या दोन दिवसांत खूपच प्रकृति खालावली आहे मनूची ! मागेंच ती राहिली असती तर फार बरें झालें असतें ! "

मी घरीं परत आलों तेव्हा कृष्णा घरीं येऊन बसलेला दिसला. मी कोठे गेलों होतों हें माझ्या पत्नीने त्याला सांगितलेंच होतें. मोठ्या आशेने तो आमची वाट पाहत होता.

" भाऊ, आणलेंत मनूला दवाखान्यांत ? "

" डॉक्टर म्हणतात, तीन-चार दिवसांनीं आणतां येईल. " मी खिन्नपणे म्हणालों.

कृष्णा काय समजायचें तें समजला. त्याचा मोठा आशाभंग झाला ! मीं आग्रह केला तरी तो थांबला नाही. तीन-चार दिवसांनीं येईन म्हणून सांगून निघून गेला.

आणि दुसऱ्याच दिवशीं मला कळलें——

मनूताई गेली !

फार वाईट वाटलें आम्हांला. माझी पत्नी तळमळून रडूं लागली.

त्याहि स्थितींत माझ्या मनांत आलें, मनूताईचा बळी दिला गेला. तिचें बलिदान झालें. भयंकर रीतीने तिचा बळी पडला. प्रतिष्ठेने तिचा घांस घेतला. बळीच्या मानेवर एकदम तरी घाव बसतो. एका क्षणांत त्याची मान पिरगळली जाते. तो एकदम सुटतो, मुक्त होतो. त्याचे मुळीच हाल होत नाहींत. पण मनूताई तशीहि भाग्यवान् नव्हती. तिळ तिळ जाळीत, रक्ताचा कण कण आटवीत, हृदय हळूहळू कुरतुडत ' प्रतिष्ठेने ' मनूताईचा बळी घेतला होता.

ती दुर्दैवी मुलगी आतांच्या ' प्रतिष्ठेचा बळी ' झाली होती.

★

१०

# जय-विजय

नांदेडला एक प्रकारची परीक्षा व्हायची होती माझी. मी तेथे पोंचलों तेव्हा मला तशी जाणीवहि करून देण्यांत आली. श्री. तोतारामभाऊ चौधरी यांची बदली होऊन त्यांच्या ठिकाणीं माझी नेमणूक झाली होती. श्री. तोतारामभाऊ हे पूर्व खानदेशांतील अत्यंत नांवाजलेले शिक्षक होते. नामांकित वक्ते होते. स्वतः श्रम करणारे व श्रम करवून घेणारे गृहस्थ होते. इतकें असून त्यांचा स्वभावहि अत्यंत निगर्वी, गोड, शालीन होता. गावकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांची बदली करण्यांत आली होती. विद्यार्थ्यांना अत्यंत प्रिय असलेल्या कर्तबगार, अनुभवी, गुणी शिक्षकाच्या जागीं मला काम करायचें होतें. विलक्षण उज्ज्वल पार्श्वभूमीवर मी उभा होतों. अलौकिक, गुणश्रेष्ठ पित्याच्या पोटीं येणाऱ्या सर्वसामान्य मुलाप्रमाणे माझें नशीब खडतर असल्याचें मला समजून आलें.

त्यांची बदली रहित–रद्द–व्हावी म्हणून साऱ्या गावकऱ्यांनी प्रयत्न केला होता. विद्यार्थ्यांनीहि अर्ज पाठविला होता. पण कशाचाच उपयोग झाला नव्हता. त्यामुळे कारण नसतां सारेच विद्यार्थी नवीन शिक्षकाविषयीं मनांत नाराजी बाळगून होते. सर्वांच्याच मनांत एक प्रकारची अढी उत्पन्न झाली होती.

माझ्यासारखा अननुभवी पोरगा तोतारामभाऊंची बरोबरी करूं शकणार नाही याबद्दल सर्वांचीच खात्री होती. पण आता दुसरा उपायच नव्हता व त्यामुळेच पुष्कळांच्या मनांत माझ्याविषयीं सहानुभूतीहि उत्पन्न

झाली होती. ते मला मदत करायला मनःपूर्वक उत्सुक होते.

अनेकजण अनेक प्रकारच्या सूचना मला देऊं लागले आणि त्या सूचनांतून मला माझ्या खऱ्या संकटाची कल्पना आली.

शिकविण्याच्या बाबतींत श्री. तोतारामभाऊंची बरोबरी आपल्याला करतां न आली तरी फारशी उणीव आपण भासूं देणार नाही असा आत्मविश्वास मला होता. अंग मोडून श्रम करायची माझी तयारी होती व अंगांत भरपूर उत्साहहि होता. पूर्वींच्या शिक्षकाइतकी बुद्धिमत्ता नसली तरी बुद्धीची थोडीशी घमेंड मलाहि होती. पण माझ्यापुढचें सांकडें मात्र सर्वस्वी आगळेंच होतें.

मला सातव्या इयत्तेला शिकवावें लागणार होतें. त्या वर्गांत अठरा-वीस वर्षांचीं म्हणजे जवळ जवळ माझ्याच वयाचीं पांच-चार मुलें होतीं. तीं शाळेंत कशाकरितां येत होतीं हें त्यांनाहि ठाऊक नव्हतें. त्यांचा बाबामिया नांवाचा अत्यंत व्रात्य व दांडगा पुढारी होता. आई व वृद्ध आजी यांशिवाय घरीं कोणीच नसल्यामुळे त्याला आवर घालणें कठीण झालें होतें त्या दोन स्त्रियांच्या जिवाला त्याने मोठाच ' घोर ' लावला होता.

भांडण उकरून काढून मारामारी करणें हा त्याचा नेहमींचा खेळ होता. एकाने मला सांगितलें, " एका मुलाने त्याच्याजवळून दोन दिवसांच्या बोलीने चार पैसे उसने घेतले होते. व्याज दोन पैसे ठरलें होतें. त्या मुलाने दुसऱ्याच दिवशीं पैसे परत केले व व्याजाबद्दल एकच पैसा दिला. याने त्याला बेदम मार दिला व आपला पैसा तर वसूल केलाच, पण कुठे बोललास मारल्याचें तर लक्षांत ठेव म्हणून वर दम भरला. आई अन् आजी मोलमजुरी करतात, शेण-काडी गोळा करतात व याच्यापुढे अन्नाचा गोळा ठेवतात. याला त्याबद्दल कसलीच खंत नाही. "

या मुलाला व त्याच्या टोळक्याला जरब लावून वर्गांत शिस्त ठेवायचें कठीण महाकर्म होतें. एकदा का नव्या शिक्षकाचें पाणी त्यांनी जोखलें की साराच कारभार आटोपणार होता; मग तेथून जीव घेऊन पळणें त्यांनी मुष्किल केलें असतें त्याला ! याच काळजीने मी बेचैन झालों होतों.

मीं सामान पोंचविलें त्याच वेळेस मला हेडमास्तर श्री. भाऊराव इंगळे यांनी सूचना दिली होती. " शाळेंत जातांना नेहमी फेटा बांधीत जा.

जवळ फेटा नसेल तर विकत घेऊन टाका." त्याप्रमाणे मीं फेटा विकतहि घेतला होता. त्यांच्या सूचनेचा खरा अर्थ मला आता कळला. डोक्यावर टोपी असतांना वर्गांत शिक्षक कोणता हें विद्यार्थ्यांतून शोधून काढणें कठीण होतें अशी खरी वस्तुस्थिति होती.

दोन दिवस आम्ही सारेच अंदाज घेत होतों. विद्यार्थी नव्या शिक्षकाकडे कुतूहलाने पाहात होते. त्याची प्रत्येक गोष्ट डोळ्यांत सांठवून ठेवीत होते. मीहि पुढचीं पावलें कशीं टाकावीं हें ठरविण्याचा प्रयत्न करीत होतों. मुलांचा अभ्यास करीत होतों.

आणि माझ्या समोरच्या पेचप्रसंगावरची तोड मला दुसऱ्याच दिवशीं उमजली—त्या दिवशीं संध्याकाळीं मुलांना मीं विचारलें होतें,

" तुम्ही कोणते खेळ खेळतां ? "

कोणींच उत्तर दिलें नव्हतें. सारे नवलाने माझ्याकडे पाहूं लागले होते. खेळ खेळणें शाळेच्या अभ्यासक्रमांत येऊं शकतें असा त्यांचा समजच नव्हता. श्री. तोतारामभाऊ प्रकृतीने अशक्त होते व त्यांनी या गोष्टीकडे कधींच लक्ष दिलें नव्हतें.

त्याच वेळीं माझ्या लक्षांत आलें—या मुलांना ज्याची आवड आहे असें शिकविण्याजोगें कांहीतरी निश्चित आपल्याजवळ आहे. माझा विद्यार्थिदशेंतील काळ अभ्यास करण्यापेक्षा मलखांब—कुस्ती करण्यांत, आट्यापाट्या, खो खो, हुतुतू खेळण्यांत अधिक गेला होता, इतकेंच नव्हे तर मीं त्यांत स्पृहणीय प्रावीण्यहि मिळविलेलें होतें. आणि त्याचा आता मला उपयोग होणार होता.

" आज आपण आट्यापाट्या खेळूं. उद्यां-परवांपासून तुमची इच्छा असली तर मी तुम्हांला मलखांब नि कुस्तीहि शिकवीन."

" आम्हांला मलखांब-कुस्तीच शिकवा." बाबामिया म्हणाला होता.

" तुमच्यापैकी कोणी कुस्ती खेळतो काय ? "

" हा बाब्या कुस्ती खेळतो." कोणीतरी म्हणालें होतें. त्यावरून मला त्याच्या कुस्ती खेळण्याची पण कल्पना आली होती. ताकद म्हणजे कुस्ती अशी त्या सर्वच मुलांची समजूत झालेली दिसली होती.

त्या दिवशीं आम्ही आट्यापाट्या खेळलों. अर्धी लढाई मीं सहज

जिंकली. तो खेळ खेळायला खूप कौशल्य लागतें व तें आपल्याला प्राप्त करून घ्यायचें आहे हें सर्वच मुलांना कळून आलें.

दुसऱ्या दिवशीं लंगोट नसला तरी धोतर कसून मलखांब कसा करायचा हें मुलांना मीं दाखविलें. कांही विद्यार्थी कपडे काढून तयारी करूं लागले. आणि मी स्वत: लंगोट लावून खेळायला तयार झालों हें पाहून गोंधळल्या-सारखे झाले.

थोडा वेळ मीं मलखांब केला, मलखांब शिकवला.

माझा हेतु बराचसा सफल झाला होता.

रिकाम्या विद्यार्थ्यांकडून बारा फूट लांब नि बारा फूट रुंद असा हौदा मीं तयार करवून घेतला. आंतील माती मऊ केली व भोवतीं बांध घातला.

बाबामिया एकदम मजजवळ आला व म्हणाला, "कुस्ती शिकवा गुरुजी. आपण कुस्ती करूं."

मीं तीक्ष्ण नजरेने त्याच्याकडे पाहिलें व चल म्हटलें.

माघार घेणें धोक्याचें ठरणार होतें.

सारे विद्यार्थी आमच्याकडे पाहात होते. एक शिक्षक एका विद्यार्थ्या-बरोबर कुस्ती खेळतो, ही गोष्ट त्यांच्या कल्पनेच्या पलीकडची होती.

मी समजलों. या कुस्तीवर बऱ्याच गोष्टी अवलंबून होत्या. एकतर आतांपर्यंतच्या साऱ्या यशावर पाणी पडणार होतें; नाहीतर माझा पेंचप्रसंग कायमचा सुटणार होता. बाबामिया मला नि:संशय भारी होता. ताकदीने व शरीरानेहि मी त्याची बरोबरी करूं शकत नव्हतों. पण कुस्ती म्हणजे काय हें त्याला अगदी माहीत नव्हतें हें मला कळून आलें होतें. ताकद म्हणजे कुस्ती या त्याच्या समजुतीचा फायदा घ्यायचें मीं ठरवलें.

कुस्तीला आरंभ होतो न होतो तोंच, तो बेसावध असतांनाच मीं बगलेने टांग मारून त्याला सपशेल चीत केलें !

अंधार ओसरला. सारे ढग एकदम वितळून गेले. मी नि:शंक झालों.

"बापू !" उठून अत्यंत आवेगाने व प्रेमाने माझे दोन्ही हात हातांत घेऊन बाबामिया उद्गारला.

नंतर त्याच्याशीं मीं पुन्हा कधीहि कुस्ती केली नाही. मधून मधून

त्याला डाव दाखवायचें काम करीत होतों. पण तेंहि अंगावरचे कपडे न उतरताच !

शाळेंतील काम अतिशय सुरळीत चालू झालें.

मला मिळालेलें घर खूप मोठें होतें. शाळेच्या वेळेशिवाय बाकीच्या वेळांत कांहीं मुलें माझ्याचकडे थांबूं लागलीं, तेथेंच अभ्यास करूं लागलीं. बाबामिया तर जेवणाकरतां व नाइलाज असेल तेव्हाच घरीं जाऊं लागला. थोडा थोडा अभ्यासहि तो करूं लागला.

एकदा सबंध दिवसांत तो मला दिसला नाही. तपास केला पण कोठे गेला हें कोणालाच माहीत नव्हतें. दुसऱ्या दिवशीं तो आला. बराच वेळ त्याची चुळबुळ चालली होती. मीं फक्त प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहिलें. कांहीच बोललों नाही.

सारीं मुलें गेल्यावर तो मजजवळ आला. मुलें जाण्याची तो वाटच पाहात होता.

" बापू ! " माझे दोन्ही हात नेहमीच्या पद्धतीने हातांत धरून तो व्याकुळतेने उद्गारला.

" काय म्हणतोस ? काल कुठे होतास ? "

" माझी चूक झाली ! "

" काय झालें ? "

" काल मी जुगार खेळलों. "

" हं ! "

" मला शिक्षा करा ! "

" काय शिक्षा करायची ? तूं कांही आता लहान नाहीस ! अन् तुला मीं कधी शिक्षा केली होती काय ? "

" म्हणूनच आता शिक्षा करा ! "

" शिक्षेचा कांही उपयोग होतो का ? आपण निश्चय केला पाहिजे. अगदी पक्का निश्चय केला पाहिजे. "

" मीं पक्का निश्चय केला होता. पण माझे जुने मित्र मिळाले, त्यांनी आग्रह केला अन् मलाहि मोह पडला. चुकलों मी ! त्यांचा कांही दोष नाही. मला माफ करा. "

" अरे, होते चुकी माणसाच्या हातून एखादे वेळेस ! पुन्हा तशी चूक होणार नाही म्हणून जपावें म्हणजे झालें."

" पुन्हा नाहीं मी अशी चूक करणार. कसली शपथ घेतली म्हणजे खात्री होईल तुमची ? "

" शपथ घेण्याची कांही जरुरी नाही. नीट लक्षांत ठेव म्हणजे झालें ! आपण चुकलों तर आपल्यापेक्षाहि दुसऱ्यांना अधिक दुःख होतें हें लक्षांत ठेव म्हणजे झालें. "

" दिसेलच तुम्हांला तें ! "

× × ×

असेच दिवस जात होते. सारें यंत्रासारखें व्यवस्थित चाललें होतें. माझें गावांतील मित्रांचें वर्तुळ वाढत होतें. मध्येच पातोडें येथील यात्रेचे दिवस आले. रविवारला जोडून यात्रेची सुटी होती.

मावजीभाऊ म्हणून आम्हां सर्व शिक्षकांचे एक मित्र होते. त्यांचें मिठाईचें दुकान होतें. गृहस्थ दुकानांतील मिठाईपेक्षाहि गोड होता. ते नेहमी यात्रेंत आपलें मिठाईचें दुकान नेत असत. यात्रेच्या दोन तीन दिवसांत मिठाईची खूप विक्री होत असे. दुकानाच्या मागच्या बाजूला तेथेच मिठाई खाणारांकरतां मोठा मांडव टाकण्याची त्यांची पद्धत होती. दोन दिवस तेथे बसायला जागा मिळणें कठीण जात असे. त्या वेळेस नजर ठेवण्याकरता विश्वासाचीं माणसें त्यांना हवीं असत. आम्ही शिक्षक प्रेमाच्या सक्तीनें हें काम आनंदाने करीत असूं. त्यामुळे पैसे वसूल होण्याचें काम चोख होत असे.

नांदेडहून खूप माणसें, मुलें यात्रेकरतां जात असत. दोन दिवस तेथे तमाशे पाहात हिंडत फिरत असत. नाना प्रकारचें सामान खरेदी करीत असत. बेहोष होऊन तेथील करमणुकींत भाग घेत असत. एक दोन दिवस त्यांना घरादाराचा विसर पडत असे.

मी दुकानासमोर उभा होतों. इतक्यांत पुंडलीक मजजवळ आला. पुंडलीक बाबूमियाचा मोठा दोस्त होता. त्याच्या पूर्वीच्या टोळींतीलच तो मुलगा होता. " गुरुजी, बाब्या बांगडीचा जुगार खेळतो आहे. त्याने खूप पैसे जिंकले आहेत. "

क्षणभर मी गोंधळलों. दुसऱ्याच क्षणीं मीं त्याला सांगितलें, “ जा, त्याला मीं बोलावलें आहे म्हणून सांग. ”

जवळच दुसरे एक शिक्षक उभे होते. ते मला म्हणाले, “ तो येणार नाही. कशाला बोलावतां ? त्याला जुगाराची नशा चढली असेल. ”

“ तूं जा पुंडलीक. मीं ताबडतोब बोलावलें आहे एवढा फक्त निरोप सांग. आला तर ठीक. नाहीच आला तर मर्जी त्याची ! ”

थोड्याच वेळांत बाबामिया धावतच आला.

“ बापू ! ” शरमेनें मान खालीं घातली त्याने.

“ चल, आपण जुगार खेळूं ! ”

त्याने माझा उजवा हात हातांत धरून माझा पंजा पसरला व आपल्या गालावर मारला.

“ शपथ घेतली नव्हतीस हेंच बरें होतें ना ? ”

“ काय बोलूं ? मला तोंडच नाही बोलायला ! आतां मीं कांहीहि सांगितलें तरी तुमचा विश्वास कसा बसेल ? आणि तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा असें तरी मी कसें म्हणूं ? ”

“ मी ठेवतों विश्वास तुझ्यावर ! ”

“ खरें ? मनापासून सांगतां बापू तुम्ही ? ”

“ मी तुला कांहीतरी कधी सांगितलें आहे का ? ”

“ क्षमा केली तुम्हीं मला ? ”

“ किती पैसे मिळविलेस रे ? मला पाहिजे आहेत थोडेसे पैसे. तुला लागतील तितके ठेव नि मला दे बाकीचे. ”

माझ्या बोलण्यांतील खोंच त्याच्या लक्षांत आली असावी. खिशांतून सारे पैसे काढून त्याने माझ्या हातावर ठेवले.

“ किती आहेत हे ? ”

“ मला माहीत नाहीं. मीं मोजले नव्हते. ”

“ तुला घे यांतून कांही. ”

“ मला एक पैसा नको त्यांतला. फक्त माझ्या जवळचा एक रुपया होता तेवढा द्या. बाकी कांही नको. ”

मीं त्याच्या हातावर एक रुपया ठेवला.

" तुला केव्हा परत पाहिजेत हे पैसे? पैसे मोजीत मीं विचारलें. एकूण एकावन्न रुपये होते.

" मी घेणार नाही ते पैसे. परत घेण्याकरतां मीं दिले नाहीत ते कांही ! मी स्पर्श करणार नाही कधी त्यांना ! "

शब्दाशब्दांतून त्याचा निश्चय जाणवत होता.

दिडकी-पैशाला महाग असणाऱ्या त्या पोराने दैवयोगाने इतके पैसे मिळाले असतां सहज ते देऊन टाकले होते. कारणाशिवाय त्याग केला होता. ही अनासक्ति कोठे शिकला होता तो? जो मोह आमच्यापैकी कोणालाहि टाळतां आला नसता तो मोह सहज रीतीने झुगारून देण्याचें बळ त्याच्या मनाला कशामुळे आलें होतें?

मीं स्तिमित होऊन त्याच्याकडे पाहिलें. मला एकदम वाटलं, ' गुणाः पूजास्थानम् ' हें खरें असलें तरी गुण ओळखणें सोपें नाही. तें ओळखण्याच्या बाबतींत किती सहज दिशाभूल होत असते ! आणि म्हणूनच माणूस पुष्कळदां वाइटाला चांगलें अन् चांगल्याला वाईट म्हणत असतो.

नंतर दोनचार वेळां ते पैसें नेण्याबद्दल मीं त्याला सांगितलें. त्याने ते न्यायचें साफ नाकारलें. आणि शेवटीं एकदा मला बजावलें, " आतां पुन्हा पैसे देण्याबद्दल म्हणा तर खरें—"

त्याला नकळत मीं त्याच्या आईला पुंडलीकबरोबर निरोप पाठविला.

तिने कळवलें, " तुमच्याजवळच असूं द्या ते रुपये. मला लागतील तेव्हा मी न्यायला येईन. "

दोन-तीन वर्षं तो रकम मजजवळ पडली होती. शेवटीं माझी नांदेडहून बदली झाली, त्या वेळी पुंडलीकबरोबर त्याच्या आईकडे मीं ती रकम पाठवून दिली. बाबूमियाने कांही त्या रकमेला हात लावला नाही.

पैशांचा व्यवहार त्याला कधींच जमला नाही व त्याचा फायदा अनेकांनीं घेतला. या कलंदर वृत्तीमुळे पुढच्या आयुष्यांत त्याला बराच त्रास झाला.

× × ×

नांदेडला जायला बाहेरगावचा शिक्षक कधीच तयार होत नसे. एका अर्थाने तें शिक्षेचेंच गाव समजलें जात असे. धरणगाव स्टेशनापासून दहा मैल अंतरावर तापीच्या कांठी तें गांव वसलें आहे. तेथे जाण्यायेण्याची

त्या वेळीं कसलीच सोय नव्हती. मुद्दाम गाडीची व्यवस्था केल्याशिवाय जाणेंयेणें शक्य नसे. (त्या वेळीं मोटारी क्वचितच दिसत) पण यापेक्षा निराळ्याच संकटाला तेथे जाणाराला तोंड द्यावें लागत असे. गावांत फक्त दोन-तीन विहिरीच होत्या. पाणी साठ-सत्तर हातांच्या पलीकडे होतें. पोहरा ओढायला तीन माणसें तरी लागत. त्याशिवाय विहिरीपासून घरापर्यंत तें वाहून न्यावें लागे; त्याकरतां कोणीतरी हवें असे. अशा रीतीने पाण्याची व्यवस्था होऊं शकत नसली तर नदीवरून पाण्याच्या पखाली आणल्या जात, त्यांतून पाणी विकत घ्यावें लागे. पण हें पाणी पितांना ब्रह्मांड डोळ्यांसमोर उभें राही. त्याला थोडासा पखालीच्या चामड्याचा वास येत असे. पखालवाला नदीच्या पात्रांत आंत न जातां कांठाजवळचंच पाणी आणीत असे. तेथेच धुणें, गुरांचें पिणें चालू असे. चामड्याच्या पाण्यांत कांठावरच्या मातीचा छान वास मिसळलेला असे. पावसाळ्यांत तर पाण्याचा रंग चहापेक्षाहि गहिरा असे. त्यामुळे पखालीचें पाणी नाइलाज झाल्याशिवाय सहसा कोणी घेत नसे.

नांदेड हें अतिशय जुनें वसलेलें गाव होतें. गावांतील बहुसंख्य लोक सुखवस्तु होते. खेडें असूनहि गावकऱ्यांच्या ठिकाणीं शहरांतील लोकांची अलिप्तता–बेपर्वाई आढळून येत असे. दुसऱ्याच्या अडीअडचणींचा विचार करायला कोणाला सवड नसे, आणि सवड असली तरी गरज वाटत नसे.

त्यामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या शिक्षकाला जीव नकोसा होई. शाळेंत गावांतील शिक्षकांचाच मुख्यतः भरणा असे. बाहेरगावचा एखादा शिक्षक आलाच तर काय वाटेल तें करून चारसहा महिन्यांत तो आपली बदली व सुटका करून घेई.

तेथील पाण्याचा त्रास पाहून मीहि हादरलों होतों. एकट्याचें कसें तरी भागून जात होतें; पण बायकोला आणलें की सारे सोपस्कार करावे लागणार होते. त्यापेक्षा—

बदली करून घ्यायचे विचार माझ्याहि मनांत घोळूं लागले. मी तसें एकदोनदा बोललोंहि. माझें बोलणें ऐकल्यावर पुंडलीक मला म्हणाला,

"केवळ पाण्याच्या त्रासाकरतांच बदली व्हावी असें वाटतें ना तुम्हांला?"

" म्हणजे तें काय क्षुल्लक कारण आहे ? कोणता बाहेरगावचा शिक्षक या ठिकाणीं टिकून राहूं इच्छितो ? "

" तुम्ही पाण्याची मुळीच काळजी करूं नका. "

" ठीक आहे ! नाहीं करीत काळजी ! पाहतों काळजी न केली म्हणजे घरांतील माठ पाण्यानं भरतो का ? "

" माझ्या बोलण्याची चेष्टा करूं नका. "

" नाही रे बाबा, अगदी गंभीरपणाने सांगतों, पाण्याची काळजी न करतां बदलीचीच काळजी करतों. "

" तुमची पाण्याची जबाबदारी मीं घेतली तर...? "

" तूं कशी जबाबदारी घेणार ? "

" कशीहि घेईन ! तुम्हांला पाणी मिळालें म्हणजे झालें ना ? "

" तें खरें; पण ही गोष्ट इतकी सोपी का आहे ? "

" सोपी नसली तरी मी सोपी करणार आहे ती ! "

" कशी सोपी करणार मला कळूं तर दे ! आजपर्यंत जें कोणालाहि शक्य झालें नाहीं तें तूं एकटा करणार होय ? "

" अगोदर एक गोष्ट मला सांगा. "

" काय कळायला पाहिजे तुला ? "

" पाण्याचा त्रास मिटल्यावर मग येथून बदली व्हावी म्हणून खटपट करणार नाहीं ना ? "

" हा एक पेच सुटला की झालें. मला का तुम्हांला सोडून जावेंसें वाटतें ? गाव मला अगदी पसंत आहे. "

" हें खरें ना अगदी ? "

" तुला मी खोटें सांगेन असें वाटतें का ? "

" मी पाणी आणीन तुमच्याकडे ! "

" तूं ? घरीं कधीतरी पाणी भरलें आहेस काय ? कधी इकडची काडी तिकडे ठेवली आहेस ? कधी घागर उचलून माठांत टाकली आहेस का ? अन् मला वाटतें, तुम्हीं तर स्वतःची पखाल ठेवलेली आहे. "

" आमचें घर नदीपासून जवळ असल्यामुळे आम्हांला पखालच सोयीची पडते. पाणीहि आम्ही काठाजवळचें न आणतां आंतलें आणवतों.

पण तुमच्याकडे राममंदिरांतील विहिरीचं पाणी आणण्याची व्यवस्था झाली म्हणजे तर अडचण नाही ना ? ”

“ तें खरें ! पण तुला तें कसें जमेल ? येथे पैसे घेऊनहि हें काम कोणी करीत नाही. ”

“ पैशांनी होणारें तें काम नाही ! पण तुम्ही काळजी करूं नका. मी सारी व्यवस्था करतों. ”

मी गप्प बसलों. तो काय करतो तें पाहायचें ठरवलें.

आणि त्याने सारी व्यवस्था केली. वर्गांतील निवडक मुलांचें मन त्यानें कसें तयार केलं तें त्याचें त्यालाच ठाऊक ! पण दुसऱ्या दिवसापासून तीन-चार मुलांनी तें काम अंगावर घेतलें. पुंडलीक स्वतः डोक्यावरून पाण्याच्या घागरी वाहून आणूं लागला.

तें पाहून बऱ्याच लोकांना व आमच्या शिक्षकांनाहि नवल वाटलें. नवल वाटण्यासारखीच ती गोष्ट होती.

पुंडलीक एका खानदान, श्रीमंत कुटुंबांतील पाटलाचा मुलगा होता. नांदेडचे ते पिढीजाद वतनदार होते. तीन भावांपैकी तो सर्वांत धाकटा होता व म्हणून सर्वांचा लाडका होता. घरीं त्याला कधी काडीला हात लावावा लागत नसे की तांब्याभर पाणी कोणाला द्यावें लागत नसे. असा मुलगा डोक्यावर पाण्याची घागर भरून ती एका शिक्षकाकडे नेतांना दिसल्यावर गावांतील लोकांना आश्चर्य वाटलें नसतें तरच नवल होतें !

मलाहि ती गोष्ट खटकलीच; पण मी अगतिक होतों, त्यामुळे मीं डोळ्यांवरून कातडें ओढून घेतलें. शिवाय पुंडलीकला सांगायची कांही सोयच नव्हती.

मी तीन चार वर्षें नांदेडला होतों; पण मला पाण्याचा कधीच त्रास झाला नाही. त्या बाबीकडेच काय पण पुढे तर कित्येक गोष्टींकडेहि मला पाहावें लागलें नाही. धरणगावला जायचें तर पुंडलीकला सांगितलें म्हणजे झालें. तो गाडीबैल तयार ठेवीत असे. गाडी हाकायला दुसऱ्या माणसाची जरूरच नसे.

आज लिहायला मला चमत्कारिक वाटतें, पण लिहिल्याशिवाय राहवत नाही. मी एकटा असतांना माझें धोतर त्याने मला कधी धुऊं दिलें नाही.

हट्टाने तो तें माझ्या हातांतून काढून घेऊं लागला. प्रथम मीं त्याला धुडकावून उडवून लावायचा खूप प्रयत्न केला, पण त्याहि बाबतींत त्याने माझें कांही चालूं दिलें नाही. एका विद्यार्थ्याने तसलें काम करणें मला तेव्हाहि पसंत नव्हतें. हल्लीं तसें कांही होणेंच शक्य नाही. आज शिक्षकांना काटेतोलपणाने आपल्या क्षेत्राची व अधिकाराची जाणीव झालेली आढळते व विद्यार्थीहि आपले हक्क व कर्तव्यें फार चांगल्या रीतीने जाणतात. दोघेहि आपापल्या चाकोरींतूनच जाण्याचा प्रयत्न करीत असतात. त्या चाकोरीबाहेर एखाद्याचें पाऊल पडतें आहे असा नुसता संशय आला तरी दुसरा त्याला खणखणीत शब्दांत इषारा देऊं लागतो. शिक्षकांनी एखादे वेळेस दुर्लक्ष केलें तरी विद्यार्थी मात्र भलतेच कर्तव्यतत्पर व जागरूक आढळतात.

काय झालें होतें कोणास ठाऊक ! कांहीतरी कारणामुळे मी पुंडलीक-वर त्या दिवशीं रागावलों होतों. कारण कांही फारसें महत्त्वाचें नव्हतें. आज तें आठवतहि नाही. पण त्यानंतर जें झालें तें मात्र आज तीन तपें उलटल्यावरहि मी विसरूं शकत नाही. आमरण विसरणेंहि शक्य नाही.

स्नान झाल्यावर चटकन् धोतर पिळून मीं वाळत टाकलें. आणि कांही-तरी काम करूं लागलों. जरा वेळाने पाहतों तर पुंडलीक फुलून फुलून रडतांना दिसला. मी राग विसरून चटकन् त्याच्याजवळ गेलों. त्याच्या पाठीवर हात फिरवीत मीं विचारलें,

"काय झालें रे ? असा वेडयासारखा कां रडतोस ?"

उत्तर आलें नाही. तो अधिकच आवेगाने स्फुंदूं लागला.

"अरे, पण काय झालें तें सांगशील की नाही ? सांगितल्याशिवाय कसें कळेल काय झालें तें ?"

तरीहि उत्तर मिळालें नाही.

शेवटी बऱ्याच वेळाने मुसमुसत तो म्हणाला,

"तुम्हीं धोतर कां धुतलें ?"

"हात् वेडया, एवढ्याकरतां का रडतोस ? खुळा आहेस अगदी ! उगी रहा, पूस बर डोळे !"

पण कांही केल्या त्याचें रडणें थांबेना.

शेवटीं मी उठलों, वाळत घातलेलें धोतर ओढलें व मोरींत टाकलें अन् थोड्याशा वैतागानेच म्हटलें,

" ऊठ, धू तें धोतर आता ! "

अन् तेव्हांच त्या खुळ्या मुलाचें समाधान झालें. त्याच्या वृत्तीला हसावें की रडावें हेंच मला कळेना !

× × ×

एकदा संध्याकाळीं शाळेच्या पटांगणांत कांहीतरी काम चाललें होतें. बरेच विद्यार्थी व शिक्षक तेथे होते. बाबूमिया व पुंडलीक कोठेतरी गेले होते.

माझ्याकडे कुत्सित नजरेने पाहत एक स्वतःला शहाणे समजणारे शिक्षक म्हणाले,

" तुमचे सुंदोपसुंद दिसत नाहींत कुठे ? "

परभारे दुसऱ्या शिक्षकाने त्यांना उत्तर दिलें !

" सुंदोपसुंद नव्हेत, ' जय-विजय ' ! दुर्योधनाने तुमच्या डोक्यावर हात ठेवला असावा, म्हणून तुम्हांला असें दिसत असावें. "

बिचारा अग्दी खजील झाला.

सेवाधर्म हा पुंडलीकच्या रक्ताचा प्रमुख घटक होता. अत्यंत मर्यादित असलेल्या या वृत्तीचा पुढे विकास झाला. पुंडलीक शिक्षक झाला पण तेवढयाने त्याचें समाधान झालें नाही. त्याने आयुर्वेदाचा अभ्यास केला व रोगी-दुखणेकऱ्यांच्या सेवेंत तो आनंद मानूं लागला, रमूं लागला. त्याचा हात विलक्षण यशस्वी ठरला.

दुर्दैवाने मांडीपासून पाय तोडून टाकावा लागला, तरीहि कुबडीच्या साहाय्याने रोग्यांच्या घरीं फेऱ्या होऊंच लागल्या. कोणीहि, कुठेहि व केव्हाहि बोलावलें तरी त्यानें टाळाटाळ केली नाही, ऊन–वारा–पाऊस पाहिला नाही की रात्र-बेरात्र–अवेळ म्हणून चालढकल केली नाही. घरच्या माणसांचें परोपरींचें सांगणें, विनवणें मानलें नाही, आदळआपट–त्रागा जुमानला नाही की स्वतःच्या प्रकृतीची कधी पर्वा केली नाही.

—आणि हें सारें कोणापासूनहि दिडकी स्वतःकरतां न घेतां. कोणाच्या पैशाला स्पर्श न करतां.

अशाच एका काळरात्रीं रोगी पाहायला गेला असतां तो जिन्यावरून पाय घसरून पडला आणि शोक करणारे असंख्य मित्र-सुहृद मागे ठेवून निघून गेला.

हरताळाची कल्पनाहि नसलेल्या त्या गावांत त्या दिवशीं नुसतीं दुकानेंच बंद झालीं नाहीत तर गावांतील सारीं कामें आपोआप स्थगित झालीं !

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रमांक ..... २०८९ ..... वि: चारित्र
नों. दि: ..........

## ११

# केवजी भाऊ

अगदी सकाळीं रामूबरोबर मी त्याच्या घरीं गेलों. केवजी भाऊ— रामूचे वडील — माझी वाट पाहत ओसरीवर उभेच होते.

" या, या मास्तर भाऊ, " मला पाहतांच पुढे येत केवजी भाऊ म्हणाले, " रात्रीं तुमचा निरोप सांगितला रामूने मी घरीं आल्यावर. त्या वेळींच मी तुमच्याकडे येणार होतों, पण शेतांतून यायला मला खूप रात्र झाली होती. तुम्ही झोपलां असाल असें वाटलें. शिवाय रामू म्हणाला, ' सकाळीं ते येणारच आहेत आपल्याकडे. ' मग म्हटलं, चला, आपल्या घराला पाय लागताहेत त्यांचे या निमित्ताने तरी. म्हणून घरींच थांबलों."

" दोन तीन वेळां तपास केला मीं तुम्ही घरीं आहांत का म्हणून, पण तुम्ही घरींच नव्हता. "

" अहो, शेत हेंच आमचं घर. शेतकऱ्याचें खरें घर शेतच. घरीं राहून का शेती होते ? "

" फार मेहनत घेतां तुम्ही भाऊ ! "

" मेहनतीशिवाय चांगलें पीक कसें येईल बरें ? "

" मेहनतीचें फळहि मिळतें तुम्हांला. गावांत तुमच्यासारखीं कुणाचीं शेतें पिकतात ? "

" सारी भगवानाची कृपा ! आपण फक्त मेहनत करायला पाहिजे. भरघोस पिकें आलीं अन् धरतीमाय हसायला लागली की साऱ्या मेहनतीचा विसर पडतो ! "

तेवढ्यांत रामूने एक पेला भरून फेसाळलेलें ताजें दूध आणलें.

" घ्या भाऊ ! " पेला माझ्या हातांत देत केवजी भाऊ म्हणाले.

मी एक एक घोट घेऊं लागलों. दुधासारखेंच केवजी भाऊंचें हृदयहि मधुर, साधें वाटलें मला.

" बरें, काय काम होतें तुमचें गरिबाकडे, भाऊ ? " दूध पिऊन मीं पेला दूर ठेवल्यावर सुपारीचें खांड माझ्या हातावर ठेवीत केवजी भाऊ म्हणाले.

" मी मुद्दामच भेटायला आलों तुम्हांला ! "

" रामूने कांही चूकबीक केली काय ? "

" छे ! रामू फार चांगला मुलगा आहे. अभ्यासांतहि हुशार आहे. "

" सगळे मुलांना शिकवितात; म्हटलें शिकूं द्यावें आपणहि. दोन चार बुकें शिकला तर हरकत नाही म्हणून पाठवलें शाळेंत. नाहीतर कांही जरूर नव्हती त्याला शिकायची ! "

" फार चांगलें केलें तुम्हीं, त्याला शिकूं दिलें तें ! "

" अहो, मी तर मागल्या वर्षींच त्याला शाळेंतून काढणार होतों. आता मला बरोबरीने मदत करूं लागला असता तो कामांत; पण त्याने हट्टच धरला आणखी शिकतो म्हणून. मलाहि तशी त्याच्या कामाची जरूर नव्हती. एकटा पोरगा, हौस आहे त्याची. राहूं दिलें त्याला शाळेंत."

" रामूकरिताच मी तुम्हांला भेटायला आलों आहें."

" सांगा ना काय सांगायचं तें ! "

" रामू फार हुशार मुलगा आहे. त्याला तुम्ही इंग्रजी शिकायला पाठवा असें सांगायला आलों आहें मी. "

" अहो, झालें हेंच शिक्षण जास्त झालें की ! इंग्रजी शिकून काय करायचं आहे आणखी ? "

" तो शिकला तर तुमच्या कुळाचें नांव काढील पाहा. त्याला चांगली नोकरी मिळेल. तुम्हांला मग असे कष्ट करावे लागणार नाहीत."

" अहो, कष्टाचें काय असें ? कष्ट करायचे नाहीत तर काय करायचें ? अन् कष्ट केले नाहीत तर शेतमळे पिकणार कसे ? "

" तुम्हांकडे जें पिकतें त्यापेक्षा कितीतरी जास्त तो मिळवील. "

" अन् ही शेत-जमीन कोण पेरील नंतर ? "

" होईल की, तें कांही मोठेसें महत्त्वाचें नाही ! "

" असें कसें म्हणतां मास्तर तुम्ही ? "

" अहो, त्याला इतका पैसा मिळेल की तो आणखी अशीं चार शेतें विकत घेईल. तुमचे दिवस पालटतील."

इतक्यांत रामूची आई बाहेर ओसरीवर आली. आमचें सारें बोलणें ओसरीवर बसूनच चाललें होतें. घरांत भाकरी करीत असतां ती सारें ऐकत होती.

" कशाला दूर पाठवायचें एकट्या मुलाला ? आम्हांला तसें कांहीं कमी नाहीं. पोटापुरतें आहे देवदयेनं ! "

" पण तो आणखी शिकून शहाणा झाला तर चांगलें होणार नाही का मावशी ? " मला माहीत होतें, जरा वयस्क बाईला मावशी म्हणून संबोधिलें की तिच्या हृदयाचा दगड कठीण असला तरी पाझरूं लागतो. तिची सहानुभूति मिळवणें सोपें जातें.

" पण त्याला इंग्रजी शिकवायचें म्हणजे परगावीं पाठवायचें ! जवळून तो दूर जायला नको आम्हांला. आमची म्हातारपणची काठी आहे ती. आम्हांला अन्नाचा घास गोड लागणार नाही तो इथे नसला तर. इथल्या इथं शिकायचा असला तर शिकूं द्या कितींहि. हे तर मागच्या वर्षींच त्याला शाळेंतून घरीं ठेवणार होते. पण मीं सांगितलें त्यांना, त्याला इतक्यांत कामाला जुंपूं नका. काम करायचंच आहे पुढं. म्हणून तर यांनी अजून शाळेंत ठेवलें आहे त्याला. "

" पण तुमचे पांग फेडील तो मावशी ! "

" काय सांगावें काय करील तें ! तो धोंडू पाटलाचा कृष्णा, पांच-सात वर्षें इंग्रजी शिकत होता. आता वर्षापूर्वी परत आला आहे. धड शिकणें झालें नाही, अंगांत काम राहिलें नाही. छान कपडे घालून मिरवायला मात्र शिकला आहे ! "

" खरंच मास्तरसाहेब, तो पोरगा अगदी वाया गेला. अशींच आणखी नाहीत का दोन-तीन पोरें ? खाणें अन् चकाट्या पिटीत मिजाशीने गावांत हिंडणें याशिवाय काय येतें त्यांना ? "

" तुम्हांला वाटतें का रामू तसा होईल ? अहो, मुलामुलांत फरक असतो. तुमच्या शब्दाच्या बाहेर जाईल का रामू कधीतरी ? मावशींनीं वळणच तसें लावलें आहे मुलाला. एकुलता एक मुलगा पण लाडानें शेफारलेला नाही. नाहीतर एकटा मुलगा म्हटला की पाहायला नको ! सुरुंग कुठें कसा लावायचा तें आतापर्यंतच्या संभाषणावरून माझ्या ध्यानांत आलें होतें. "

" पण मास्तरभाऊ, परक्या ठिकाणीं का घरच्यासारखें खाणेंपिणें मिळणार आहे ? इकडे आमचें लक्ष त्याच्याकडे अन् त्याचें लक्ष आमच्याकडे असतें. त्याचा अभ्याससुद्धा होणार नाही तिकडे. "

" माझी खात्री आहे त्याच्याबद्दल, म्हणूनच मी तुम्हांला सांगायला आलों. भलत्याच मुलाबद्दल मी कधीच सांगणार नाही. मला फार वाईट वाटतें माझ्या स्वतःबद्दल. रामूसारखाच मीहि एकटाच मुलगा ! मला शिकायला पाठवलें नाही आईबापांनी. माझ्याबरोबरचीं अभ्यासांत थोडीं मागे असणारीं एकदोन मुलें शिकायला गेलीं. दोघेहि मामलेदार आहेत आज. मी हट्ट धरून ट्रेनिंगमध्ये गेलों म्हणून मास्तर तरी झालों असा. नाहीतर हातचा नांगर सुटला नसता कधी ! नांगरटीला जमीन होती तेव्हा, तीहि आज नाही. आईबापांचें माझ्यावर प्रेम नव्हतें असें नाही. खूप माया होती त्यांची माझ्यावर. अजूनहि आहे. पण काळ कसा बदलतो आहे तें त्यांनी पाहिलें नाही. मला खूप वाईट वाटतें आता; पण इलाज नाही कांही ! मुलगा दूर जायला नको म्हणून मला प्रेमाने त्यांनी जवळच ठेवलें. तें प्रेम विष झालें माझ्या बाबतींत. तुमचा रामू असा हुशार आहे ! त्याला पाहिलें की मला माझें बालपण आठवतें. त्याचें कल्याण व्हावें असें वाटतें. म्हणून तुम्हांला सांगायला आलों. माझें त्यांत काय हित आहे बरें ? मावशी, मुलाच्या प्रेमामुळे तुम्ही त्याचें नुकसान करणार काय ? त्याचे पाय बांधून ठेवणार काय ? त्याला त्या शेताच्या तुकड्यांतच जन्मभर घाम गाळायला लावणार काय ? माझी खात्री आहे, तो शिकला तर निदान मामलेदार तरी झाल्याशिवाय राहणार नाही. याउपर तुमची मर्जी. त्याची हुशारी पाहून मला जें वाटलें तें तुम्हांला सांगितलें. माझ्या आईला आता फार वाईट वाटतें; पण उपयोग काय त्या वाईट वाटण्याचा वेळ गेल्यावर ! "

" मास्तर भाऊ, तुम्ही म्हणतां तें सारें खरें आहे. पण रामू दूर जावा हें मनाला पटतच नाही. "

" माझी आई चार दिवस मला दूर पाठवायला तयार नव्हती. अन् आतां बोलवावें तेव्हा कुठे येते महिन्या दोन महिन्यांनी. हळूहळू सवय होते सारी. पुढच्या गोष्टींवर नजर ठेवून मन आवरावें लागतें; दुःख सोसावें लागतें. तुम्हांला मीं सांगावें असें नाही. मी तुमच्या लेकरासारखा. रामू मला लहान भावाप्रमाणे वाटतो. तुम्ही विचार करा अन् ठरवा काय तें. आता आपल्याला थोडें दुःख होईल म्हणून रामूचें जन्माचें नुकसान करूं नका. तुमची शिकवायसारखी स्थिति आहे अन् तो हुशार आहे. चीज करील खर्च झालेल्या पैशाचें रामू. शिवाय शनिवारीं-रविवारीं तो घरीं येत जाईल. तुम्हांलाहि भालोदला जाऊन त्याची भेट घेतां येईल वाटेल तेव्हा ? "

" आम्हीं विचार करतों मास्तर भाऊ "

" ठीक आहे, येतों मी आता. "

मी शाळेंत गेलों. रामूहि शाळेंत आला. पण त्या दिवशीं रामूचें शाळेंत लक्ष नव्हतें. आमचें बोलणें चाललें असतां त्याने तें लक्षपूर्वक ऐकलें होतें. इंग्रजी शिकायची तीव्र उत्कंठा त्याच्या मनांत उत्पन्न झाली होती.

रामू सातव्या इयत्तेंतील एक अतिशय हुशार विद्यार्थी होता. स्वभावानेहि तो मोठा गोड पोरगा होता. त्याने पुढें शिकावें असें मला फार वाटत होतें. त्याला मी नेहमी तसें सांगत होतों. शेवटीं त्यानेच मला सांगितल्यामुळे मी त्याच्या बापाला भेटलों होतों.

दोन-तीन दिवसांनी रामूची आई मला भेटायला आली.

" मास्तर भाऊ, शिकूं द्यायचें ठरवलें आम्हीं रामूला इंग्रजी. त्या दिवसापासून तो नीट बोलत नाही की धड जेवत-खेळत नाही. विचारलें तेवढेंच बोलतो. आम्ही तरी का आमच्याकरता कांही म्हणतों ? आमचें दुःख आम्ही सोसूं. मारूं मन आमचें. होऊं दे पोराच्या मनासारखें ! पण आमची तुम्हांला एक विनंती आहे. ती मानली पाहिजे तुम्हीं ! "

" काय म्हणायचें आहे मावशी तुला ? विनंती–विनंती कशाला ? सांग काय करायचें तें ! "

" आम्हांला यांत कांही कळत नाही. तुम्ही रामूची सारी सोय नीट लावून द्या. त्याला त्रास व्हायला नको. "

" येवढेंच ना ? तुम्ही कांही काळजी करूं नका. मी केवजी भाऊंबरोबर जाऊन त्याची सारी व्यवस्था करून देईन. "

" त्यांना कांही यायला जमणार नाही. ते येणारच नाहीत. आपल्या शेताशिवाय कोठेच त्यांचें मन लागत नाही. जरूर तेव्हाच ते घरीं येतात. अन् अशा गोष्टींत त्यांना कांही समजतहि नाहीं. तुम्हांलाच सारें करावें लागेल. तुम्ही जबाबदारी घ्याल तरच हें होईल. तरच आम्ही त्याला पाठवूं. तुम्ही म्हणतां ना, माझ्या लहान भावासारखा आहे तो ? खरें झालें पाहिजे तें. सारी व्यवस्था लावून दिली पाहिजे. तुम्हीं जबाबदारी घेतली तर आमच्या मनावरचा तेवढाच भार कमी होईल. "

" मावशी, मी सारी व्यवस्था करून देईन. दोन-तीन दिवसांत मी भेटेन केवजी भाऊंना. ठरवूं सर्वांच्या विचाराने नक्की काय करायचें अन् कसें करायचें तें ! "

" आजच संध्याकाळीं या ना. मी मळ्यांतून बोलावून आणीन त्यांना. थांबतील ते घरींच आज. "

" ठीक आहे. संध्याकाळीं ते घरीं आले की रामूला पाठवून दे माझ्याकडे. मी येईन मग त्याच्याबरोबर. "

रामूच्या शिक्षणाची नीट व्यवस्था लागली. तो बुद्धिमान् होता. अभ्यास करण्यांत त्याने कधी कसूर केली नाही. यथाक्रम तो मॅट्रिकची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झाला. त्याला सरकारची शिष्यवृत्तीहि मिळाली.

रामूने कॉलेजमध्ये जावें की नाही याबद्दल त्याच्या घरीं पुन्हा वादंग माजलें. आता मात्र त्याच्या म्हाताऱ्या आईबापांची खरोखरच त्याला दूर कॉलेजांत पाठवायची इच्छा नव्हती आणि रामूला तर केव्हा कॉलेजमध्ये जातों असें झालें होतें. म्हाताऱ्या केवजी भाऊंनी त्याला साफ नाही म्हणून सांगितलें. आईच्या डोळ्यांतून आसवें गळूं लागलीं. रामू कासावीस झाला. मी त्या वेळीं भुसावळ येथे होतों. त्याने मला विनवून त्याच्या वडलांना भेटायला सांगितलें. त्यांची समजूत करा म्हणून काकुळतीने हात जोडले, पाय धरले.

मीं त्यांची कशीतरी समजूत केली. शिकायला न पाठवलें तरी नौकरीकरिता तुमच्यापासून त्याला दूरच राहावें लागेल म्हणून सांगितलें. इतकें शिकल्यावर तुम्ही त्याच्या हातांत नांगर देणार का म्हणून विचारलें. त्यांचा नाइलाज झाला. कष्टाने त्यांनी संमति दिली.

आणि रामूने त्याचें चीज केलें. त्याने योग्य रीतीने आपला शिक्षणक्रम पूर्ण केला. तो सन्मानासह पदवीपरीक्षा उत्तीर्ण झाला. त्या गावचा तो पहिलाच पदवीधर. गावांतील लोकांनाहि फार आनंद झाला. त्यांनी त्याच्या सत्काराकरता लहानसा समारंभ करण्याचें ठरवलें. कोणाच्या तरी सूचनेवरून त्या समारंभाच्या अध्यक्षपदाकरता माझें नांव सुचविण्यांत आलें. त्याप्रमाणे मला विचारण्यांत आल्यावर नकार देणें मला शक्यच नव्हतें.

बैलगाडीने जायचें होतें. गाडी येऊन थांबली होती. मी तयारी करीत होतों. तोंच माझे एक स्नेही × × × × मला भेटायला आले. त्यांच्याकडे त्या दिवशीं ' पांचवी ' चा समारंभ होता. मीं त्या समारंभाकरता थांबावें अशी त्यांची इच्छा होती. ते येतांच मीं त्यांना म्हटलं,

" आप्पासाहेब, तुमचे पेढे मिळाले. फार आनंद झाला. "

" तुमची कुठली तरी तयारी दिसते आहे ! "

" पाडळश्याला जायचें आहे एका समारंभाकरता. "

" कसला समारंभ आहे ? "

" आमचा एक विद्यार्थी या वर्षीं पदवीधर झाला. त्या गावचा तो पहिलाच पदवीधर. गावकऱ्यांनी त्याकरता लहानसा समारंभ करायचें ठरवलें आहे. "

" मला या लोकांचें मोठें नवल वाटतें बुवा. पहिला पदवीधर झाला म्हणून काय समारंभ करायचा ? गल्लोगल्लीं पदवीधर झाले आहेत हल्ली. पदवीधर झाला यांत विशेष काय आहे ? अन् अशा समारंभाला आता तुम्ही अशा उन्हांतून जाणार ? "

मला मोठा विषाद वाटला त्यांचं बोलणं ऐकून. त्यांतील मथितार्थ अगदी स्पष्ट होता. पहिला पदवीधर होऊन कांही विशेष झालें होतें असें नाही. त्याकरता समारंभ करणें मूर्खपणाचें होतें आणि त्या मूर्खपणांत मीहि भाग घेऊन माझाहि मूर्खपणा—अजागळपणा—व्यक्त करीत होतों.

त्यांच्या म्हणण्यांत तथ्य होतें अन् नव्हतेंहि. मी थोडासा गोंधळलों. तसं ते म्हणाले,

" मी तर तुम्हांला आमंत्रण द्यायला आलों आहें. आमच्याकडे आज पांचवीचा समारंभ आहे. चांगलें गाणें ठेवलें आहे. तुम्हीं आलं पाहिजे. आता तुम्हीं गेलांत की संध्याकाळपर्यंत परत येणार नाही असें दिसतें. कांहीहि करून परत आलें पाहिजे तुम्हीं. नाहीतर जाऊंच नका झालें. काय आहे विशेष ? झाला पहिला पदवीधर. पुष्कळच होतात ! "

मला थोडीशी चीड आली, वाईटहि वाटलें. मी एकदम उद्गारलों,

" तुम्हीं परवा पेढे वांटले. आज समारंभ करतां. कशाकरतां हें सारें ? "

" म्हणजे ? "

" तुम्हांला पहिला मुलगा झाला म्हणून ना हें सारें तुम्ही करीत आहां ? "

" अर्थात् ! "

" पहिला मुलगा झाला यांत विशेष काय आहे ? घरोघरीं मुलें होतात. पहिला–दुसरा, अनेक होतात. त्यांत समारंभ करण्यासारखें काय आहे ? "

" वा वा ! त्याचें महत्त्व मीं तुम्हांला सांगायला पाहिजे काय ? " त्याच्या मागच्या भावना पाहा ना ? "

" मग आप्पासाहेब, हा समारंभ करणाऱ्या लोकांच्याहि भावना पाहा ना जरा. त्या जर तुमच्या भावनांप्रमाणेच तुम्हीं विचारांत घेतल्या असत्या तर तुम्हीं असें म्हटलें असतें का ? तुमच्या भावनांत व त्या लोकांच्या भावनांत मला तरी कांही फरक वाटत नाही. माफ करा जरा स्पष्ट बोलल्याबद्दल. मी संध्याकाळीं येण्याचा शक्य तो प्रयत्न करीन. रात्रीं दहापर्यंत तरी नक्की येईन × × × चं गाणं ऐकायची नाहीतरी माझी फार इच्छा आहे. "

" ठीक आहे. अवश्य या नि दोघांच्याहि भावनांची जपणूक करा अशी विनंती आहे. "

" बरें आहे. कमीजास्त बोलल्याबद्दल क्षमा करा अं."

" तसं नाही हो कांही. बरोबरच सांगितलें तुम्हीं. बरें, येतों मी आता. तुम्हांलाहि उशीर व्हायला नको. "

" या, नमस्कार ! "

खेडेगावचा समारंभ. त्यांत बडेजाव, भपका कोठून असणार ? त्यांत होती फक्त अंतःकरणाची उत्कटता ! आणि त्या उत्कटतेपोटीं खेळणारा उत्साह.

समारंभाला सुरुवात होईपर्यंत केवजी भाऊंचा पत्ताच नव्हता. तपास केल्यावर कळलें, ते मळ्यांतच होते. कोणीतरी त्यांना बोलवायला गेला आणि घेऊन आला.

केवजी भाऊ व्यासपीठावर बसावयाला तयारच नव्हते. पण लोकांच्या आग्रहापुढे त्यांचा नाइलाज झाला. त्यांना व्यासपीठावरील खुर्चीत बसणें भाग पडलें. अवघडल्यासारखे ते बसले. त्यांच्या डोक्यावर जणू कोणीं मणा दीड मणाचा बोजा ठेवला होता.

एक-दोन शिक्षकांचीं रामूच्या गुणांचें वर्णन करणारीं भाषणें झालीं. रामूला त्यांनी टिळक केलें, बोस केलें, रँगलर परांजपे केलें. रामू-रामराव त्या गावाचेंच्च नव्हे तर हिंदुस्तानचें भूषण होणार असें निश्चित भविष्य वर्तविलें. आपलेपणापोटीं विचार वाहून गेले.

खेडेगावचीं साधीभोळीं अंतःकरणें भावनांनी भारावून गेलीं.

रामूच्या गळ्यांत हार घालण्याचा प्रसंग. रामूने आपल्या गळ्यांत हार घालूंच दिला नाही. त्याने तो तसाच वरचेवर हातांत घेतला आणि चटकन् उठून तो केवजी भाऊंच्या गळ्यांत घातला व त्यांना वंदन केलें.

" अरे ! हें काय ? " केवजीभाऊंच्या तोंडून कसेतरी शब्द बाहेर पडले. त्यांचे उन्हातान्हांतून रापून निघालेलें मुख उजळून खुललें. अत्यानंदाने अंग थरथरूं लागलें.

माझ्याकडे वळून गहिवरलेल्या आवाजांत ते म्हणाले, " मास्तर भाऊ, हें सारें तुमच्यामुळे झालें ! "

वास्तविक माझा भाग त्यांत फार थोडा होता. हुशार, होतकरू विद्यार्थ्यांने अधिकाधिक यश मिळवावें अशीच प्रत्येक शिक्षकाची इच्छा असते. रामूने यश मिळवलें होतें स्वतःच्या प्रयत्नांनी अन् बुद्धिमत्तेने. परंतु मनुष्याच्या वृत्तींत थोडेसेंतरी अहंकाराचें बीज असतेंच. अनायासें मिळणारा मानाचा, चांगुलपणाचा शिरपेच कोणीं डोक्यावर ठेवला तर तो काढून बाजूला ठेवणारा माणूस क्वचितच आढळतो.

केवजीभाऊंच्या उद्गारांनीं माझेंहि मन हेलावलें. मीं उत्कटतेने त्यांचा हात हातांत घेऊन म्हटलें, " छे ! तुम्हीं ऐकलें म्हणून, नाहीतर मी काय करणार होतों ? "

रामरावाची इच्छा पुढेहि शिकायची होती. पण मग मात्र त्याला तें शक्य झालें नाही.

रामराव नोकरी करूं लागला. मुलकी खात्यांतील दगदगीची नोकरी ! पण त्याने श्रमाची पर्वा केली नाही की कामांत अंगचुकारपणा केला नाही. त्याचें फळहि त्याला मिळालें. तो क्रमाने चढत चढत जाऊन मामलेदार झाला. त्याच्या आई-बापाची इच्छा–स्वप्न–खरें झालें.

एकदा अचानक रामराव स्टेशनवर भेटला. त्याच्याबरोबर केवजी भाऊ व रामरावाची आई होती. दोघांचेंहि बरेंच वय झालें होतें. तीं खूप थकल्यासारखीं दिसत होतीं.

औपचारिक बोलणें झाल्यावर रामराव म्हणाला, " सर, माझा अगदी नाइलाज झाला. कांही ऐकतच नाहीत बाबा नि आई ! "

" काय झालें ? "

" त्यांना मी नोकरीच्या गावीं घेऊन गेलों होतों. खूप सांगितलें आता तुम्ही बिलकुल काम करूं नका. तुमचें वयहि झालें आहे. पण पंधरा दिवसहि हे तिथे थांबले नाहीत. सारखें ' घरीं पोंचव ' म्हणून टुमणें लावलें. त्यांना घरीं पोंचवायला यावें लागलें. "

" काय केवजी भाऊ ! काय म्हणताहेत रामराव ? "

" मास्तर भाऊ, तो म्हणतो तें सारें खरें आहे. "

" मग कशाला जातां गावाला ? आरामांत राहायचें ! देवदयेनं हे भाग्याचे दिवस लाभले आहेत तुम्हांला. "

" तें खरें, पण...... "

" मी बाबांना म्हणतों, तुम्ही वर्षभर रात्रीचा दिवस करून जें उत्पन्न काढाल तेवढा माझा महिन्याचा पगार आहे. कशाकरतां रक्ताचें पाणी करतां ? "

" मास्तरभाऊ, श्रम का पैशाकरतांच करायचे असतात ? "

केवजी भाऊंच्या प्रश्नाने मी क्षणभर गोंधळलों. श्रम नेहमीच पैशाकरतां

करायचे नसतात. पण त्या वेळीं तसें कबूल करणें बरोबर नव्हतें.

"पण मी म्हणतों श्रम करायची जरूरच काय?"

"त्याशिवाय बरेंच वाटत नाही, भाऊ. काम करायची इतकी सवय झाली आहे आम्हांला की स्वस्थ बसणें, आराम करणें हें संकट वाटतें. रामूला खूप पैसा मिळतो. पण घाम गाळून पिकविलेल्या शेरभर जोंधळ्यांची किंमत बाजारांतून आणलेल्या पोतेंभर धान्यापेक्षा जास्त वाटते मला. काळींत खपतांना उभी हयात गेली माझी. शेतांत काम करूं लागलों की म्हातारपणामुळे थकलेल्या माझ्या 'नाड्या' सळसळूं लागतात. थंड होऊं लागलेलें रक्त तापूं लागतें. मोठा आनंद होतो; समाधान वाटतें."

मी चकित झालों. केवजी भाऊ अतिशय अबोल होते, अडाणी होते. पण त्यांच्या बोलण्याने आमची मति कुंठित झाली. मला वाटलें, काळी आईच त्यांच्या तोंडून तसें वदवीत होती.

मी रामरावला म्हणालों, "जाऊं दे त्यांना! शहरांत त्यांचा जीव गुदमरेल. काळ्या मातींत रमणाऱ्या त्यांच्या मनाला शहरांतील कोंदट वातावरण कसें रुचेल? पिंजऱ्यांतल्या पांखरासारखे ते झुरतील, जळतील! त्यांच्या मनाला आवडेल तें करूं दे त्यांना. त्यांना ज्यांत समाधान वाटेल तें करूं दे त्यांना."

"दुसरा इलाजच नाही कांही."

नंतर साठ-आठ वर्षांचा काळ लोटला. भारताला स्वातंत्र्य मिळालें. नवीन क्षितिजें आमच्या डोळ्यांसमोर दिसूं लागलीं. आम्ही झपाट्याने प्रगतीची वाट चालूं लागलों. जीवनमूल्यें बदललीं. कायदे बदलले. जुने समज गळून पडूं लागले. पूर्वी उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी असें आम्हांला वाटत होतें. आतां ती समजूत पार उलटी झाली. उत्तम नोकरी व कनिष्ठ शेती याबद्दल कोणालाहि संशय राहिला नाही. शेती कसणारांची झाली. आणि कसणारा कोण हें ठरविण्याकरतां निष्णात कायदे पंडितांचें बुद्धिचातुर्य खर्च होऊं लागलें. जुनीं माणसें नव्या जगाशीं समरस होण्याचा प्रयत्न करीत होतीं.

रामरावाची आणखी बढती झाली होती. मोठा निःपक्षपाती, कर्तबगार अधिकारी म्हणून त्याला मान मिळूं लागला होता. एके दिवशीं मला त्याचें

पत्र आलं. × × तारखेला सकाळीं येत आहें. मिळाली तर पाडळश्याला जाण्याकरतां भाड्याची मोटार ठरवून ठेवावी. नाहीतर तीन-चार जागा एस. टी. मध्ये रिझर्व करून ठेवाव्या अशी विनंती त्यानें त्या पत्रांत केली होती.

त्याप्रमाणे मोटार ठरवून मी स्टेशनवर गेलों. रामराव व केवजी भाऊ गाडींतून उतरले. केवजी भाऊ खूपच खंगले होते. नुसता हाडांचा सापळा दिसत होता. त्यांचे डोळे थिजल्यासारखे दिसत होते. भोवती काय चाललें आहे तें त्यांना कळत नसावेसें मला वाटलें. माझ्याकडे त्यांनी धड पाहिलेंहि नाही.

रामरावाने मला एकीकडे घेऊन सांगितलें. चार वर्षांपूर्वी आई गेली तरी शेत सोडून दूर जायला--माझ्याकडे येऊन स्वस्थ बसायला बाबा तयारच नव्हते. पण शेवटीं तेहि आजारी पडले. मग मात्र त्यांचें कांही न ऐकतां मी त्यांना घेऊन गेलों. मळा गावांतील एका शेतकऱ्याला खंडाने दिला. नंतर कूळकायदा आला आणि कायद्याने ती जमीन आता त्या शेतकऱ्याची झाली.

अलीकडे बाबांची प्रकृति बरी होऊं लागली होती. जरा बरें वाटूं लागतांच शेताकडे जायचें म्हणून त्यांनी छंद घेतला. माझ्यापुढे मोठा पेचप्रसंग उभा राहिला. ‘ आपला मळा गेला, तो दुसऱ्याचा झाला. त्यांतल्या टोपलीभर मातीवरहि आपला हक्क आता राहिला नाही. ’ हें त्यांना कसें सांगायचें ? तो आघात त्यांना सहन होणें शक्य नव्हतें ! मी चालढकल करूं लागलों. पण शेवटीं माझा नाइलाज झाला. त्यांची प्रकृति बरीच सुधारली होती व शेवटी ते कांही ऐकायलाच तयार होईनात.

हळूहळू मीं त्यांना नवा कायदा सांगितला, अन् खऱ्या गोष्टीची त्यांना कल्पना दिली. घटकाभर मी काय म्हणत होतों तें त्यांना कळलेंच नाही. बऱ्याच वेळानें तें त्यांच्या लक्षांत आलें. जिव्हारीं घाव बसल्याप्रमाणे छातीवर हात ठेवून ते म्हणाले, “ असें कसें होईल ? एखादा पाहुणा आला व त्याला स्नान करायचें म्हणून मी माझें धोतर नेसायला दिलें तर तें काय त्याचेंच समजायचें ? छे ! असें होणारच नाही ! चल पाहूं गावाला. पाहतों कोण कसें माझें शेत घेतो तें ? माझ्या काळजाचा तुकडा आहे

ग्रंथ संग्रहालय स्थापना
दि: ८।१२
अनुक्रमांक १०४३ नों: दि:

माझें शेत ! ”

त्यांना पुन्हा सारें नीट समजावून सांगितल्यावर मात्र त्यांच्या मनावर मोठा आघात झाला. ते एकदम खचले. त्यांची सुधारूं लागलेली प्रकृति ढांसळली. त्यांना वेड लागल्यासारखें झालें.

मधून मधून ते शुद्धीवर येतात, तेव्हा ‘ एकदा-एकदाच शेतांत घेऊन चल ’ म्हणून अत्यंत काकुळतीने डोळ्यांत पाणी आणून सांगतात. ‘ त्याशिवाय माझा प्राण जाणार नाही ’ म्हणून म्हणतात. शेवटीं त्यांची ही तरी इच्छा पुरवायची म्हणून त्यांना घेऊन आलों आहें. रामरावाचे डोळे भरून आले. माझ्याहि डोळ्यांत पाणी गोळा झालें.

तोंच केवजी भाऊ शुद्धीवर आले. ते मजजवळ आले व खिन्नपणाने म्हणाले, “ मास्तर भाऊ, हें तुमच्यामुळे झालें ! ”

मला एकदम फटका बसला. पूर्वी हेच शब्द त्यांनी उच्चारले होते, तेव्हा आनंदाने अन् अभिमानाने माझी छाती किती वर आली होती. आज त्याच शब्दांनी माझ्या मनावर केवढा प्रहार केला होता. माझ्या हातून खरोखरच का चूक झाली होती ! मीं जर रामूला शिकायला पाठवायचा आग्रह धरला नसता तर आजची ही दुर्दैवी घटना घडली नसती का ? कदाचित् घडलीहि नसती. केवजी भाऊंच्या इच्छेप्रमाणे रामू स्वतःच आपल्या मळ्यांत कसून शेती करतांना आढळला असता. त्यांच्या मनाच्या आजच्यासारख्या चिंध्या झाल्या नसत्या.

पण आता कांहीच उपाय नव्हता. मी मोठ्या कष्टानें म्हणालों, “ केवजी भाऊ, क्षमा करा. ”

पण माझे शब्द त्यांना समजलेच नाहीत. त्यांचें मन पुन्हा बावरलें. ते दूरवर शून्य दृष्टीने पाहूं लागले. रामरावाने त्यांचा हात धरला. आम्ही मोटारीकडे गेलों.

तिसऱ्याच दिवशीं मला निरोप मिळाला केवजी भाऊ गेले म्हणून. मनावर खूप ओझें ठेवल्यासारखें मला वाटलें. त्याच दिवशीं मी रामरावला भेटायला पाडळश्याला गेलों.

डोळ्यांतील पाझरणारीं आसवें पुशीत रामरावाने मला सांगितलें, “ आम्ही इथे आल्यावर मीं आमच्या कुळाला बोलावलें. त्याला सारी

हकीकत सांगितली. बाबांच्या समजुतीकरतां 'शेतमळा परत करतों' म्हणून सांग अशी त्याला मीं विनंती केली. तो बाबांना म्हणाला, "केवजी भाऊ, तुमचा मळा मी परत देतों, मला नको तो. तुम्ही पेरणी करा त्याची."

"तूं परत देतोस? तुझा तो झालाच कसा?" ते उद्गारले. "मला पहिल्याने मळ्यांत घेऊन चला." त्यांनी हट्ट धरला. आम्हीं त्यांना मळ्यांत नेलं. विहिरीच्या थाळण्यावर ते टेकून बसले. साऱ्या मळ्यावर त्यांनी नजर फिरविली. विहिरींतील पाण्यांत पाहण्याचा प्रयत्न केला. विहिरींतून पाणी काढून प्यायला द्या म्हणून इच्छा व्यक्त केली. त्याप्रमाणे आम्हीं पाणी काढून त्यांना प्यायला दिलें. त्यांनी एक घोट घेतला, सगळीकडे पाहिलें अन् समाधानाने ते मागच्या लाकडाला टेकले. त्यांनी डोळे मिटले ते पुन्हा कांही उघडले नाहीत!

"पिकलें पान केव्हा गळून पडेल याचा नेम नव्हता. पण मोठ्या समाधानाने केवजी भाऊंनी प्राण सोडला." जवळच उभा असलेला रामरावाचा खंडकरी म्हणाला.

मला बरें वाटलें.

पाडळश्याहून परत येत असतां राहून राहून माझ्या मनांत विचार येत होते.

आमचा देश शेतकीप्रधान आहे. भारतांतील शेकडा ऐशीं टक्के लोक शेतकरी आहेत. यापुढेहि ते शेतकरीच राहातील. ते श्रम करतील, घाम गाळतील, रक्ताचें पाणी करून जमीन भिजवितील, तिच्यांत मळे फुलवितील, धन-धान्याने तिला नटवितील, हंसवितील.

पण.......

पण आपल्या शेताच्या तुकड्याला आपल्या काळजाचा तुकडा मानणारे, शेतांतील मातीला जीवनाचें सर्वस्व समजणारे, तिच्याशीं बोलणारे, हसणारे, तिच्याबरोबर खेळणारे, रडणारे केवजी भाऊंसारखे शेतकरी मात्र यापुढे आपणांला दिसणार नाहीत, कधींहि दिसणार नाहीत!

कारण......

संग्रहालय ठा . ग्रंथ क्रमांक
वि: चारित्र
क्रमांक 1089 नों: दि:

आम्ही जमीन कसूं, पिकवूं, फुलवूं, पण त्या जमिनीचा आमच्या काळजाशीं कसलाच संबंध असणार नाही. असा कांही संबंध असतो असेंहि आम्हांला कधी वाटणार नाही. तसा संबंध कोणीं जोडण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्याची गणना वेड्यांत करूं.

★

११५८९

REFBK-0011595

REFBK-0011595